# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL V AKOLA:—SATURDAY EVENING, APRIL 2 1870 NO. 14

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २ माहे एप्रिल सन १८७० इ० अंक १४


## अमेरिकेच्या शोधाविषयीं.

हिंदुस्थानांत बौद्ध धर्माची प्रवृत्ती होऊन अडीच हजार वर्षांहून अधिक वर्षे गुजरलीं असें आलिकडे जे शोध झाले व होत आहेत त्यांवरून दिसून येतें. राजकीय सत्ता वाढविण्यास अथवा उपयुक्त साहसाचीं कामें करण्यास लोकांस उत्तेजन येणें हें बहुतेक अशीं धर्माच्या स्वरूपावरच अवलंबून असतें. सर्वांस माहित आहे कीं आपल्या हिंदू धर्माचें स्वरूप स्थीर आहे. तो दिवसें दिवस वर्धमान व्हाग अथवा त्यांतील लोकांस कोणतेही उपयुक्त काम करण्यासाठीं उत्तेजन यावें असें त्यांत कांहीं आहे असें सांपत दिसत नाहीं. पूर्वी या धर्माचें स्वरूप सांपतच्या स्वरूपाहून भिन्न होत असेल पण सांप्रतचें ह्मणजे अगदीं स्थीरपणाची स्थिती त्यास केव्हांपासून प्राप्त झाली हें समजत नाहीं. बौद्ध धर्म हा हिंदू धर्मापासूनच निघाला आहे. त्याच्या दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या मतांवरून तो वृद्धिंगत होणारा आहे हें खरें; पण हें जगमिथ्या, संपत्ती, आप्त, इष्ट, मित्र इत्यादि सर्व कांहीं मिथ्याच आहे, यांचा लोभ धरून तरुणोपाय व्हावयाचा नाहीं अशा प्रकारचींही हिंदू वेदांतातील मतांचा त्या धर्मात बराच समावेश आहे. आपण त्या धर्मांतील महंत भिक्षू इत्यादि कसे रानांतील गुहांतून राहात असत याबद्दल वाचतों, आणि त्या प्रमाणें ते उपदेश करितात हें ही आपण पहातों, आणि त्यावरून ही आपल्या मनांत येतें कीं, या धर्माचें स्वरूप वृद्धिंगत होणारें असलें तरी त्यांतील लोकांस मोठमोठालीं साहसें जेणेकरून कीर्ती व दवलत प्राप्त होईल व लोकांचेंही कल्याण होईल अशांस उत्तेजन यावें अशा प्रकारचें त्यांत कांहीं आहे असें बाह्यदृष्टीस दिसत नाहीं. असें असतां आपल्या देशांत मोठमोठे संपतीमान बहुधा सर्व बौद्धच आहेत. चिनी लोक सर्व बौद्ध असून त्यांच्या हरएक कामांत चातुर्याची वाखाणी करितात. त्यांणीं पासिफीक महासागरांतील बहुतकरून सर्व बेटें वसविलीं आहेत. कोणत्याही टिकाणीं जाण्यास त्यांस प्रत्यवाय नाहीं. देशांत अधिक प्रजा झाल्यानें ते बाहेर जातात असें म्हणावें तर हिंदुस्थानांत कित्येक प्रांतांत प्रजा अधिक असली तथापि तेथून दुसरीकडे लोक गेल्याचें उदाहरण कोठें मिळत नाहीं. अशोक राजानें बौद्ध धर्म स्विकारल्यानंतर जिकडे तिकडे उपदेशक पाठविले होते. तेही केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर कित्येक बेटांत व दुसऱ्या देशांतही याप्रमाणे बौद्ध लोकांकडून मोठमोठीं साहसाचीं कृत्यें होतात त्यापेक्षां त्यांत तशा कृत्यांस उतेजन येण्यासारखें कांहीं असावें असेंही वाटतें.

अमेरिकाखंड सन १४९२ त कोलंबस याणें शोधून काढलें हें आतां बहुतेकांस माहित आहे. पण शोधवरून असें कळतें कीं अमेरिका प्रथम शोधून काढण्याचें श्रय बौद्ध लोकांस मिळालें. तारीख १५ सप्टेंबर १८६९ च्या "इंडियन" नामक पत्रांत लिहिलेला हा खालील मजकूर आह्मी आमच्या वाचकांकरितां घेतों.

"चौदाशें वर्षांपूर्वी चिनी लोकांनी अमेरिकेचा शोध लाऊन वर्णनही केलें आहे. अमेरिका चिनाहून २०००० चिनी मैल दूर आहे. ख्रिस्ती शकाचीं ५०० वर्षे गेल्यानंतर बौद्ध धर्मोपदेशक अमेरिकेत गेले होते त्यांणीं असें वर्तमान आणलें कीं त्यांस तेथें बौद्ध प्रतीमा व लेख मिळाले. त्यांणीं केलेलें वर्णन त्यानंतर १००० वर्षांनी तेथें गेलेल्या स्पानियर्ड लोकांनीं केलेल्या वर्णनाप्रमाणेच आहे. त्या देशांत एक वृक्ष उत्पन्न होतो, त्याचीं पानें बांबूच्या पानांप्रमाणें असतात; त्याच्या सालीपासून तिकडील लोक वस्त्रें करितात; आणि त्याचीं फळें खातात. त्या वृक्षाचें नांव "फयुसानी" या नावांवरून चिनी लोकांनीं त्या देशासही तेंच नांव दिलें. अशा रीतीचें वर्णन सांप्रतचे अमेरिकन इतिहासकर्ते याणी दिलें आहे. + × × तिकडे आइटेक म्हणून लोक आहेत त्यांच्या मध्यें फार तादृश्य आहे. व त्यांच्या रीतीभातींतही सादृश्य आहे. मध्य व दक्षण अमेरिका येथील लोकांचा व चिनी लोकांच्या चेहऱ्यांत सादृश्य आहे, त्यांच्या भाषेंतील बहुतेक शब्द चिनी भाषेंतील शब्दांशी मिळतात. यावरून असा सिध्दांत होतो किं, प्राचीन काळीं ह्मणजे चौदाशें वर्षांपूर्वी पुष्कळ चिनी लोक तिकडे राहाण्यासाठीं गेले असावे. स्पानियर्ड लोक अमेरिकेंत गेले त्यावेळीं पश्चिम किनाऱ्यावरील लोक बरेच सुधारलेले व पूर्व किनाऱ्यावरील रानठी असें त्यांस अढळले"

हें वर्णन "इन्डियन", पत्रांत एका विलायतेंतील मासीक पुस्तकांतून घेतलें आहे. आणि यावरून असें दिसून येईल कीं, सांप्रतच्या ख्रिस्ती धर्मांतील लोकां प्रमाणेंच बौद्ध धर्मांतील लोक मोठे उद्योगी व साहसीक होते व आहेत. आपल्या हिंदुस्थानांतील बौद्ध धर्मी लोकांकडून तूर्त अशा प्रकारचा उद्योग होत नाहीं याचें कारण इतकेंच दिसतें कीं, त्यांवर सांप्रतच्या हिंदू धर्मी मताचें ही महत्व आहे. व असेंही दिसून येईल कीं, अमेरिकेच्या शोधांत नवीनपणा मानण्यासारखें मोठें कारण आहे असें ही नाहीं.

## इन्कंटयाक्स अगर प्राप्तिवरील कर.

लोकांत असें वाटत होतें कीं, येत्या सन १८७०।७१ सालांत करांचें ओझें कांहीं कमी होईल आणि 'यांस वकींह' त्रास जुलूम यांजपासून विश्रांति मिळेल; परंतु कलकत्याकडून जी वार्ता उडत आली तिजवरून तसें होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. मुंबई व मद्रास या इलाख्यांत मिठाचा दर वाढला तो कमी होईल किंवा नाहीं याजविषयी कोणी एक अक्षर देखील बोलत नाहीं. ठीकच आहे याचा त्रास विशेष अनाथ, अज्ञानी, बिचारीं एतद्देशीय गरीबें यांस होणार तेव्हां त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं भरीवर भर पडावयाची हा नियमच आहे. वास्तव आमच्या गरीब रयतेकडे दुःखांची व त्रासांची भर आहे तेव्हां तिजवर आणखीं भर पडावी हें ठीकच आहे परंतु आतां इन्कमटाक्स म्हणजे प्राप्तीवरील कर हा अजीबाद कमी व्हावयाचा तो न होतां उलटा एक सारखा भराभर वाढत चालला आहे. गतवर्षाच्या आरंभीं सरासरी शेकडा एक टक्का प्रमाणें बसला. मध्यंतरी जेव्हा एका एकी सुधारल्या राज्यरीतींत व दक्ष दरबारी पुरुषाच्या कारभारांत हिशेबांमध्यें चूक दृष्टीस पडली तेव्हां एकंदर धांदल उडून गरीब काळे लोक अन्नास मुकले आणि इन्कमटाक्स दुप्पट वाढला. एक टक्क्याचे दोन टक्के शेकडा झाले. आतां येत्या वर्षांत हा कर मुळींच नाहीसा होईल अशी कीं आशा होती तिची निराशा होऊन दोन टक्याचे चार टक्के प्रमाणें कर पुनःदुप्पट होणार अशी वंदता निघाली आहे. शाबास, याचें नाव राज्य रीती; आतां हा कर कोणासही म्हणजे युरोपियन व नेटिव यांतही पसंत नाहीं सरकार पैसा तर घेणारच; परंतु हा प्रकार कोणास बरा वाटत नाहीं. त्यांतून या कराविषयीं आतां विशेष बोभाटा होण्याचें कारण, याचें ओझें काळ्या व गोऱ्या दोन्ही डोकींवर पडतें. नुसत्या काळ्यांवर असतें तर मग त्याच्या गवगवा मुळींच झाला नसता. मग बांबे ग्याझेटसारखीं निष्पक्षपात व खऱ्याचअभिमानी अशीं वर्तमानपत्रें मुळींच मुकाट्यानें बसलीं असती. युरोपियन लोकांच्या मोठमोठ्या थैल्यांस यत्किंचित् स्पर्श झाल्यामुळें बांबेग्याझेटकर्त्यांच्या तळव्याची आग मस्तकापर्यंत पोंचली. त्यास अगदीं देहभान नाहींसें होऊन त्यांनीं गेल्या बुधवारच्या अंकांत आपल्या राज्याधिकार चालविणाऱ्या बांधवांस, आपल्या नेहमींच्या युरोपियन लोकांच्या थैल्यांत भर घालण्याच्या क्रमांत या करानें थोडें अंतर पडल्याबद्दल, यथास्थित बक्षीस दिलें आहे व त्यांची चांगली पूजा केली आहे. त्यांस हा कर घेण्याबद्दल दरोडखोर म्हटलें आहे आणि तो न देण्याबद्दल कितीही तक्रार केली तरी ती न्याय होणार आहे याजवरून तक्रार वाढविण्यास व दांडगाई करण्यास सरासरी अन्योक्तीनें उत्तेजन देतात असें होतें. परंतु आम्ही नेटिवांनीं [illegible] लोकांच्या संबंधानें यत्किंचित् अशा प्रकारचें लिहिणें लिहिलें असतें तर लागलीच राजद्रोही म्हणून ओरड केली असती.

असो, इतकेंच लिहून ते स्वस्थ बसते तर आम्ही त्यांस जात्याभिमानानें व स्वार्थानें अंध झाले आहेत म्हणून स्वस्थ बसलों असतों. परंतु यांतही त्याची आम्हा नेटिव लोकांविषयीं द्वेषबुद्धि व दुराग्रह पाहून आमच्यानें उगीच राहावत नाहीं त्यांस अत्यंत दुःख होऊन ते म्हणतात कीं, हा कर वसूल करणारे बहुतेक युरोपियन लोकांपासून पैसा बुचडून घेतात आणि सरकार आपल्या नोकरांच्या पगारांतून पैसा कापून घेतात; परंतु ज्या नेटिव लोकांकरितां ब्रिटिश लोक आपल्या प्रकृतीचा व आयुष्याचा नाश करून घेतात त्या नेटिव लोकांचा मोठा समुदाय सर्वस्वीं अथवा बहुतेक याजपासून मुक्त होतो आतां हें म्हणणें किती प्रमाण, व ख्रिस्तीधर्मानुयायी उदार मनाच्या इंग्रज लोकांस भूषणास्पद आहे याचा लोकांनीं विचार करावा. परंतु ग्याजेटकर्ते येथें देखील थांबत नाहींत मुंबई शहरचे प्रख्यात कामगार मि दोसाभाई फ्रामजी कडाकाउंगांनीं हा व असे कर वसूल करण्याचें काम बरेच दिवस केलें आहे त्यांनीं आपल्या अनुभवावरून ग्याजेट कर्त्यांस आपलें हें म्हणणें रास्त व प्रमाण नाहीं म्हणून सांगितलें असतां ग्याजेटकर्ते आपलाच हेका धंरून बसले आहेत. ग्याजेटकर्ते यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, पैसा युरोपियन व नेटिव लोकांचा सारखा जातो; परंतु नेटिव लोकांवर जसा जुलूम होऊन ज्याजपासून कायद्याप्रमाणे पैसा घेऊंनये, त्यांजपासून घेण्याचा कहर विशेषें करून बाहेरगावीं आहे तसा युरोपियन लोकांवर जुलूम होत नाहीं. त्यांच्याशीं अन्यायाचे वर्तन होत नाहीं. दुर्दैवानें युरोपियन लोकांप्रमाणें आमचे नेटिव लोक जात्याभिमानी व स्वदेशाभिमानी नाहींत याजमुळें नेटिव कामगार आपल्या देशबांधवांवरच अतिशय जुलूम करतात व त्याजशीं अन्यायानें वागतात. असो, या सर्व गोष्टि निरुपायाच्या व दुर्दैवाच्या आहेत. सारांश इतकाच कीं, हा कर चालू ठेवणें हेंच अगोदर अयोग्य त्यांत आणखी तो वाढविणें यास कोणी बरें ह्मणणार नाहीं यांत संशय. नाहीं सर रिचर्ड टेंपल जरी हा कर वाढविण्यास तयार असतील तथापि गवर्नर जनरल याचा नीट विचार करतील अशी आम्ही आशा करतों

## स्वामिंचें पुण्यांस आगमन व त्यांस सूचना.

आलीकडे पुनर्विवाहाबद्दल जिकडे जावें तीकडे टिका चाललेली आहे. जिकडे नदर फेकावी तिकडे सर्वांचे तोंडी हा विषय आहेत, याचा परिणाम कोणचे तऱ्हेवर जाईल याजविषयीं सर्वांचे डोळे चातका प्रमाणें लागले आहेत, याचे मंडण खंडणाची वेळ याचे प्रतिमागें रा. रा. विष्णुबावा अण्णानी मागें चार महिन्यांचे पाठिमागें आणली व त्याप्रमाणे उभय पक्षाकडील कडेकोट तयारी होऊन उभयतां बीर पुणें मुक्कामीं ही गेले परंतु उभयतांचा सामना

तर झाला नाहींच परंतु उभयतांही आपआपले ठिकाणीं आपसाआपसांत चर्चेस आरंभ करून सर्व जगास त्यांनी असंतुष्ठ केल्याबद्दल सर्वांची खात्री झाली यांत उभयतांही आपआपला पक्ष खरा आहे असें घोकीत विष्णुशास्त्री मुंबईस गेले व त्यांचे पाठीमागें विठोबाअण्णा हो मुंबईस गेले जरें मुंबईस जाऊन तरी उभयतांच्या वादाचा सामना झाला असें नाहींच परंतु श्री. रा. भाऊसाहेब बिवलकर यांचे घरीं विष्णुशास्त्री यांस न फाविल अशा दिवशीं त्यांस बोलावणें केलें तेव्हां अर्थातच शास्त्रीबुवांस दुसरे सभेस जाणें होते म्हणून फावलें नाहीं तेव्हां तिकडील पक्षांनी विष्णुशास्त्री न आल्याबद्दल बराच गवगवा केला व तो गवगवा खरा नव्हता अशाबद्दल शास्त्रीबुवांनीं इंदुप्रकाश पत्रांतून छापून प्रसिद्धही केलेंच अशा या वेळीं विठोबा अण्णास आपली थैली भरण्यास बराच वेळ सांपडला व आपली तुंबडिही भरीत आहेत आतां उभयतांमध्यें कोणाचा पक्षखरा आहे याजविषयीं निर्णय सध्या आमच्याने करवत नाहीं हें अगदीं रास्त आहे तरी विठोबा अण्णांची शैली लपंछपं करण्याची आहे असें स्पष्ट दिसतें.

प्राणीमात्रांमध्यें म्हणून जितक्या जाती आहेत तितक्या जातींमध्यें ब्राह्मण हे सर्वांचे गुरू आहेत व त्यांनीं कोणचेही जातींत धर्मप्रकरणीं, जाती प्रकरणीं व आणखी कांहीं दुसऱ्या बाबतिमध्यें जर तंटा पडला तर त्यांनीं न्याय करावा अतां या ब्राम्हणामध्येंच जर धर्मामुळें दुफळ्या झाल्या आहेत तर त्यांचा न्याय करणें जसें खालच्या कोर्टांमधें पक्षकारांचा मोकदमा एकतर्फी किंवा समूळ काढून टाकला असेल तर त्याचेवर दुसरें कोर्ट तयार आहेच तेथें त्याचे संमताप्रमाणें न झाला तर हायकोर्टापर्यंत भांडण्यास जागा आहेत तद्वत आमच्या ब्राह्मणामधें तंटा पडला तर आमचे धर्माचा न्याय मनसुबा करण्यास श्री गुरू शंकराचार्य हे होत व यांचें स्थान हें हायकोर्ट आहे व गुरुमहाराज हे न्यायाधीश आहेत तेव्हां यानी जो न्याय करणें तो अगदीं निःस्पृह बुद्धीनें केला पाहिजे व तो सर्वांस मान्यही झाला पाहिजे हायकोर्टांतून हुकूम सुटला म्हणजे जसा तो उपयोगांत आणावयास राज्यसत्तेमुळें उशीर लागत नाहीं त्याप्रमाणे आमचे श्रीगुरू शंकराचार्यांस जरी आमचे धर्माचे बाबदींत हायकोर्टांतिल न्यायाधिशाचा अधिकार आहे तरी तो अगदीं पुळपुळीत आहे असें समजलें पाहिजे कारण जो हुकूम सांगतील तो जर बहुमत्ताने सर्वांचे फायद्याचा असेल तर सर्व मनत्याप्रमाणे वागणार आहेत नाहीं तर आग्रही भटाभिशुकाचे नादीलागून न्यायान्याय, सांप्रतची अवश्यकता लोकांच्या मनाचे एकदरींत ग्रह, ह्या सर्व गोष्टींचा विचार करून जर स्वामी न वागतील तर त्यांचें गादीचा व त्यांचा मान न राहून ते ईकडे आपलें संस्थान सोडून आल्याचे सार्थक होणार नाहीं.

वाचकहो तुम्हांस माहीतच आहे की, आपल्या धर्मामधें मोठा टोलेजंग जगवाद उपस्थीत झाला आहे व त्यान विषयीं आलीकडील सर्व नवीन शीकलेले मत्ताचे लोक तो खराब सशास्त्र आहे असें म्हणतात व दुसरें पुरातन भटाभिशुक, जेंऊगीच हट्ट सपेटून आजपर्यंत चालत आलेली चाल आहे तीचखरी व याकामांत आम्हीं सशास्त्र अशास्त्र काहीं जाणत नाहीं असें ही म्हणतात व जे एक पैशाकरिता सर्व शास्त्रार्थ एकीकडे ठेऊन हलक्या जातीचे लोकांचे घरी जाऊन यांचना करतात व वेदाचा आशिर्वाद देतात त्या लोकांस हो नवीन चालकाढलेली न आवडून उगीच घसघस घालित बसले आहेत; त्यास आपले बरें वाइटाचें कसें समजत नाहीं स्वत: शाहाणपण नाहीं व दुसऱ्या ने सागीतलेले ऐकावयाचे नाहीं. ईश्वरा आपले पुरातन ब्राम्हणांचे डोक्यातून ह्या घाणेडर्या कल्पना कां काढवीत नाहींस तूं खऱ्याचा सार्थी आहेस जें खरें आहे तें तुला सर्व काळ आवडतें असे असून हे चांगले काम असतां यामध आपण्या विषयींची डोळें झाक कां जरे करतोस! नाहीं तू तसें कधीही करावयाचा नाहीं चागल्या उपयुक्त कामास प्रथमारंभी अनेक संकटें येतात व तीसर्वपरिणामी चांगली होतात त्याप्रमाणेच ह्या कामांसही पहील्याने वही एकार रूपीपोकळ शास्त्र पुरातन ब्राम्हणांकडून उत्पन्न करवून त्याचा शेवट चांगले प्रकारें आमचे ब्राम्हणाचे गुरू त्यांजकडून देवविणार म्हणून त्यांस आपले स्थानसोडून इकडे आणविलें असे वाटतें असो आतां गुरूंनी मागेंपुढें विचार नकरीता आम्हीं खाली लिहिलेल्या सुचने प्रमाणें वर्तल्यास कोणाचा ही दोशारोप न येता हेतकृत्य शेवटास जाईल.

गरू महाराज आपण ज्या कामांकरितां आपली जागा सोडून व येवढा परदेश होक्यावर घेतला आहे त्याचे निराकारण उभयता मध्यें कधीही व्हावयाचे नाही व वाद ही संपावयाचा नाही कारण भट हे आग्रही हे बेखोर, दुष्ट, व अळशी असल्याने त्यांस उदर नीर्वाहा करितां त्यांनी उगीच थोतांडाने मोठें अवडंबर घालून भांडण काढले आहे व त्यांचे मनातून पुनर्विवाह करावा असें जरीं आहे तरीं ते पढत मुर्ख असल्याने आपला हट्ट कधीही सोडावयाचे नाहीत व त्यांनी हट नसोडालतर मग अर्थातच जेथल्या तेथें सर्वांस स्वस्थ बसले पाहीजे तर महाराज आपण दोन्ही पक्षाचे वाद एकून घेऊन जें खरें असेल तें उभय पक्षांस सांगून सर्वांस एक विचारानें राहण्यास सांगावें किंवा महाराज आपण आपला सर्व मोठेपणा एकिकडे ठेऊन वर्तमानपत्रद्वारें वादास सुरूवात करावी म्हणजे सर्व लोकांस तो समजून जे दुराग्रही लोक नाहींत त्यांची खात्री होऊन ते सहजिक खऱ्या खोटयाचा निर्णय करतील असें केल्यानें आपण न्याय केला किंवा दुराग्रहानें अन्याय केला याजविषयीं शंकाही न रहातां खटकर निकाल झाल्या सारखेच होईल व ज्याप्रमाणें आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें न करितां आंतलेआंत पंच सरपंच नेमून जरी लेखीं वाद केला तरी तो वाद गुप्त राहून लोकांच्या ज्या वांकडया समजुती तशाच्या तशा कायमच रहातील व त्यापासून लुच्चे लबाड, यांस अधिक स्फुरण येऊन मन मानेल त्याप्रमाणें कंडया उठविण्यास संधी सांपडेल तर गुरुमहाराज ज्या प्रकारानें या जगाचें चांगलें व हीत होईल त्याप्रमाणेंच करून आपल्यास व आपल्या गादीस दोष न लागून सर्व लोक आपल्यास मनोभावें मानतील अशी तजवीज करा येणेंकरून आपण केलेल्या सत्कृत्याची निरंतर आठवण राहून आपल्यास सर्व लहान व थोर गरीब दुवा देऊन आपले गुणानुवादाचे पवाडे या जगांत सर्व लोक गातील तर पुनः स्वामीस हात जोडून असें सुचवितों कीं, सध्याचे कालमानाकडे लक्ष देऊन जें करणें तें करावें.

## मानपत्र.

आम्हास आमचे चिखलीच मित्राकडून तेथील तहशिलदार साहेबरामराव गोविंदयांस गावांतलि शेट सावकार व दुसरे कांहीं सभ्य गृहस्थांकडून मानपत्र देण्याकरितां तारीख २७ रोजीं सभा भरली होती परंतु तहशिलदार साहेबांनीं सर्वांस कळविले कीं आमचे वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून परमाणगीशिवाय आमच्यानें घेववत नाहीं ह्मणून ते आमचें पत्रद्वारें त्यांस देण्याकरितां व प्रसिद्ध व्हावयाकरितां आलेलें आम्ही आजचे अंकांत खालीं लिहलेप्रमाणें प्रसिद्ध करतों यानकडे सर्व वाचकांनीं लक्ष पुरवावें आतां त्यांनीं मानपत्र घेतलें नाहीं तेव्हां त्यांनी आपली निःस्पृहता दाखविली खरी व हें पाहून आह्मांस आनंद झाला परंतु अशी निःपृहता सगळेच कामांत असली म्हणजे बस आहे.

श्रीमंत राजमान्याराजेश्री रामराम गोविंद उर्फ भाऊसाहेब तहसीलदार ता॰ चिखली जि॰ बुल्ढाणें यांसी.

आम्हीं खालीं सह्या करणारे जमेदार, पाटील,पटवारी,सावकार, इत्यादी,तालुका चिखली येथें राहाणारे लोक आपणापाशीं फार नम्रतेनें व सन्मानपूर्वक पणें येऊन आमचे कृतज्ञतेचे व आभारी पणाचे विचार या मान पत्र रूपी लेखानें प्रदर्शित करितों, ते ऐकून घेऊन आपण आत्यादरानें स्विकारतील अशी आमची सबाह्याभ्यंतर इच्छा व प्रार्थना आहे.

१ आपली सन १८६७ चे आगष्ट महिन्यात मेहेकराहून या तालुक्यांत बदली झाली; तेव्हां पासून आजपर्यंत सुमोर तीन वर्षें झाली. इतक्या मुदतींत, आपण आमच्या सुखांकरितां जे लोकोत्तर श्रम लोकोपयोगीं कामें करण्यांत व अनेक इतर रीतीच्या सुधारणा करण्यांत केले आहेत ते आह्मी आभार पूर्वक वर्णू लागल्यास फार विस्तार होईल. ह्मणून संक्षिप्त रीतीनें कांहीं गोष्टी लिहितो.

२ या तीन वर्षांत सरकारी काम करण्यामध्यें जी निस्पृहता, अनुपम काम करण्याची शैली, आणि सरकारचें नुकसान न करितां आम्हा लोकांचे हिता विषयींचे जे आपले सतत प्रयत्न, आमचे दृष्टोत्पतीस आले त्याचे ठसे आमचे अंत:करणावर इतके दृढ झाले आहेत कीं, ते कधींही नाहिसे होणार नाहींत.

३ सरकारानें आपणास दिलेले अधीकार इतके महत्वाचे आहेत कीं, ते जर आपलें कर्तव्य कर्म स्मरून व इश्वरास आपण भिवून चालविले नसते तर आमचा निभाव न होता. पुष्कळ अनाहित झालें असतें; परंतु त्या अधीकाराच्या योगानें आम्हांस आपण जे सुख दिलें आहे. तें आमच्या स्मरणांतून कधींही जाणार नाहीं.

४ या तालुक्यात लोकोपयोगी कामें करण्या कडे आपलें कितपत विशेष लक्ष होतें, याच्या खुणा तालूक्यातील रस्ते, विहीरींचा जिर्णोद्धार व प्रवासी लोकांस उतरण्याची सोई, प्राय: ठिकाठिकाणीं केल्या आहेत, त्या स्मारक झाल्या वाचून रहाणार नाहींत. मुख्यत्वें करून तर तालुक्याचे ठिकाणीं असल्या प्रकारचे कामाचीं वर्णनीय कृत्यें झालीं आहेत. तेथील बाजार व त्यामधील झाडें, तशीच रस्त्यांची दुरस्ती यामुळें जी शोभा आली आहे तिजकडे लक्ष दिलें असतां आपले, कारकीर्दींत ज्या गोष्टी झाल्या आहेत त्या इंग्रजी आल्या पासून इकडे झाल्या नव्हत्या, असें म्हणण्यांत आम्ही दोषी होऊं असें आम्हास वाटत नाहीं.

आपले न्याईपणा विषयीं व निःपक्ष पाता विषयीं आमच्या अल्प समजूतीनें आम्ही जेव्हढें वर्णन करूं तेव्हढें थोडेच होणार आहे. असा येक ही प्रसंग आम्हांस आठवत नाहीं कीं, अमक्या वेळीं आपण बुद्धी पुरस्सर अन्यायानें येकाद्याचे अनहीत करून मन दुखाविलें आहे. आपला न्याय सर्वांस मान्य झाला याचा दाखला फार दुरून शोधून आणायास नको. कारण केलेल्या फैसल्यावर अपील झालें असेल असे खटले फारच थोडे आढळतील.

६ या तालुक्यांत सुमारें साडेतीनशें गांव आहेत. तर त्यापैकीं कोणाच्या गरजा कशा आहेत, व त्यांस सुख दुःख कोणत्या प्रकारानें होत आहे, हें आपण वारंवार तालुक्यांत फिरल्यामुळें व लोकांशीं विचार पुस केल्या मुळें ध्यानांत येऊन, त्या गरजा पुरविण्या मध्यें व त्या सुख दुःखाचा परीहार करण्या मध्यें आपण विशेष लक्ष पुरविलें, याचें आम्ही येथें अधिक विवरण करीत नाहीं.

७ आतां आपली बदली झाल्यामुळें आपले सारखे सभ्य व विवेकी थोर गृहस्थांचें कृपारूप छत्र दुर्दैवें करून आम्हावरून निघून जाणार म्हणून आम्हीं फार दिलगीर आहों; परंतु असें होऊं न देणें हो निरूपायाची गोष्ट आहे. आतां ज्या ठिकाणी आपण जाणार तेथें येथच्या पेक्षां विशेष बढती होऊन सरकारास आपल्या हुशारीचा जास्ती अनुभव येऊन आपला दर्जा दिवसा नुदिवस अधिक महत्वाच्या कामीं होवो. अशी आमची सर्व शक्तिमान जगन्नी यंत्या पाशीं प्रार्थना आहे.

खालीं सह्या सुमारें शंभर.

## HINDU WIDOW-MARRIAGE.

*(Indu Prakash.)*

Rao Bahadoor Moroba Kanoba, our well known townsman of the Patharay Prabhu caste, on Saturday the 26th instant at 11 A.M. married a young handsome lady, aged about 21 years, named Bhulibai, the daughter of Mr. Bhavanishanker Raghavanand Soumitra, and widow of the late Vasudew Raghunath Dadaji, here after to be called Bai Sumitra or Nanibai, also belonging to the same caste as Mr. Moroba and having very respectable family connection.

The ceremony was performed in a quiet manner, strictly in the same fashion as in the case of first marriages, assisted by a Brahmin priest and several Prabhu ladies conduct. Caste tyranny will no longer prevail against the progress of humanity.

and gentlemen headed by our worthy magistrate, Mr. Nana Moroji, and his family. There were present several gentlemen of other castes also who came to witness and take part in the ceremony. Mr. Moroba and his grave and educated friends were considerably affected at the critical moment, to see realized their long cherished wishes, in despite of insurmountable difficulties. The romance of real life is far greater than fiction can represent.

Mr. Moroba has been a sincere and earnest advocate of this hummane reform nearly all his life. Seeing his own young daughter widowed, he very naturally suggested that she might be remarried, but the caste and family opposition proved too strong and broke almost his spirit. This event gave a new turn to his life and the introduction of widow marriage became the all absorbing idea of his earnest and energetic soul. In the hope of inducing his beloved daughter to put an end to her lifelong misery, he adopted a system of practice to break the superstitious horror which silly Hindus alone attached to widow marriage. Being baffled on all sides and disgusted at the inhuman cowardice and superstition of his own countrymen Mr. Moroba saw no hope for the solution of his difficulty except by marrying a widow himself, and to fulfil this idea he indefatigably worked. This is the true key to oll his conduct. Although other people may say what they please as to his eccentricities we for our own part admire his moral courage and philanthropy which we trust may have a salutary effect upon youngmen and women. We fully appreciate the valu of his having crushed a grate bug-bear of an idea which torments a portion of Hindu society.

We sincerely hope that Mr. Moroba now that he has gained the grate point of his life will enjoy the blessing of retirement.

We do not know what number of the Prabhu caste will side with Mr. Moroba; but we are almost perfectly sure that our worthy magistrate, Mr. Nana Moroji; who is so well known for his firmness, honestly and boldness, will side with his friend Mr. Moroba, and this we can very well gather from the bold speech that he made at the meeting of the Pathare Reform Association held on the 26th May last at the house of Mr. Moroba.

Now that the Shastris from the remotest parts having been called together by one of the Shankarachary as a grand solemn council is being held at this moment in Poona for the purpose of suppressing the widow marriage movement by thundering anathemas of ex-comunication against all those who were engaged in the marriage of Venubai. Vishnu Shastri Pundit has challenged them to justify their proceedings on the ground of the Shastras which unequivocally sanction widow marriage, but the meaning of which has been perverted by priestcraft. Vishnu Shastri is fighting single-handed against a host of Shastri, who, instead of trying to discuss and ascertain the truth in an impartial manner as between themselves, seem to direct their united hostility against the crushing one individual. Let this awful Brahman assembly pause for a moment and draw a lesson from Mr. Moroba's

## वऱ्हाड

हैदराबाद येथील दिवाण सर सालरजंग आणि रेसिडेंट मेहेरबान सांडर्स साहेब हे तारीख २९ रोजीं कलकत्याहून मद्रासेस आगबोटींतून रवाना झाले असें मुं. ग्याझिटवरून कळतें.

मुं. ग्या. वरून असें कळतें कीं उमरावती रेलवेची शाखा एकदम सुरू करणार व वर्धा नदीच्या कांठीं कोळशाचा शोध लागल्यामुळें त्या बाजूस रेलवे करण्याचा उद्देशानें जमिनीची पहाणी करण्याकरितां कांहीं कामगारांची योजना झाली आहे.

खामगांव येथील स्मालकाज कोर्टाचे जज्ज मे. ऊड हौसाहेब यांस हैदराबाद येथें आफिसीयेटींग असि. रसिडेंट नेमलें. व ते हैदराबादेस गेल्याचेंही समजतें.

उमरावती—मागील आठवड्यांत एक ब्राह्मणाचा मुलगा सुमारें उमर वर्षे २० चा आपल्या घरांतील बिळें बुजवीत असतां सर्पदंश होऊन मृत्यू पावला.

बाळापूर येथील चीफ कोनस्टेबल टाऊन पोलीस यांचा एक वर्ग कमी केल्याचें समजतें यास कोणचे कारणानें कमी केलें याचा खुलासा समजला नाहीं तरी आमचा बातमिदार याजविषयीं खुलासा कळवील अशी आशा आहे.

ता. २६ माहे मार्च रोजीं पातुरचे ईलाख्यांत अलेगांव येथें फकीरचंद कलाल याचे घरांवर डाका पडला चोरी सुमारें १८१४ रुपयांची झाली. ह्या चोरीचे तपासास क्यापटन जेमिसन साहेब आणि मुनारीक अली इन्स्पेक्टर हे गेले आहेत ह्या कामी साहेब बहादूर व इन्स्पेक्टर साहेब चांगलें लक्ष पुरऊन चोरीचा माग काढतील अशी आशा आहे.

बुलढाणें येथील डेप्युटी कमिशनर चे हपीसांतील दुसरे क्लार्क बापुजी हरी यांस तारीख १९ मार्च रोजीं च्यार्ज देण्याची परवाणगी मिळांबी, ह्यास वाशीम येथील डेपुटी कमिशनरचे हपीसांत हेड क्लार्क नेमले यांचे जाण्याने बुलढाणेकर मंडळीस वाईट वाटल्या वांचून रहाणार नाहीं. बुलढाणें येथील डेप्युटी कमिशनरचे हापितातील वर्गांवर्गीत बापुरावजींनी सरते शेवटची ४० रुपयाची जागा आपले जावयास देवविली हुशारीचे नावानें अवळ्या येवढें पुण्य असे एका विश्वासनीय पत्रांवरून समजतें.

हवामान ,या आठवड्यात कधी कधी अतीशय उष्णता होत होती व कधी कधी परजन्याची ही सुरवात व्हावी याप्रमाणें हवेचा बेभरवसा झाला आहे.

मे. ए. सी डनलाप असीस्टंट कटन कमिशनर यानी अकोले डिस्ट्रीक्ट येथील असिस्टट कमिशनरचा च्यार्ज घेतला त्याचप्रणें सदरील साहेबांकडे टेंपल बगीच्याची देखरेखीचें बसर्वव्यवस्थाचे कामदोल

कमिशनर, डेप्युटी कमिशनर साहेबांच्या स्वाऱ्या सध्या येथच आहेत.

डाकटर आर. टी. आवट हे गैरहजर आहेत तोंपर्यंत किंवा दुसरा हुकूम होई तोंपर्यंत मे. ए. पोरटर एम डी असि. सरजन व जेल सु. टेंडेंट यांस सेनीटरी कमिशनर आणि देवी काढण्यावर नेमले असें कळतें

रेलवे गाडीचे वेळांमध्यें फरक जी गाडी मुंबईहून नागपुरास जाण्याकरितां सकाळीं सात वाजून ४० मिनीटांनी निघत होती ती ते वेळेस ननिघतां ८ वाजून ३० मिनिटांनी निघून येथें दुसरे दिवशीं सकाळीं ६ ५५ वाजतां येऊन नागपुरास ४ वाजतां पोचेल व नागपुरची गाडी आठ वाजून १५ मिनिटांनीं निघल ती येथें सायाकाळीं सुमारें पांच वाजतां येईल व ती मुंईस दुसरे दिवशीं दोन प्रहरीं ३ वाजतां पोचेल.

मे० रामराव गोविंद मलकापूरचे तहसीलदार यांनीं अडगांव येथें जाऊन श्रीकृष्ण नरहर यांच जवळून च्यार्ज घेतला व श्रीकृष्ण नरहर हे सोमवारी येथें येऊन अफिसीयेटींग असिस्टंट कमिशनरचा च्यार्ज मे० बैमंजी भाईसाहेबां जवळून घेतील.

## वर्तमानसार.

पोर्टुगीज लोकांनीं गोंव्यांतील लश्करी लोक कमी केल्यावरून हल्लीं गोंव्यांत पलटणच्या लोकांनीं बंड केलें आहे.

पार्लमेंट सभेंत हिंदुस्थान संबंधी नवीन कायदा पास होत आहे तो हौस आफ लार्डसच्या सभेंत पास झाला. या कायद्यावरून सिविल सार्विसची परीक्षा न घेतां हुशार व लायक नेटिव नोकरांस त्या जागा मिळावयाच्या आहेत.

नागपूर इलाख्यांतील बालघाटचे डे: पुटी कमिशनर यांस जमिनीत फार पुरातन काळची वाकस किकरीं वगैरे तांब्याचीं हत्यारें सांपडलीं आहेत. ने. ओ.

पुनर्विवाह. याबाद्दाबद्दल श्रीगुरू शंकराचार्य हे पुण्यास आले आहेत असें आम्हीं मागें आपल्या वाचकांस कळविलेच आहेच आतां उभय पक्षांचे समत्ताने करार होऊन खालीलिहिलेले पंचनेमले उत्तेजक पक्षांकडील पंच कृष्णशास्त्री चिपळोणकर, व्यंकटशास्त्री माठे, रावजीशास्त्री आगाशे, व रामकृष्णगोपाळ भांडारकर, रघुनाथशास्त्री शेंडये सभेचेव्यवस्थापक रामचद्रशास्त्री हरडीकर व रामजी रामचंद्र साठें यणेंप्रमाणें निषध पक्षांकडील, गणशशास्त्री कोल्टकर इंदूर भाऊशास्त्री गोडबोले पुणें, भिकाच्यार्य एनापुरे वाई दिनकरशास्त्री रुद्राबाटेकर वाई नाशीक, उभयतां कडील वाद करणारें उत्तेजक पक्षांकडील विष्णुशास्त्री व निशेध पक्षांकडील नारायणाच्यार्य हे आहेत.

एणें प्रमाणें पंच व उभयपक्षां कडील तयारी होऊन गेले रविवारी सायंकाळी वादास अरंभ झाला, निर्णयांकडें सर्वांचे डोळें लागले अहेत, वादाचा वेळ दोन प्रहरी दोन वाजल्या पासून संध्याकाळी सहावाजे तो पर्यंत आहे.

कपुरथळ्याचे महाराज गेले शनवारीं आगबोटींत बसून विलायतेस गेले. चालीप्रमाणें त्यांस सरकारांतून तोफांची सलामी झाली.

कुंमट्याचे बंदर येथें ता० २४ मार्च रोजी रात्रीं आगलागून पुष्कळ कापुस जळाला व दोनशे घरेंही जळाली या आगी पासून फार तोटा झाला असें मुंबई ग्याझिट वरून कळतें.

ग्याझिट वरून कळतें कीं कलकत्ता येथील कारखान्यांस ड्यूक साहेबांनीं सेलर्स होम यांस रु. १०००; सीसेन्स मिशन याखायास रु. ३००; फ्रीचर्च स्कूलरु. २०० व डिस्ट्रिकट चारिटेबल सोसायटीस रु. ५०० या प्रमाणें देणग्या दिल्या.

सर रिच्यर्ड टेंपल साहेब हे तारीख २ एप्रिलचे दिवशीं जमाखर्चाचे स्टेटमेंट करतील आणि त्याजविषयींची वाटाघाट दोन दिवस पर्यंत होईल असें बांबे ग्याझीट वरून कळतें.

सर रिच्यर्ड टेंपल साहेबानीं करेन्सी खात्या कडील ठवलेल्या पैशाची मुदत वाढवीण्याचे बील व्हाईस राय यांचे कौंसला पुढें टेवलें.

लार्ड नेपियर साहेब विलायते हून या महीन्याचे मध्यें तरी मुंबईस येतील तेथुन साहेब बहादुर मुलतान व लाहोर मार्गाने पेशावरास जाऊन तेथून सीमल्यास जातील.

आपले प्रख्यात माजी गवरनर सर बार्टल फ्रियर हे ह्यानी विलायतेहुन कर्नल फिलीप हायदराबाद येथील कलेक्टर यांचे बरोबर आपली मोठ्या साच्याची तजवीर काढवून खानबाहादुर अखुंद हाबिबुल्ल शहा बंदर येतील माजी डेप्युटी कलेक्टर यांस नजर पाटविली असें बांबे ग्या. वरून कळतें.

"टैम्स आफ् इन्डियावरून कळतें कीं मि. दादाभाई नौरोजी यांस ईस्टइन्डिया आसोशिएशनचे आनररी सेक्रेटारी नमलें.

"फ्रेन्ड आफ् इन्डिया" वरून कळतें कीं, पूर्वींचा कान्सल जनरल फ्रान्सिस याच्या घरी मोठ्या भयंकर रीतीनें खून झाला. कान्सल याची बायको आपल्या बुट्लराला कांहीं बोलली त्यामुळें त्या बुटलराने तिच्या नवऱ्या समक्ष तिचा गळा कापला. हा नवरा पूर्वीं भारीं बळकठ होता पण हल्ली अर्धांग वायूच्या सपाट्यांत असल्यामुळें त्यास हें कृत्य निमूटपणें पाहावें लागलें.

इन्डियन डेल्मीन्यूज वरून कळतें कीं राजशाई परगण्याचे माजिस्त्रट मि. हम्प्री यांच्या तिजोरींत ६००० रुपयांची लूट झाली त्याबद्दल त्यांच्याकडून खात्री जोगा जबाब मिळाला नाहीं म्हणून कमी करण्याविषयीं कलकत्याचे लेफटेनन्ट गव्हर्नर ह्यांणीं लिहिलें. तें लिहिणें मंजूर होऊन माजिस्त्रठ यांस राजीनामा देण्याविषयीं लिहून गेलें.

**ख्रिस्तियन धर्माचा स्विकार**— कोणत्याही गोष्टीची खात्री झाल्यापेक्षां आपिषाचे महत्व विशेश आहे. "मुंबई टैम्स" वरून कलतें कीं, टिव्हान्ड्रा येथील सदर कोर्टाचे पहिले जज्य सदाशिव पिली याचे बंधू दिवाण पेशकर शिवगुरु पिली, हे ख्रिस्ती धर्म स्विकारणार आहेत, इतकेंच नाहीं पण जरीं त्यांचे लग्न झालेलें आहे तरी ते एका ख्रिस्तियन तरुण बाईशीं लग्न करणार आहेत. "कोचीन आर्गस" पत्र कर्ते इच्छा करितात कीं, हा अन्य धर्म स्विकार खात्री पुर:सर करो. आमचे वाचक "खात्री पुर:सर कीं अपीष लोभ मुळक" या विषयीं निर्णय करितील.

फ्रेंड आफ इंडिया पत्रांवरून असें कळतें कीं गेल्या दोन तीन वर्षांत रूस लोकांनीं मध्यें एशियात जो मुलख काबीज केला तो आपल्या हालींच्या आवरण शक्तीपेक्षां अधीक झाला व काबिज केलेल्या मुलखाचे उत्पन्ना पेक्षां तो साभाळण्यास खर्च फार येतो या कारणा करितां रूस सरकारानीं बुखाऱ्याच्या बादशाहा पासून घेतलेलें समर्कंद त्यांस परत देणार.

ने० ओ०

आन. मि जस्टिस वेस्ट्राप यांची नुक्तीच येथील चीफ जस्टिसच्या जाग्यावर नेमणूक झाली आणि त्यास आता सर असा किताब मिळाला असें विलायतच्या तारेवरून कळतें.

मोफसिलैट कर्यांच्या ऐकण्यात आलें आलें आहे कीं, हिंदुस्थानांतील एकंदर मनुष्यगणतीची तारीख सन १८७१ ची १५ वी नोवंबर ही नेमली.

कोचीन आर्गस वरून कळतें कीं, कोचीन ऐथें होगान नावाचा एक युरोपियन येऊन आपण गरीब आहों, आपले कोलंबो येथें पुष्कळ ओळखीचे आहेत, तेथें आपणास नोकरी सहज मिळेल अशा प्रकारच्या गोष्टी सांगितल्यावरून तेथील लोकांनीं त्याची कोलंबोस जाण्याची सोय करून दिली. हल्लीं असें समजतें कीं, तो मुसलमान झालेल्या दोन युरोपीयनाबरोबर फिरत आहे, तो मुसलमान लोकांत पट्टी करून पैसा जमा करीत आहे, व आपण ही लौकरच मुसलमान होणार आहे.

## जाहिरखबरा.

### जाहिरात.

सन १८६७।६८।६९ चे आक्ट.

सन १८६७ पैकीं कांहीं व सन १८६८।६९ पैकीं सर्व मराठी आक्ट आणि सरकारचे कांहीं ठराव मिळून एकंदर बुक बांधून तयार झालें आहे, ज्या कोणास घेण्याची मर्जी असेल त्याणीं किंमत रुपये २।८ व टपाल खर्च ।८ एकूण तीन रुपये पाठविले असतां बुक रवाना करण्यांत येईल. व हें न्यायाश्रय आफिसांत विकत मिळेल, तिकीटा पाठविल्यास एक आणा दराच्या असून वर्तळ्यासुद्धां असाव्या. ह्या संबंधीं कोणी पत्रेंवगैरे पाठविल्यास पत्र पोस्टपेड असावी. नाटपेड घेतलें जाणार नाहीं.

ता० २७ मार्च सन १८७० } त्रिंबकराव नारायण राजमाचीकर न्यायाश्रय मुक्काम पुणें.

### विश्वासराव.

सर्वत्रांस कळावें कीं, आम्हीं हल्लीं एक नवीन पुस्तक विश्वराव नामें मराठी आर्येत तयार करून "पुणें ज्ञानप्रकाश" छापखान्यांत देवनागरीचे सुंदर टाइपावर छापण्यास दिलें आहे. तें मे सन मजकूर महिन्यांत छापून तयार होईल.

यांत शृंगार, वीर, करुणा, शोक, विनोद, इत्यादि रस असोन दहा भाग आहेत. हें पुस्तक (पूर्वी स्वतः केलेल्या मंजुघोषा )पुस्तका येवढें होईल. यांत कित्येक ठिकाणीं अकस्मात घडून आलेलीं आश्चर्यकारक कृत्यें अंतःकरणास रंजविणारीं आहेत; व सातवे भागांत कांहीं कविता बहुतेक सुरस वृत्तांची आहे.

हें घेण्याची ज्यांचीइच्छा असेल त्यांस आगाऊ किंमत मे महिन्याचे आंत प्रत्येक पुस्तकास १ रुपया शिवाय टपाल खर्च ।२ आणे पडेल. सदर्हू मुदतीचे पुढें घेणारांस एक रुपया चार आणे पडून टपालखर्च वेगळा द्यावा लागेल.

याची कींमत पाठविणें झाल्यास खालीं लिहिलेल ठिकाणीं पाठवावी.

१. पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर यांजकडे.

२. मुंबईत—रा० रा० माधवराव चिमणाजी आपटे बी. ए. श्री० रा० रा० जगन्नाथ शंकरशेटजी यांचे इंग्लिश स्कूलचे हेडमास्तर यांजकडे.

३. खानदेशांत— रा० रा० कृष्णशास्त्री दातार सिटीस्कुल हेडमास्तर धुळें यांजकडे.

४. संगमनेर जि० अहमनगर येथें रा० रा० गोविंद शंकर पिंपळखरे वकील मुनसिफ कोर्ट यांजकडे.

५. अहमदगर —रा०रा० सदाशिव एशवंत गाडबोले डे० रजिष्टर.

याप्रमाणें जशी ज्यांचीं सवड सांपडेल त्या त्या ठिकाणीं रोख कींमत, अथवा वर्तावळ्यासुद्धां तिकिटा पाठविल्यास बक्षशीर पुस्तकें मिळतील.

या पुस्तकास उदार आश्रय पुणें व मुंबई येथील मोठ मोठाले सभ्य व कामदार यांजकडून मिळाला आहे. असाच परिश्रमाचे साफल्यतेस सर्वांकडून मिळेल अशी पूर्ण आशा आहे.

मुक्काम पुणें, ता० १३ मार्च सन १८७०.

नारो सदाशिव रिसबूड हेडकारकून सोलापूर सब डि. पुना गि. प. ब. डी.

---

नोटिस—राजश्री ठाकुरशी गोपाळजी बेपारी वहिवाटदार भाणजी गोपाळजी, बेपारी बारदानावाले दुकान खामगांव यांस खालें सहिकरणार यांजकडून नोटिस देण्यात येते कि तारीख १७ मार्च सन १८७० रोजीं तुम्ही दलाल मार्फत आम्हासी बारदाना पल्ले २६० आडिचशे दरपल्ला रुपये १।— येक रुपया येक आणा प्रमाणें सवदा करून बारदाना तुम्हीं घेऊन जाऊन आमची रकम आम्हांस लागलीच नगदी देण्याची ठरल्या प्रमाणें आम्हीं तुम्हांस दररोज माल घेऊन जाण्याचे सांगत असतां तुम्हीं माल बारदाना घेऊन जात नाहीं व आमची रकम आम्हांस देत नाहीं सबब ही नोटिस तुम्हांस देण्यात येते कीं आजपासून ८ आठ दिवसाचे आंत आपला बारदाना घेऊन जाऊन आमची रकम आम्हांस द्यावी जर याप्रमाणें तुम्हीं न कराल तर आम्हीं बारदाना विकून टाकून आणि त्यांत जे नुकसान येईल ते या नोटिशीचे खर्चासह तुम्हाकडून भरून घेण्याकरितां कोर्ट मार्फत तजवीज कण्यांत येईल हें समजावें. तारीख २१ माहे मार्च सन १८७० इसवी.

सही कानजी केशवजी बेपारी मुंबईकर वहिवाटदार हेमराज केशवजी दुकान खामगांव यांची असे.

---

नोटिस—जानकीराम वल्लद रुपाराम रहाणार खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हीं आमचे सख्खे वडीलभाऊ आहा व मी अर्धभागाचा मालक असून तुम्हीं आपला बाप मरण पावला तेव्हां मातोश्रीची जिनगी सुमारें १२०० रुपयांची पुरून ठेवलेली ती काढली, व बापाची जिनगी रुपये ४०० व दोन घरें व एक दुकान या सर्वांची वांटणी करावयाची ती लांबणीवर घालून वांटणी करीत नाहींस तर ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत सर्व मालाची निमेनिम वांटणी करावी न कराल तर सरकारांत फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां किंमत व माल घेण्यांत येईल कळावें तारीख २८ मार्च सन १८७० इसवी.

( सही ) सुंदरलाल वल्लद रुपाराम रहाणार खामगांव.

---

नोटिस—रायभान वल्लद बाळाजी सेळके रहाणार हिंवरें प्रगणें खडके तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुजकडे आमचें येणें रुपये २३ व कापुस ।। पांच मण मित्ती श्रावण वद्य ७ शके १७९१ पर्यंत निघाले त्याप्रमाणें दिले नाहींस तर सदर्हू लिहिले रुपयांस दररुपयास ८॥ अर्धा आणा प्रमाणें सदरीं लिहिले मितिपासून व्याज सुद्धां रुपये व कापुस ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख २० माहे मार्च सन १८७०

[ सही ] रतनचंद आसकरण मारवाडी रा. दे. माळी.

---

नोटिस—जिवाजी वल्लद संक्राजी तुपकर रहाणार सांवगी तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुजकडे सारगुदरुपैकीं येणें कापुस ।।। साडेदहा मण व लावणीचा कापुस ।१ मण एकूण कापूस ।।१।। साडेअकरामण हा सालमजकूरचे हंगामावर देऊं असा ठराव केला असून त्याप्रमाणें दिला नाहींस, सबब दर खंडीस रुपये ७० भावाप्रमाणें व्याजसुद्धां रुपये जे होतील ते ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख २० माहे मार्च सन १८७० इसवी.

( सही ) रतनचंद आसकरण मारवाडी रा. दे. माळी.

---

नोटिस—सटवाजी वल्लद झिंगराजी माजतकर रहाणार मौजे देऊळगांव माळी तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं पुंजाजी व अयाजी वल्लद भोजाजी जाधव रहाणार मौजे मजकूर याजकडे आमचें येणें मुद्दल रुपये सुर्ती ४० चाळीस यास व्याज दरमहा दर शेंकडा २॥ रुपये प्रमाणें आहे बरहुकूम खत मिती श्रावण वद्य ३ तारीख ६ माहे आगष्ट सन १८६८ इसवीचे आहे त्याजवर उगवणी तुझी आहे त्याप्रमाणें मालक याणें रुपये दिले नाहीं म्हणून तुजला विचारलें असतां दिले नाहींस सबब तुजला ही नोटिस दिली आहे तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत सदरीं लिहिल्याप्रमाणें उलगडा करावा. न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील कळावें तारीख २० माहे मार्च सन १८७० इ.

[ सही ] रतनचंद आसकरण मारवाडी रा. दे. माळी.

---

नोटिस—चिरंजीव विटोबा कृष्णाप्पा मुंजाळ रहाणार बाळापुर यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्ही तारीख १२ मार्चचे वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांत जी नोटिस दिली आहे त्याचा जबाब याखालीं लिहिलेल्या मजकुरांत सर्व प्रकारचा आहे.

१. अम्हाला व माल जो वांटून घेणें तो तुम्हीं सर्व घेतला आहे.

२. रोकड जी वाटण्याची ती सर्व वाटून घेतली आहे.

३. गुप्त रक्कम जी म्हणतां तिजबद्दल जें तुम्हांस करणें तें करावें.

४. आतां फारकती पुरी करणें ती लौकर झाली पाहिजे ती या नोटिशीचे तारखेपासून ८ दिवसांत पुरी करून द्या नाहीं तर तुमचा हक्क वाटणी करण्याबद्दल फारकती देण्याचा पुरा झाला असें आम्हीं समजूं.

५. या सर्व गोष्टीचा निकाल फारकतीनें होणार आहे तो न होऊन दावा केला तर तुमचा व आमचा कोर्ट खर्च तुमचे शिरावर पडेल व तो तुम्ही सोशिलात असें आम्ही समजूं कळावें तारीख २६ माहे मार्च सन १८७० इसवी.

( सही ) धमाप्पा जानाबा मुंजाळ.

---

### जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें पुढील सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आंहेत. किंमत दर प्रतीस ।१ आणे.

---

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची आगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ६ |
| फुटकळ ... ... ... | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ६१२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तों १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

---

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होऊन तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ।१।६

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ।४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

### वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यात वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA:—SATURDAY EVENING, APRIL 9 1870 NO. 15

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ९ माहे एप्रिल सन १८७० इ० अंक १५


## कराचा बोज्या.

समुद्र व लयांकित पृथ्वीचें राज्य केलें, महान पराक्रम केले, यंत्रें शोधून अमानुषीं कृत्यें केलीं, कलाकौशल्यास शिखरावर चढवून विद्यावृद्धी जगभ्दर करविली, व्यापार विस्तारास्तव पावबून लोकांस उद्योगी केले, लोकांचे पोटांतील धर्म भोळेपणा काढून त्यास खऱ्या धर्मांत नेलें, आणि अशा प्रकारची बाह्य रंगानें उत्तम शोभणारीं असंख्य कृत्यें केलीं, तथापि अंतर्याम शुध्द व कनवाळू आणि दयार्द्र झाल्याशिवाय राजाचे हातून रयतेचें व्हावें तसें कल्याण होत नाहीं. खरें कल्याण करण्यास मनोविकारास स्वभावत. खरें स्फुरण आलें पाहिजे. तशा प्रकारचें खरें स्फुरण येऊन तादृश अविचारानें, अगर अज्ञानानें बाह्य रंगास किंचित विरूपता आल्यास चिंता नाहीं त्यापासून राजाकडून रयतेचें विहिताचारें करून पालन होऊन ती अखेरीस सुख सदनाप्रतच जाईल यांत संशय नाहीं. यांस उदाहरण, वेश्यांचें टीक मिळतें. त्यां बाह्यांगास विलक्षण शोभा आणून अत्यंत बाह्यप्रेम दाखवून मनुष्यास खूष करून टाकितात; व व्यसन पाशांत बद्ध झालेला मनुष्य तें सर्व खरें समजून तीस अत्यंत भोळी बनिषकपटी समजून तिच्या संबंधानें सर्वस्वास मुकतो. ती बाहेरून प्रेम दाखविते त्याच्या लक्षांस ही अंतर्यामीं द्रव नसतो. अंतःकरणात एक आत्महित साधनाचा विचार असून दुसरें कांहीं नसतें. तात्पर्य, मनुष्याचें त्यांत विशेषें करून राज्य कर्त्या राजाचें अंतःकरण कुल पतिव्रतेप्रमाणें साधे भोळें बाह्यरंगानें विशेष शोभणारें नसून फक्त अंतर्याम शुद्ध असावें. गणिकाप्रमाणें कार्यसाधू नसूनेय.

प्रस्तुत आमच्या इंग्रजसरकारची स्थिति व राज्य करण्याची शैली वारांगना भावप्रायः दिसत आहे बाहेरून पाहिलें असता राज्य बंदोबस्त अगदीं उत्तम दिसून मनास मोठा आनंद प्राप्त होतो; व असा राजा या समृद्ध हिंदुस्थानास मिळाला हे त्याचें मोठें नशीब असें वाटतें. परंतु या राज्यकर्त्यांचा अंतर्यामविचार या देशाविषयीं आहे याचा विचार केल्यास वरील उदाहरणाची साक्षांत् मूर्ति दिसून अशा थोर व उदार सरकारचें लक्ष स्वहित साधनीं तत्पर असून दीन प्रजेचे अकल्याणेच्छु असावें, हे मोठें आश्चर्य आहे असें वाटतें.

इंग्रजसरकारचें राज्य या मुलखांत झाल्या पासून बहुत गोष्टीवरून असें उघड दिसून आलें आहे कीं, या सरकाराचे विशेष लक्ष आपला देश व आपले युरोपियन लोक यांस पुष्कळ प्रयत्न करून सुखी करावें याकडे आहे काल परत्वे करून धुळीस मिळालेले, व मेल्यापेक्षां मेले झाले ज्या गरीब हिंदु जनास खऱ्या कळकळीनें त्यांचे स्थित्यंतर करून ऊर्जित दशेस आणावें हा बिलकुल दिसला नाहीं. परंतु मोठ्या विचारानें व धूर्ततेनें सत्कल्याण हेतु सर्व ठिकाणीं प्रदर्शित करून आत्म कल्याण शील सर्वत्र यांनीं धरिलें. यांस मागें तर शेंकडो उदाहरणें झालीं आहेत, परंतु सांप्रत ही एक नवीन दिसण्यांत आलें आहे तें कोणतें म्हणाल तर नवीन इनकम टयाक्स. याचें कारण असें आहे कीं, मे. सर रिचर्ड टेंपल साहेब बहादूर यांनीं कांहीं अकाउंन्ट संबंधी चूक करून त्याचें प्रायश्चित सर्वांस भोगावयास लाविलें आहे. आतां ती चूक होऊं नये आणि झाली तिची कोणत्या रीतीनें तरी दुरुस्ती करणें भाग आहे असें जर सरकार समजतें, तर सरकारानें कांहीं नुकसान आपण स्वतःवर घेऊन कांहीं तिच्या उत्पन्न करणारावर बसवावें. व थोडे बहुत रयतेवर ही बसविल्यास रयतेस त्याबद्दल वाईट वाटणार नाहीं. परंतु तसें न करतां सर्वच बोजा अन्नार्थी झालेल्या रयतेवर टाकिल्यास तिच्यानें कसा सहन होईल? क्षुद्रनें पीडितास एकादशी, प्रदोष, आणि शिवरात्र अशीं लागोपाठचीं उपोषणें जबरदस्तीनें परोक्षार्थींचे भुज्यथापीनें उपोषणें घातल्यास त्याचा प्राण कसा वाचेल? जर करितां नाइलाजच झाला असेल तर एखादें उपोषण घाला, कदाचित तो कंठीं प्राण देऊन तेवढा सहन करील. व तेणेंकरून परमार्थ सुखाचाही त्यास आनंद व कर्तव्य कर्म करण्याबद्दल उत्तेजन मिळल्या प्रमाणें होऊन उत्तरोत्तर अशीं कृत्यें करण्याचें दुःख वाटणार नाहीं.

आलिकडे आमचे सरकार वारंवार शुल्क कामाबद्दल प्रजेवर जुलमाचे करबसवूं लागलें आहे त्यामुळें जरी तो कर महत्वाचे कारणाचा असला अगर अगदीं हलका असला तथापि कर हीं अक्षरें कोठें दृष्टीस पडतांच बहुतेकांच्या कंबरा बसून जातात कित्येक लोक तर वर्तमानपत्र प्रथमतः हातीं आलें कीं प्रथम नवीन कर सरकारानें काढिला आहे कीं काय; हें पहाण्याकडे मन वळतें. व ती अक्षरें कोठें पत्रात दिसलीं म्हणजे एक आठवडा लोटला असा मनास धीर येतो. कारण या सरकाराचे राज्यांत सांप्रत सुखाच्या गोष्टी ऐकण्यांत फार कमी येतात, परंतु जुलूम व नवीन कायदे व अक्ट यांचीं सांकशनें वारंवार होतात, याची दहशत रात्रंदिवस मनुष्यास आहे, अशी दुःख क्लेशान्वित वाणी व करुण वचनें जिकडे तिकडे कर्ण संपुटांत पडतात.

आतां हा कर अशा प्रकारें बसविणार म्हणून ऐकतो कीं, युरोपियन लोकांवर याचा कांहीं अंमल होऊं न देतां फक्त बिन सनदी सरकारी नेटिव लोकांवर मात्र बसवावा असा खालविचार सरकारानें तूर्त योजिला आहे. वा! असे असेल तर कर बसविण्या करितां कायदे आणि आक्ट नवीन करण्याची तरी खटपट कशास पाहिजे. आमच्या पूर्वीच्या मुसलमान राज्य धुरंधर राज कर्त्यांचा किता घेतला म्हणजे बस आहे, जितके रुपये सरकारांस नुकसान आले असतील अगर जितके रुपये उत्पन्न व्हावें अशी इच्छा सरकारास झाली असेल तितके रुपये एका गांवांत एकाच नेटिवापाशीं कदाचित् निघतील त्यापासून घेऊन कार्य करावें म्हणजे झालें. शेंभरांचे कल्याणाकरितां एकास धुळीस मिळविल्यास त्यांत विशेष दोष आहे असें नाहीं तें सर्वांस मान्य होईल परंतु वारंवार सर्व प्रजेवर कराचा बोजा येणें हें सहन करण्यास फार दुःसह आहे.

वस्तुतः पाहिलें असता व बारीक रीतीनें विचार केला तर पूर्वींचीं अनुभवसिद्ध मनुष्यें व हल्लींची ही इंग्रजसरकारच्या राज्याचा पुष्कळ दिवस अनुभव घेतलेले सूक्ष्म विचारी लोक यांचीं मतें ताडलीं असतां असें उघड दिसून येतें कीं, हिंदू व मुसलमानीं राज्यें फार सुखावह होतीं व प्रस्तुतचें राज्यबाह्याकारें दिसण्यास चांगले परंतु परिणामीं दुःख उत्पादक आहे असा अखेरीस सिधांत करण्यास पुष्कळ दृढी करणें मिळतात.

आतां ह्या कराच्या बाबदी वरून या सरकारच्या पक्षपाताविषयींचें मोटें एक मूळ उपटलें आहे. ते वर लिहिण्यांत आलेंच आहे कीं, हा नवीन प्राप्तिवरील कर युरोपियनास सोडून फक्त नेटिवांवर मात्र बसणार वास्तविक म्हटलें म्हणजे इंग्लिश लोकांचे पगार मोठ मोठ असतात त्यास शेंकडा चार किंवा पांच रुपये दरमाहा कापून देण्यास कठीण वाटणार नाहीं. परंतु गरीब नेटिव ज्यांस मुळींच फार हलके पगार मिळतात अशांवर हा पटी बसवून व्यर्थ गवगवा अतिशय होऊन विशेष मोठीशी रकम कधींही जमणार नाहीं. शेंभर साहेबलोकांच्या पगारा बरोबर किंबहुना हजारो नेटिवांचे पगार भरतील; व जें उत्पन्न शेंभर साहेब लोकां वरील करानें पैदा होईल तितकें होण्यास लक्षावधी लहान सान लोकांवरील कराच्या उत्पन्नानें होणार नाहीं. साहेब लोकांस सर्व परी सुख आहे त्यांस सुखांत सुखाची हा कर मुक्त करून भर करण्या पक्षां नेटिवांस या कराबद्दल माफी करून चारदिवस सुखांत ठेवावें हें या दयाळू सरकारास या समयीं योग्य आहे.

नवीन वर्तमानावरून असें कळतें कीं हा कर खचितच असणारच असा अद्याप निश्चय झाल्यासारखें नाहीं घटकेंत सर्वांवर कर बसले व घटकेंत फक्त नेटिवांवर बसेल असावानसावा ईश्वर करो आणि हें महत् संकट गरीब प्रजेवरील टळलें. नवीन गव्हर्नर जनरल लार्ड मेयो साहेब या गोष्टीचा पूर्ण विचार करतील आणि नेटिवापेक्षां युरोपियन फार पगारदार आहेत व कराचा बोजा सोसण्यास खंबीर आहेत असें मनांत आणून त्याजवरचहा बोज लादून गरगरिबास या बद्दल माफीकरतील अशी इश्वराजवळ विनंती आहे.

---

## फळें, पुष्पें व वनस्पति यांचें प्रदर्शन.

हें प्रदर्शन होण्याची पुष्कळ दिवस घाटा घाट व तयारी चालली होती तें नामदार ड्यूक आफ एडिनबरो यांचें एथें आगमन झाल्यावर झालें. ह्या प्रदर्शनचा समारंभ विक्टोरिया बागेंत झाला व तें उघडण्याचा विधी बृहस्पतवार ता० १७ वी माहे मार्च रोजीं संध्याकाळीं ६॥ वाजतां ड्यूक साहेब यानीं केला. तेव्हां त्या बागेंत मोठी रोशनाई केली होती, गवरनर साहेब यांचा बेंड बाजा उत्तम प्रकारचें वादन करीत होता, आणि पुष्कळ एतद्देशीय व युरोपियन लोक जमले होते. त्या दिवशीं टिकीटांचा दर फार जबर म्हणजे दर मनुष्यास १० रुपये होता, तरी, पुष्कळ लोक टिकीटें घेऊन प्रदर्शन पाहावयास गेले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारीं ३ रु. दर होता, आणि पुढें शनवार, रविवार व सोमवार या दिवशीं १ रुपया दर होता. पैकीं एक दिवस एतद्देशीय स्त्रियांसाटीं नेमला होता. एतद्देशीय स्त्रियांपैकीं पारशाच्या स्त्रिया प्रदर्शन पाहाण्यास गेल्या होत्या तितक्या दुसऱ्या कोणत्याहि लोकांच्या गेल्या नव्हत्या. पाहाणारें लोक दिवसां व रात्रींहि पाहायास जात असत. रात्रीं पाहाण्याची चागली सोय व्हावी म्हणून बागेंतील मुख्य रस्त्यांवर व प्रदर्शनच्या मंडपांत दिव्यांचा मोटा लखलखाट करित असत.

आम्ही हें अप्रातिम प्रदर्शन पहाण्यास रात्रीच्या वेळेस गेलो होतों. तेव्हां जी अतिरमणीय शोभा व सानंदाश्चर्यकारक देखावा दृष्टीस पडला त्याचें बरोबर वर्णन करणें फार कठिण आहे. बागेच्या आत ज्या अंगी जो तिकमाणी दरवाजा आहे त्यापासून तर शेवटल्या मोठ्या विस्तीर्ण चक्रत मंडप बांधला होता तेथपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा दिव्यांचीं झाडें दाट लावली होतीं. त्यतून जातांना समोर मंडप दिसत होता. त्यच्या उंच नेलेल्या घुमटाच्या आंत एक मोठी तेजःपुंज ज्योती होती ती पौर्णिमेचा चंद्र नभाच्या आडून दिसावा त्य प्रमाणें दिसत होती. त्याच्या खालीं म्हणजे मंडपाच्या मध्यभागीं कारंज्याचा मोठा फवारा उडत होता, तो क्षणांत बिलोराप्रमाणें शुभ्र दिसे, क्षणात हिरवा कंच, क्षणांत आरक्त, व क्षणांत निळा किंवा जांभळा दिसे. असें होण्याचें कारण काय असेल याचा बरोबर तर्क करतां आला नाहीं. मंडप प्रकाशमय असून आत लोकांची पुष्कळ दाटी होती. मंडपाच्या एका बाजूस युरोपियन बेंडवालाही वाजत होता.

आम्ही मंडपांत प्रथम नीट मधील कारंज्यापर्शी गेलों, आणि जी मोठी ज्योति बाहेरून चंद्रासारखी दिसत होती ती कशाची असेल म्हणून पाहिलें. तों जो

विद्युत्प्रकाश १२ व्या तारखेच्या रात्रीस किल्ल्यांत ओरिएन्टल ठ्यांकेवरून प्रकाशत होता तो वर लावला असून त्यांच्या समोर लाल, हिरवी. निळी, भिंगे धरीत, त्यांवरून कारंज्याच्या फवाऱ्याचे रंग पालटत असत. हे कारंजे फार तऱ्हेवाईक केलें होतें. सुंदर दगड व गारा यांची वरंडी किंवा दरड रचून वर्तुळाकार कुंड केलें होते व त्याच्या दराजा जांबळ्या व हिरव्या रंगांच्या शेवळानें बुजल्या होत्या. त्याच्या मध्यभागीं तसाच गारा व शेवळ यांचा शुळका केला होता. त्याच्या शिखरांतून अंगठ्या इतक्या जाड अशा चार पांच धारांचा फवार उडून त्या धारा चोंहीं दिशांस फाकून खालीं कुंडामध्यें पडत होत्या. त्या कुंडाच्या वायव्य व नैर्ऋत्य दिशांस तशीच आणखी दोन कुंडें किंवा लहान लहान तळीं केलीं होतीं. तिन्हीं कुंडें पाण्यानें कांठोकांठ भरलीं होती. त्या च्या पृष्ठभागांवर कमळांचे वेल व अनेक जातींचें गोंडळा पसरलें होतें, आणि त्या च्या दरडींवर नाना प्रकारच्या चमत्कारिक वनस्पति लावल्या होत्या. त्यांच्या सभों वते वर्तुलाकार रस्त करून त्यांच्या दुतर्फा तक्तपोशी पायऱ्यांचे घांट केले होते. व यांवर सुंदर लाल कापड पसरलें होतें, आणि त्यांजवर पुष्कळ जातींचीं फळें, भाज्या फुलझाडें व दुसऱ्या वनस्पति निरनिराळ्या मांडल्या होत्या. त्यांचे प्रकार इतके होते कीं त्यांचीं नांवें वगैरे सांगतां येणार नाहींत आणि सांगतां आलीं तरी आमच्या लहान शा पत्रांत त्यांस जागा पुरणार नाहीं; तरी त्याविषयीं कांहीं सांगतो.

फळें— आंबे, कैऱ्या, नारिंगें, कवलें, संत्रें, साखरलिंबें, पपनसें, अननसें, फणस कलिंगडीं, खरबुजें. चिबडें, काकड्या" द्राक्षें खिरण्या [ रांजण्या ], पेर, विलायती जांम, सपरचंद [ आपल ]. केळीं, डाळिंबें, अंजिरें, पपया, काजू, " मामा" व " मथ " म्हटलेलीं फळें, असीं बहुत फळें होतीं, व त्यांतून कित्येकांचे तर अनेक प्रकार होते. पीच, शितफळें, व ऊंस पाहण्यांत आले नाहींत. आंब्यांचे दिवस अजून पुरते आले नाहींत, तरी पांच साहा प्रकारचे आंबे असून त्यांतून कांहीं तर फार मोठाले होते- गुजबेरी, स्टाबेरी, कचेरे, ताडगोळे, मकाचीं कणसें, पोफळें हीं पण टेविलीं होतीं.

भाज्या— डांगर व दुध्ये फार मोठालें होते. देशी व विलायती मुळे अनेक प्रकारचे; त्यांत कांहीं मुळे इतके जाड व लांब होते कीं आम्ही तसे पूर्वी कधीं पाहिले नव्हते. जातीजातींचीं तांबडी व सफेत वांगीं; त्यांतूनही कित्येक फार जाड व लांब होतीं. सुरण, कंद, कांदे, गाजरें, रताळीं बटाटे, पडवळें, कारलीं, भेंडसे, गालें, मिरच्या, मेथिबीर, घेवडा व वालयांचे अनेक प्रकार, तऱ्हेतऱ्हेच्या पालेभाज्या होत्या. डांगर किंवा काशीफळ भोपळा फारच स्थूल होते. एका मोठ्या लाहानतोंडी कुपींत मोठा थोरला मुगा भोपळा होता. तशीच बाटल्यामध्यें वाढविलेलीं बंगाली वांगीं होती विलायती भाज्या कोबीचे घड्डु फारच मोठालें शुभ्र व कोवळे होते. सालेड, नवलकोल, कालीफ्लावर, फ्लावर, फ्रेंचबीन, डबल बीन, इ० वाटते तर करवंदाएवढाल्यांपासून तर नारळाइतके मोठ्या पर्यंत होते. तसेंच कंदपांचेहि अनेक प्रकार होते.

झाडें व फुलझाडें— यांच्या कुंड्या नांदीव पिंपें यांची फार उत्कृष्ट रीतीनें रचना केली होती. त्यांचीं नांवें सांगतां येणार नाहींत व शेंकडोंचीं नांवें तर मराठींत नाहींतच. कित्येक ठिकाणीं साखरलिंबांचीं झाडें होतीं. त्यांवर मोठालीं फळें लोंबत होतीं. दोन दोन तीन तीन हात ऊंच अशा सुरूच्या रोपांचे दोन तीन प्रकार होते. कोरफडी व केकताडें यांचे अनेक प्रकार. भाळनाच्या आकाराच्या वनस्पतीच्या बहुत तऱ्हा असून त्यांतून कित्येकांचीं पानें चित्रविचित्र होती. फुलझाडांकडे गेलों तेव्हां त्यांची टवटवी, नानारंग व बेसुमार जाती पाहून मति कुंठीत झाली. त्यांच्या वरच्या बाजूस अनेक रंगांचे व जातीचे पोपट व मैना यांचे कांहीं पिंजरे ठेवले होते त्यांतुन ते पक्षी उड्या मारून मंजूल शब्द करित होते- त्यांजवर वरील रोशनाईचा व विद्युदीपाचा मोठा प्रकाश पडला होता, त्यांवरून जणूकाय कोण्या पर्वताच्या उतरणीवर कोणी राजानें लावलेल्या रमणीय पुष्पवाटिकांमध्येंच फिरत आहें, असा आम्हांस भास झाला.

मंडप फार सुंदर असून मोठ्या कौशल्यानें केला होता. देवदारूची लाकडें व लोखंड यांचे खांब व दांडे लावले होते. मंडप वर्तुलाकार असून त्याच्या मध्यभागीं उंच घुमट केला होता, आणि त्यावर एक पांढरा तर एक निळा असे खांबांचे पाट लावलें होते. त्यावर चित्रविचित्र निशाणें लाविली होती आणि आंत प्रदर्शन पाहण्याकरिता नाना राष्ट्रांचे व नाना प्रकारचे पोशाक केलेले पुरुष, स्त्रिया व मुलें फिरत होतीं, त्यांचीं मुखें हर्षयुक्त होतीं. या सर्वांवरून त्या स्थळास अत्यंत शोभा येऊन तें फारच मनोरम दिसलें. त्यावरून व आंतमध्यें उद्भिद सृष्टींतील जे चमत्कार भरले होते ते पाहून सर्व शक्तिमान परमेश्वराच्या कौशल्या विषयीं व चांगुलपणा विषयीं महत्वाचा व बोधपर विचार मनांत आले त्यांवरून जो आल्हाद झाला तो एथें लिहून दाखवितां येत नाहीं. आम्हांस वाटते कीं, असें प्रदर्शन प्राचीन काळींच काय पण अर्वाचीन काळीं देखील क्वचितच झालें असेल, आणि राजपुत्र ड्यूक यांचा सत्कार व मनोरंजन जसें या मुंबापुरींत झालें तसें दुसऱ्या कोठेंहि झालें असेल.

## THE VICEROY'S RECEPTION OF SIR SALAR JUNG.

On the 24th March, at $10\frac{1}{2}$ A.M., His Excellency the Viceroy and Governor-General held a Durbar at Government House, for the reception of the Nawab Sir Salar Jung Bahadoor, K.C.S.I. The General Commanding the Presidency Division, the Brigadier General, and their respective staffs were present on this occasion. One of the Viceroy's carriages, containing two aides de-camp to His Excellency the Viceroy, conveyed the Nawab to the durbar from his private residence. A party of the Body Guard was in attendance. The gentlemen of the Nawab's suite followed in the Nawab's own carriages in the rear of the Body Guard The Marble Hall was lined on each side by men of the Body Guard. A salute of seventeen guns was fired from Fort William on the arrival of the Nawab at Government House, and the guard of honour, composed of native infantry, presented arms. On alighting from the carriage the Nawab was received at the top of the grand staircase by the Under-Secretary in the Foreign Department by the whom he was conducted to the throne room. At the entrance to the throne room he was met by the Secretary in the Foreign Department. The Viceroy and Governor-General received the Nawab in the throne-room standing on the dais of the throne. The Nawab took his seat on the right of the Viceroy and Governor General To the right of the Nawab were seated the Secretary, the Under-Secretary, and the two principal attendants of the Nawab. On the left hand of the Viceroy and Govern-General were seated the Resident at Hyderabad, the General Commanding the Division, the Brigadier General, and their respective staffs, and also the personal staff of His Excellency. The Nawab's atendants were presented to the Viceroy and Governor General by the Under-Secretary, offered nuzzers, which were remitted on this occasion, as on khilluts were conferred. During the interview a band played at the head of the grand stairs. Utter and pan were served to the Nawab at the close of the darbar by the Viceroy and Governor-General, and to his attendants by the underSecretary. Tho Viceroy and Governor-Genral took leave of the Nawab standing on the dais. On the departure of the Nawab, who was conducted by the under- Secretary in the Foreign Department to the top of the grand staircase, a salute of seventeen guns was fired from the fort and the guard of honour presented arms. The deputation which escorted the Nawab to Government house accompanied him to a short distance, and then took leave. The party of the Body Guard accompanied the Nawab back to his residence.

On the 25th March, at $8\frac{1}{2}$ o'clock A.M. His Excellency the Viceroy returned the visit of the Nawab Sir Salar Jung Bahadoor, K.C.S.I.

## THE DUKE OF EDINBURGH.

W learn by wire (says the "Madras Mail" of the 1st instant) that H.R.H. the Duke of Edinburgh found waiting his arrival at Colombo, a telegram ordering him to go to Australia, instead of to England, and intimating that the cruise of the Galatea may probably be extended yet two years longer This modification of the Duke's programme cannot but take every one by surprise, for it is in Australasia only where he has unfortunately failed to retain the good opinion of the general public, and to send him down south after the ungracious reception that he there met with in 1868 69, is only to risk the obliteration of the loyal sentiment among our colonial brethren. After a few years have passed, the colonials might be disposed to treat an English prince with becoming respect, but it strikes us as an impolitic proceeding to test their temper while the old wound is yet raw. The Duke, whatever the merits of the case, undoubtedly left the south after effacing all the good impressions that he made on his former visit, and simply as a matter of personal feeling, we should be inclined to think that he himself has no desire to see Australia again. The change in the route of the Galatea, assuming that the Colombo people have ascertained true contents of the telegram referred to, may be connected with private matters of which the general public know nothing.

## THE MADRAS UNIVERSITY CONVOCATION.

A CONVOCATION of the Senate of the Madras University for conferring degrees was held yesterday afternoon (March 25) in the Banqueting Hall. Lord Napier, ex-officio Chancellor, presided, and was supported by Sir Colley Scotland the Vice-Chancellor, and almost all the members of the Senate now in Madras. H.R.H. the Duke of Edinburgh who wore the doctor's gown of the University of Edinburgh, the Maharajah of Travancore, Prince Azeem Jah, and several native chiefs, with a large number of Europeans, East Indians, and natives, were also present. The proceedings were characterized by more order than has for a long time been visible at Convocation, and we attribute this needful improvement to the care taken by the new Registrar, Mr. A. A. Gordon, to provide seats for the whole audience. The time honored but unseemly crowding round the dais, and body of the Hall has, we trust, now become a thing of the past. It was hoped that this Convocation would have been held in the New Presidency College, but some objection was raised at the last moment to the arrangement. The Banqueting Hall looked its best however, with the banners put up for the ball on Wednesday still waving over the galleries. An over-lengthy, and discursive, yet able address was delivered by Dr. George Smith, M. D., principal of the Medical College, and fellow of the University. That the Senate by one of its members should address some words of congratulation and advice to the new graduates is both reasonable and desirable, but we question the wisdom of allowing those graduates to associate with one of the most memorable events in their lives, the having to sit out an exhaustive lecture on moral philosophy. Such a lecture, like Chengulroy Naick's idia of a scholarship, tends " to make life dull" if not for a time wearisome. We raise no objection to Dr. Smith's address *per so*; he followed precedent in making it so lengthy, and has given us some valuable reflections couched in very graphic langauage. It is the *lex non scripta* that such an address should be diffuse and speculative, that we wish to see modified, Madras Mail.

## अकोला.

हल्लीमान या आठवड्यांत मेघराजानें पलायन करून उष्णतेनें आपलें डोकें उभारलें. दिवसास अतिशय उष्णता भासते.

रे. बड्मननी जामासजी यानीं दोन महिन्याची रजा घेऊन ता. ७ रोजीं पुण्यास गेल्याचें समजतें व त्यांचे जागेवर मे० श्रीकृष्ण नरहर यांस नेमल्याप्रमाणें त्यानीं

भाइसाहेबांजवळून व्याज घेऊन काम पहावयास लागले.

मे. लायल साहेब कमिशनर यांची स्वारी बुलढाण्याहून येथें येऊन दाखल झाली.

मे. हारडर्न साहेब डेप्युटी कमिशनर हे आपल्या क्लार्कासह नरनाळ्यास गेल्याचें समजतें.

मे. डेवीस साहेब असिस्टंट कमिशनर हे रजा घेऊन बिलायतेस जाण्याकरितां मुंबईस निघून गेले व त्यांनीं आपला चार्ज मे. बर्न साहेबांस दिला व त्याप्रमाणें ते काम पहावयास लागले.

इमामजयंतिचा उत्छाह सुरू झाला मुसलमान लोकांची सोंगें व डोले करण्याची एकच धांदल उडून गेली आहे जिकडे तिकडे ताफ्याचे नादानें शहरभर त्या अवाजखेरीज दुसरें कांहीं ऐकूं येत नाहीं,

येथील लायब्ररीत दर आदितवारीं सभा भरून तेथें चांगले उपयुक्त विषयावर दर वेळेस कोणी निबंध लिहित जाईल अशा विषयीं कमेटीनें ठराव केला आहे व तो या आठवड्या पासून अमलांत येणार या सार्वजनीक कामांस येथील वकील व दुसरे सभ्य ग्रहस्थ येऊन सभा सुशोभित करतील व लायब्ररीचे उत्तेजनार्थ खटपट करतील अशी आशा आहे. या लायब्ररीचे जे नियम मागें ठरले आहेत त्याजविषयींच आम्हास जें लिहिणें आहे तें पुढील अंकांत लिहूं.

सर सालरजंग हे रेसीडेंट साहेबा सह वर्तमान मद्रासेस जाऊन पोचले तेथुन ते लवकरच हयदराबादेस जातील.

मे. बुषनी साहेब बहादूर डिपुटी कमिशनर एवतमाळ यानीं तूर्त घेतलेली रजा परत केल्याचें समजतें. कारण समजण्यांत आलें नाहीं.

## वर्तमानसार.

पुनर्विवाहाची सिध्धता—आम्हीं खाली साह्याकरणारे पुनर्विवाहित भावी वधुवरांचे पालक सर्वांस विनयक पुर्वक कळवितों कीं आम्हीं आपल्या बालविधवा व विधुर आपत्यांचा पुनर्विवाह येत्या वैशाखांत करणार आहे तर ईश्वरदत्त दयेच्या योगानें ज्यांची मनें कळवळून विधवा दुःखाश्रुमार्जनाकडे लागलीं असतील त्याणी आपलीं नांवें ठाण्यास अरुणोदयाचे एडिटर यांस चैत्र शुध्द॥ १९ च्या आंत कळवावीं तिथी निश्चय झल्यावर निमंत्रक कुंकुम पत्रिका जातीलच, पण आमच्या हेतूस किती देश कल्याणेछु सदय गृहस्थांचे सहाय आहे तें पाहून उताविळ व भिऱ्या मनाची शांति करण्या करितां ही पुर्वी प्रार्थना केली आहे.

++—++ अ० द०

क्षज्ञ. ज्ञा.प्र

सर रिचर्ड टेंपळ यानीं कौन्सल पुढें बजेंट ठेऊन इनकमटयाक्स साडे तीन रुपये शेकडा असावे अशा विषयीं आपलें मत्त दीलें त्यांवर मे. लार्ड मेयो साहेबानी पंचांचा अभिप्राय विच्यारला आहे.

केप टाऊन म्हणून जी आफ्रिकेंत इंग्रेज्श लोकांची वसाहत आहे तेथें हिऱ्यांची खाण सांपडलेली आहे आणि तेथून पुष्कळ हिरे विलायतेत हल्लीं जात आहत असें एका पत्रावरून समजतें.

सिव्हिल सर्व्हंट यांणीं कांहीं भाषांची परिक्षा दिली असतां त्यांस बक्षिसें सरकार देत असतें. त्यांपैकीं पर्शियन भाषबद्दल बक्षिसांच्या रकमा २००० व ४००० आशा थोडक्यांतच बाढणार आहेत. बक्षिसें नेटिवांस द्यावयाचीं असतीं तर हल्लीं खर्चें कमी करण्याचे सपाट्यांतून तीं वांचलीं व नसतीं; मग वृद्धीची गोष्ठ कशास पाहिजे.

हत्तीवरून शिकार करणें हें तरी किती भयंकर आहे हे पहा. थोडे दिवसां पूर्वीं मि. मारिस साहेब मध्य भागचे सांप्रत चीफ कमिशनर हे शिकारीस गेले असता यांणीं एका पटाईत वाघांस घायाळ केल्यावरून तो भयंकर पशु चवताळला आणि उलटा येऊन सदरील साहेबांचे हत्तीवर उडी मारून वरील बसणारांच अंगास जाऊन बिलगला. त्या वेळची धांदल लिहितां पुरवणार नाहीं. परंतु दैववशात मारीस साहेबांचे शौर्यानें सर्व वाचले या सहवांनीं बंदुक उडविण्यास अवकाश नाहीं म्हणून मोठ्या एका सुऱ्यानें वाघाची मान ठार तोडली. ने. ओ.

जबलपूर क्रानिकल वरून कळतें कीं जबलपूर शहरात एक भंयकर खून झाला. खून करणराची बायको दुसऱ्यास लागू होती. एकदिवशीं नवऱ्यानें आपली बायको यारास घेऊन निजली आहे असें पाहिलें. त्या रागा सरसें त्याणें कुऱ्हाड घेऊन त्या याराचर घातली त्या योगान तो यार मरण पावला. बायको पळाली. हा खून करणारा मनुष्य तूर्त कैदेत आहे.

पुष्कळ वर्तमान पत्रांतून इकडे राज कारभार चालवण्यासाठीं राजपुत्र असावा अशा तऱ्हेच्या वाद विवाद चालत आहे. टैम्स आफ् इन्डिया वरून कळतें कीं, हिज हायनेस आगाखान याणीं राणीसाहेबांस डयुक आफ् एडिम्बरो यांस इकडे गव्हरनर जनरल करून पाठविण्यासाठी विनंती पत्र पाठविलें आहे त्या पत्रांत ते असें लिहितात कीं, तसें केल्यानें इकडे सांप्रत आहे इतकी गोरी फौज टेवण्याची दुसरी कमी होईल. मी० द०

लखनौ टैम्स बंगलोर हेरल्डच्या आधारावरून लिहितो कीं सर मालरजंग यांस नुर्तेच याच्या अर्जीकडून एक कोटीची दौलत मिळाली. त्यापैकीं ९ लक्ष रु० हल्लींच्या प्रवासाप्रीत्यर्थ खर्चण्याचा त्यांनीं विचार केला आहे.

कापसाच्या भेळीच्या प्रतिबंधार्थ मुंबई सरकारानें केलला कायदा उपयोगी नाहीं असे या देशांतील लोक व वर्तमानपत्रें म्हणतात. त्याप्रमाणेंच विलायतेस चिन्हें दिसूं लागलीं आहेत. लंडन येथील एशियाटिक पत्रावरून असें कळते कीं, मांचेस्टार येथील चेंबर आफ कामर्स व काटन सप्लाय असोशिएशन या दोन ही व्यापारी मंडळयांनीं या कायद्या विरुद्ध विलायत सरकारास अर्ज करण्याचा बेत केला आहे. अर्ज तयार करण्याकरितां त्यांनीं कमेटीही नेमिली आहे असें कळतें.

फ्रान्स देशांतील राजपुत्र प्रिन्स पियरे बोनापार्ट यानीं एका मोटया मनुष्यास रागाच्या आवेशांत ठार मारलें सबब त्यांची चवकशी झाली; परंतु चवकशी अंतीं ते सुटले. हा निर्णय इंग्लंडांतील वर्तमान पत्र कर्त्यांस नापसंत झाला असें विलायतेच्या तारेवरून कळतें.

यंदांची सिविल सर्विसची परिक्षा ता० ९ मिनहू रोजी सुरू होणार आहे. फक्त चाळीस जागा द्यावयाच्या आहेत. यांजकरितां परिक्षेस ९०० उमेदवार आले आहेत यांत तीन बंगाली बाबू आहेत. याची माट्रिक्युलेशनची परिक्षा त्यांच्या वयाचें सोळावें वर्ष संपावयाच्या पूर्वीं झाली होती सबब सर्व हकीकत व आपलें म्हणणें परिक्षकांस कळविलें. त्यांनीं तें मान्य करून परिक्षेस येण्याची परवानगी दिली असें हिंदु पेट्रियट वरून कळतें. इ० प्र०

पुर्णें पुनर्विवाह प्रकर्णीं झडलेला वादाचा विच्यार प्रस्तुत पंच करित आहेत. पुनर्विवाह पक्षास जयप्राप्ती व्हावी म्हणून सर्व इश्वराच धावा करीत. आहेत कायहांइक ते पाहावें.

## मागाहून आलेल्या जाहराती.

नोटिस—नानकराम संतुकलाल साहू दुकान खामगाव यास रामदयाळ नथमल साहू दुकान खामगांव यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हीं लिहिलें कीं कस्तुरचंद रिदकर्ण याचा हवाला रुपये ८७७८।० चा तुम्हीं घेतला, ते रुपये आम्हांस ८ दिवसांत द्यावे न दिल्यास आम्ही फिर्याद करूं म्हणून नोटिस तारीख २१ जानेवारी सन १८७० ची आम्हास दिली. त्याचें उत्तर नोटिस पावल्यावर तुम्हास द्यावें परंतु मी मांदा असल्यामुळें वक्तशीर जबाब देण्यात आला नाहीं हल्लीं मजला अराम झाल्यावरून उत्तर देतों कीं कस्तुरचंद रिदकर्ण याचा हवाला आम्ही कांहीं घेतला नाहीं व त्याजकडे तुमचे रुपये आहेत किंवा नाहीं हें ही आम्हांस माहीत नाहीं व तो आमचे जातीचा ही नसून आमचा सगासाईही नाहीं असें असून आमचे रुपये ९९० नउशें पंन्नास तुम्हांकडे घेणें निघतात ते रुपये या रुपयांपोटीं निरर्थक अशा इराद्यानें हें कृत्य उपस्थीत केलें परंतु असेंही कल्यानें आमचे रुपयांस कांहीं दखल व्हावयाचा नाहीं यांजकरितां हल्लीं तुम्हांस नोटिस देण्यांत येते कीं या नोटिशीचे तारखेपासून ८ दिवसाचे आंत सदरीं लिहिलेले रुपये व शिवाय व्याज असें पाठऊन द्यावें सदहूं मुदतींत रुपये न आल्यास आम्ही तुम्हावर फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेऊं कळावें तारीख ९ एप्रिल सन १८७० इ०

( सही ) रामदयाळ नथमल साहू दुकान खामगाव.

नोटिस—पांडुजी वलद संभाजी गावंडे रहाणार दताळ तालुके मोरतीजापूर यांस विठोबा वलद रामाजी तायडे राहाणार कोलखेड तालुके व जिल्हा अकोले यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांस आमचे धंड्याचे घर पैकीं लांकडें १८ खण चीं तुम्हांस २३५ रुपयांस एक महीन्याचे अगोदर विकलीं व त्याजबद्दल तुम्हाकडून ३९ रुपये लांकडें घतलीं तेव्हा नगद दिले बाकीचे रुपये, रंगपंचमीस देण्याची मुदत केली असून आज पर्यंत रुपये तुम्ही दिले नाहीं व तो माल तुम्हांस नको म्हणून म्हणतां तर तुमचे आमचे करारा प्रमाणें ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसाच आंत रुपये द्यावे नाहींतर तो सर्व आम्हीं विकुन त्याजबद्दल जी नुकसानी येईल ती तुमचे जवळून सरकार मार्फत फिर्याद करून घेण्यांत येईल कळावें. तारीख ७ एप्रील सन १८७० इसवी.

( सही ) विठोबा वलद रामजी तायडे.

नोटिस—कसबे बावनबिर तालुके जळगाव एथील व्यापार करणारे लोक यांस या नोटिशीनें चुनिलाल मारवाडी परगणे मजकूर याजकडून कळविण्यांत येते जे माझी आई नामे चैंदाबाई इजसीं तुम्हीं देणावेणीचा रोजगार म्हणजे माझा पैसा मी असामी पहून बाराआणे शेकडा देत आहे व तुम्ही स्त्रियेची जाती पाहून मनास वाटेल असें व्याज घेतां हें मसला फार गौणता आहे व मागें येक वर्षाचे आंत मी या घरांत तुम्हांस पांचशे रुपये देऊन फारकतरा करून घेतल्या व समजुत दिल्ही कीं तुम्हीमाझे आईसी देणें घेणें करूनये हें तुम्ही सर्वांनी कर्णद्वारें श्रवण करून पुन्हा देणें घेणें करतां तर हें नीट नाहीं हालीं तुम्हांस कळविण्यांत येत आहे जे ज्याचा पैसा आईकडस असल्यास त्याणी ही नोटिस पावल्याचे तारखे पासून आणखी व सात पंचाचे शिरस्त्या प्रमाणें घ्यावा नाहीं तर मी येक पैसा देणार नाहीं तसा पुढें रोजगार करतील तर मी पैसा देणार नाहीं माझे पश्चात माझे आई पासून जो माझा माल घेइल त्याचा पत्ता लागल्यास मि त्याजवर फौजदारी मुकदमा करिन कळावें तारीख ९ मांहे एप्रील सन १८७० इसवी

( सही ) चुनिलाल मारवाडी दुकान बावनबिर दस्तुर खुद

## पत्रव्यवहार.

राजमान्य रा० वराडसमाचार कर्ते यांस विनंती विशेष आपण कृपाकरून ह्या पुढील च्यार ओळीस आपल्या अमूल्य पत्रात जागा द्याल अशी आशा आहे.

हें ग्राम म्हटलें म्हणजे जिल्हा सदरस्टेशनची जागा आहे, व येथें सदरस्टेशन येऊन सुमारें दोन वर्षें होतील तेव्हां पासून येथें शाळा ही आहे. परंतु असा एक हि दिवस उगवला नाहीं कीं कोणी शाळेंत येऊन मास्तराची व मुलांची हुशारी पाहून नुस्ती परिक्षा घतली; मग बक्षिसें तर कोठून वाठणार !!! नाहींच नाहीं. असें कांहीं दिवस लोटल्यावर आठ दिवसांच पूर्वी दोन ग्रहस्थनामें रा० रा० बळवंतराव राजाराम क्लार्क, डे. कमिशनरचे हापिस व रा० रा० आमृत गोपाळ देशपांडे. ऊर्फ रायजी त्याच कचेरींतील मराठी कारकून हे उभयतां शाळेंत सहजगत्या आले, व मास्तऱ्यांची प्रश्नकरण्याची शैली व मुलांचीं उत्तरें देण्याची तरतरता, वगैरे पाहून फार खुष झाले. आणि यांचें मनांत एकदम असा विचार आला कीं या मुलांस कांहीं तरी उत्तेजनार्थ दिले पाहिजे. म्हणून या गृहस्थांनीं उभयतांमध्ये दहा रुपये करून बुकें खरेदी केलीं आणि तारीख १ रोजीं सायंकाळीं चार वाजतां बक्षिसें वाटण्याचा समारंभाचा बेत केला. व मास्तराकरवी येथील सर्व लहान मोठे लोकांस समारंभ साजरा करण्या बद्दल चिठ्या पाठविल्या. त्या प्रमाणें कांहीं थोडे व छोटे

व जहाले व त्यांतील आणखी एक दोन जडपारडी यावयाची होती तर त्यांची वाट पाहण्याखालीच साडा वाजून गेले. नंतर निरोप आला कीं कामफार आहे या वरून सर्व लोक मुदयलें करून मुलें निराश होऊन आप आपल्या स्वस्थानाप्रत जातीं झालीं तर पहा ऐडिटरसाहेब? म्हण आहे ती खोटी नाहीं कीं विधेच्या लग्नास हजारों विघ्नें येतात, या प्रमाणें या आम्ही स्वल्प पगार पावणाऱ्या गृहस्थांनीं हें कृत्य करण्याची कंबर बांधली परंतु त्यांस अशीं विघ्नें आलीं तथापि त्या उभयतांचीं मनें खचून न देता येथील मास्तरांनीं त्यास उत्तेजन दिलें आणि दुसरें दिवशीं कोणाची वाट न पहाता यांजकडून मुलांची परिक्षांघेऊन बक्षीसे बुकें व पानसुपारी वाटली, सारांश त्या गृहस्थांनीं हें फार स्तुत्य व परोपकाराचें कामकेलें व येथील दुसरे सभ्य गृहस्थ हें काम करण्याचा कित्ता घेतील अशीं आशा आहे. कळावे हे विनंती

मुक्काम बुलढाणें
तारिख ४ माहे एप्रिल } एक फिरस्त.
सन १८७० इसवी.

## जाहिरखबरा.

नोटिस—गोपाळ बाळाजी. वस्ती मौजे पिंपरी गौळी परगणे मलकापूर तालुके मजकूर यांस खाली सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं तुम्ही तूळसाई कोम आनंदराम इजपासून आलीकडे एक बक्षीस दस्त ऐवज वतन संबंधी वगैरे करून घेऊन तो नुकताच नोंदून घेतला म्हणून कळलें. त्यास जर त्या दस्त ऐवजांत स्थावर माल व कुळकर्णाचें वगैरे वतनासंबंधी कांहीं लिहून घेतलें असल्यास तें सर्व थेव निरोपयोगीं आहेत; कारण वतनदारी ही मुळीच बक्षीस देण्याचा अधिकार नाहीं. तशांत तुम्हीं तिचे वारस नसून कांहीं संबंध नाहीं आम्हीं त्या बाईचे प्रत्यक्ष भाऊबंद वारस आहो सबब तिचे मरणानंतर बक्षीस लिहून दिलेला स्थावर माल व वतनदारीचा संबंध तुम्हास कोणतेही प्रकारें मिळणार नाहीं. हें तुम्हास कळावें तारीख १ माहे एप्रेल सन १८७० इसवी.

(सही) येशवंत बापुजी कुळकर्णी मौजे पिंपरी गौळी वगैरे गावें ९ परगणें मलकापूर.

नोटिस यंकोबा वल्लद देवबा पाटील येळकर राहणार मौजे परली परगणें बाळापूर तालूके मलकापूर याजला नोटिस देण्यांत येते कीं आमचे रुपये घेणें आहे ते.

८११ ऐन मुद्दल रुजू बाकी मित्ती कार्तिक शुद्ध १
३३८१ मित्ति पौष शुद्ध १ वायदावद्दल
८३ व्याज माहे ९ पांव आज मित्ति पावेतों.
९० रुईचे बोझें अर्धे रुई मण ९. ९७

——————
९७७८१

एकूण नऊशें सत्याहत्तर रुपये एक आणा आमचे घेणें निघाले आहे ते अद्याप मिळत नाहीं करितां हो नोटिस दिल्ही तर आज तारखे पासून पंधरा दिवसांचे आंत नोटिशीचे खर्चासुद्धां आमचे येथें आणून द्यावे न दिल्यास कोर्ट मार्फत फिर्याद करून घेण्यांत येईल याजवर गाहाण तुमचे नंबर ४ व धावा मागथासमेत जहेत घरास करून घेण्यात येईत कळावे तारीख ९ माहे ऐप्रील सन १८७० ईसवी मुकाम आकोला.

(सही.) मुकुंददास किसन चंदजी दुकान कसबे नांदुर दस्तूर एकोबा वलद राम जी गुमास्ते.

## विक्रीकरितां तयार आहे.

सर्व लोकास जाहिर करण्यांत येतें कीं न्यायाचे व वकिलाचे काम करणारांस व उमेदवारांस मुदतीचे कायद्या संबंधी कित्येक हाय कोर्टांनें केलेले ठरावाची चांगली मदत मिळावी याहेतूनें हा ग्रंथ तयार केला आहे. या ग्रंथाची रचना अशी केली आहे कीं, सन १८२७ चा कायदा ९ व सन १८५९ चा आकट १४ यांचीं कलमें त्याचे नंबराचे अनुक्रमानें छापली आहेत व त्यांतील मजकुरा संबंधी जाहालेले सर्व ठराव प्रत्येक कलमाचे खालीं लिहिलेले आहेत ठरावाच्या नंतर तारीख व तो कोणत्या ठिकाणीं सांपडेल अशा विषयीं पुष्कळ आधार लिहिले आहेत मुंबई मद्रास व कलकत्ता, यातिन्ही हायकोर्टाचें मुदती संबंधी ठराव त्याचे तारखेच्या अनुक्रमानें एक सकट नलिहिता प्रत्येक हाय कोर्टाचे ठराव तारखेचे अनुक्रमानें जुळून प्रथक दर्शविले आहत प्रथम कायद्याच किंवा आकटाचे कलम लिहून त्याखालीं प्रथम तारिखवार मुंबई हाय कोर्टाचे ठराव लिहिले आहेत नंतर मद्रास हाय कोर्टाचे ठराव व त्यापुढें कलकत्ता हाय कोर्टाचे ठराव लिहिले आहेत.

दिवाणी काम चालविण्याचे रितीविषयीं कायद्याचे अगर इतर कायद्याचे आकटाचे कलमावर मुदती संबंधी जाहालेले ठरावांतील तीं तीं कलमें लिहून त्याखालीं वरील नियमाप्रमाणेंच ठराव नमुद केले आहेत.

ज्या ठरावांत कोणतेही कायद्याचें कलम दर्शविलें नाहीं ते ठराव या ग्रंथाचे शेवटीं किरकोळ बाबदीत प्रकर्ण वार नमूद केले आहेत शिवाय सन १८२७ चा कायदा ९ व सन १८५९ आकट १४ हे ग्रंथाच्या शेवटीं संबंध जोडले आहेत.

या ग्रथांत मुंबई हाय कोर्टाची वाल्युमे ५ मद्रासची ३ व कलकत्याची ११ मिळून वाल्युमें १९ यांतील शिवाय वर्तमानपत्रां मिळोन एकंदर ठराव ७५० सुमार जाहाले आहेत.

याग्रंथाची किंमत रुपये ४ व टपाल हशील ८९ ठेविली आहे तरी हा ग्रंथ घेण्याची ज्याची इच्छा असेल त्याणीं हुंडी मनि आर्डर अथवा टिकीटें वरील दराप्रमाणें सोलापूर येथें आमचे कडे अगर कल्पतरु छापखान्यांत पाठविल्यास बुके रवाना करण्यांत येतील टिकिटें पाठविणें झाल्यास एक आण्याच्या आंत असून वर्तावळचा सुद्धां पाठवावीं.

ता० ९ मार्च
सन १८७० } विश्वनाथ नारायण सहस्त्रबुध्ये वकील व डेप्युटी गव्हरमेंट प्रासिक्युटर अदालत सोलापूर.

## विश्वासराव.

सर्वत्रांस कळवें कीं, आम्हीं हल्लीं एक नवीन पुस्तक विश्वासराव नांवें मराठी भाषेंत तयार करून "पुणें ज्ञानप्रकाश" छापखान्यांत देखाव्याचे सुंदर टाइपानें छापण्यास दिलें आहे. तें मे सन मजकुरी महिन्यांत छापून तयार होईल.

यांत शृंगार, वीर, करुणा, शोक, विनोद, इत्यादि रस असोन दहा भाग आहेत. हेंपुस्तक (पूर्वीं स्वतः केलेलें मंजुघोषा) पुस्तका येवढें होईल. यांत कित्येक ठिकाणीं अकस्मात घडूण आलेलीं आश्चर्यकारक कृत्ये अंतःकरणास रंजविणारीं आहेत; व सातवे भागांत कांहीं कविता बहुतेक सुरस वृत्तांची आहे.

हें घेण्याची ज्यांचीइच्छा असेल त्यांस आगाऊ किंमत मे महिन्याचे आंत प्रत्येक पुस्तकास १ रुपया शिवाय टपाल खर्च ८२ आणे पडेल. सदहू मुदतीचे पुढें घेणारांस एक रुपया चार आणे पडून टपालखर्च वेगळा द्यावा लागेल.

याची कींमत पाठविणें झाल्यास खालीं लिहिलेले ठिकाणीं पाठवावी.

१. पुणे येथें ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर यांजकडे.

२. मुंबईत—रा० रा० माधवराव चिमणाजी आपटे बी.ए. श्री० रा० रा० जगन्नाथ शंकरशेठजी यांचे इंग्लिश स्कूलचे हेडमास्तर यांजकडे.

३. खानदेशांत— रा० रा० कृष्णशास्त्री दातार हिंदीस्कूल हेडमास्तर धुळें यांजकडे.

४. संगमनेर जि० अहमनगर येथें रा० रा० गोविंद शंकर पिंपळखरे वकील मुनासिफ कोर्ट यांजकडे.

५. अहमदगर —रा०रा० सदाशिव एशवंत गाडबोले डे० रजिष्टर.

याप्रमाणें जशी ज्यांचीं सवड सांपडेल त्या त्या ठिकाणीं रोख कींमत अथवा वर्तावळयासुद्धां तिकिटा पाठविल्यास बक्तशीर पुस्तकें मिळतील.

या पुस्तकास उदार आश्रय पुणें व मुंबई येथील मोठ मोठाले सभ्य व कामदार यांजकडून मिळाला आहे. असाच परिश्रमाचे साफल्यतेस सर्वांकडून मिळेल अशी पूर्णआशा आहे.

मुक्काम पुणें, ता० १३ मार्च सन १८७०.
नारो सदाशिव रिसबूड हेडकारकून सोलापूर सब डि. पुना गि. प. व.डी.

## जाहिरात.

सन १८६७।६८।६९ चे आकट.

सन १८६७ पैकीं कांहीं व सन १८६८।६९ पैकीं सर्व मराठी आकट आणि सरकारचे कांहीं ठराव मिळून एकंदर बुक बांधून तयार झालें आहे, ज्या कोणांस घेण्याची मर्जी असेल त्याणीं किंमत रुपये २८८ व टपाल खर्च ८८ एकूण तीन रुपये पाठविले असतां बुक रवाना करण्यांत येईल. व हें न्यायाश्रय आफिसांत विकत मिळेल, तिकीटा पाठविल्यास एक आणा दराच्या असून वर्तावळासुद्धां असाव्या. या संबंधी कोणा पत्रवगैर पाठविल्यास पत्र पोस्टपेड असावी. नटपेड घेतलें जाणार नाहीं.

ता० २७ मार्च
सन १८७० } त्रिंबकराव नारायण राजमाचीकर न्यायाश्रय मुक्काम पुणें.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८२ आणे

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षांची आगाऊ देणारास.. ... | १ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ ... ... | १ | ८ |
| एक अंकास ... ... | | ९ |
| फुटकळ .. ... ... | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षांचे १२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तों १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होऊन तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

| | |
|---|---|
| १० ओळी पर्यंत ... ... ... | १ रुपया |
| १० ओळींवर प्रत्येक ओळीस | ८।८१ |
| इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस | ८४ |

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापवयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहियास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरु केल्यास सवा दोन वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं आजवरलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दरशेकडयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आकटोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA:—SATURDAY EVENING, APRIL 16 1870 NO. 16

पुस्तक ९. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १६ माहे एप्रिल सन १८७० इ० अंक १६


## वकील लोकांचें कर्तव्य.

सर्व धंद्यामध्यें पुरातन चालीप्रमाणें अशी म्हण आहे कीं उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी अशी मानली आहे परंतु ही म्हण आताचे युगांत लागू नाहीं. या म्हणीं प्रमाणें आतां जर विचार करूं लागलों तर सर्वच उलटें मान झालें आहे आतां उत्तम चाकरी, मध्यम व्यापार व निदानची शेतकी असें होण्याचें कारण उघडच आहे कीं आपलें स्वराज्य जाऊन आपण दुसऱ्याचे ताबेदार झालों लोक अनेक प्रकारच्या भाषा शिकून व शिकण्यामध्येंच आपले सर्व काळ क्रमण करूं लागले. पाहिल्याप्रमाणें पैसा जवळ नसल्यानें व्यापार किंवा शेतकी करण्याचीं कृत्यें साहजीकच आपोआप पाठमोरीं होऊं लागलीं, अशा या अनेक कारणानीं आपले जे पूर्वीचे विचार व गृह होते याचा ऱ्हास साहजीक होऊन लोकांच्या मनाचे कल साहजीक चाकरी वकीली, पोटवकीली व उगीच उलाढाली करून कोणचे तरी तऱ्हेनें उदर निर्वाह करावयाचा अशी समजूत होऊन लोक त्याप्रमाणें वर्तन करण्यास प्रवृत्त झाले.

आता आपले चाकरी, वकीली, व दुसरें पोटधंदे करणारें यांज विषई विचार करूलागलोतर, सहाजिक चाकरीकरणारें लोक पुष्कळ आढतील, याचे करण असें आहे कीं ज्यावेळेस हा हिंदुस्थान देश इंग्रज सरकारचे ताब्या खालीजाऊन जेव्हां तें आपले राजे झालें तेव्हां त्यांस इकडील रिती भाती चाल चलणूक धर्म यांज विषई ते अगदी अनभ्यस्त होते म्हणून त्यांनीं आपल्यास चाकरीची लालूच दाखवून आपल्यास इंग्रजी शीकण्याचीसोय करून शाळा स्थापन केल्या, व पहिल्यानें त्यांस थोडथोडें जरी ईंग्रजी येत होतें तरीं त्यांस मोटमोठाल्या चाकऱ्या देऊन त्यांस आशाळ्लावलीं तेव्हां अर्थातच सर्व आबालवृध्यांची मनें लालचून पैशाच्या आशेने बहुतेक इंग्रजी शीकण्यांस लागले व ती विद्या उत्तोतर वृध्यींगत होत चालली आहे या प्रमाणेंच जर वीद्येचा प्रसार होईल तर पुष्कळ विद्वान लोकांत लहान पदवीची चाकरी पत्करण्याचे भागपडेल; व त्यांचीं चिन्हें ही काहीं काही द्रष्टिस पडूलागली आहेत परंतु सध्या हा विशय आजचा नव्हे म्हणून याजविशई फार न लिहीता आपल्या विषया कडे वळू.

आतां जे चाकरी करणारे लोक आहेत ते कशा रितीनें चाकरी करतात तर त्यांजविषयीं फारसें लिहिणें नको कारण चाकरीच्या परी घरोघरच आहेत. परंतू मोठ्या पदवीचे चाकरी पासून लहाना पर्यंत एकच दशा मोठें पदविचे लोकांत जरीं चाकरी पासून कांहीं शी स्वतंत्रता आहे तरी त्यांस सकाळीं उठून आपल्या वरिष्ट अमलदारांकडे जाऊन त्यांची हाजी हाजी करून त्यांची मनें संतोष करून अपल्यावर प्रीति बसवून घेतात. आता हलके म्हणजे, रायटर, रेलवेंत काम करणारे यांची तर कामकरून हड्डीहड्डी बाहेर पडते तेव्हां लहानापसून मोठ्यापर्यंत चाकरीची तुलना केली तर एकच मान येईल. परंतु ऊपजिविकेस दुसरा उपाय नसल्यानें त्यांत न सूख मानून स्वस्थ राहतात. हे चाकरीवाल्याविषयीं झालें.

तिसरे असें आहे कीं चाकरी पासून स्वतंत्रता नाहीं म्हणून वकील झाल्यानें कांहीं तरी स्वतंत्रता येउन निःस्पृहतेनें वागण्यास सापडेल म्हणून कांहीं दिवस परिश्रम घेऊन वकीलीची परिक्षा देतात पण त्यांतील इंगीत काय, हा धंदा कोणचे बाण्याने चालवावयाचा हें ठाऊक नसल्यानें ते वकील होऊन चाकरी बाल्या पेक्षां ही ज्यास्ती धाकधुक बाळगावी लागते यांचे एकच कारण आहे कीं त्यांस आपला बोज आपले हातानें ठेवता येत नाहींम्हणा; किंवा त्यांस कायद्याची चांगली माहिती न सतें या दोन कारणा शिवाय दुसरे कांहीं नाहीं. वकील लोकांनीं जासा मोठें अञ्जुने ज्या अधिकाऱ्याच पुढें खटले चालवीण्यास जावयाचे त्यांचे शांतवन कायदे करून आपले पक्षकारां करितां नफा तोटया कडे लक्षनदेतां त्यांस कायद्याचे आधार नाना प्रकारें दाखवून आपली छाप अधीकाऱ्या पुढें चांगले पणाची बसवीली म्हणजे त्यानें आपले कर्तव्य कर्म केलें असें समजलें पाहिजे. नाहींतर कीत्येक वकील इतके धनलोभी पक्षकारांस बुडविणारेअसतात कीं त्यास कांहींना कांहीं तरी भुलथाप देऊन (नवरा मरो किंवा नवरी मरो) आपली फी चसकार मिळाला म्हणजे बस. तर वकिल हो असे करूनका आपल्या धंद्याकडे आपल्या पदवी कडे, आपल्या अब्रुकडे एकंदर लक्ष देऊन पक्षकाराचे नफा तोटयांकडे लक्षद्या म्हणजे इहलोकी व परलोकी ही तुमचे नाव होईल यात काडी मात्र ही शंका नाहीं.

आमच्या यावऱ्हाडप्रांतात या वकीललोकांविषयीं अधिकाऱ्याकडूनत्यांचा बेबनावअसल्याचे पुष्कळ एकतों याचें कारण आम्हांस असें समजण्यांत, येतें कीं त्यांचे अंगीं भित्रेपणा, अधिकाऱ्यापुढें ज्या पॉइंटावर बोलणें तो पॉइंट सोडून देऊन दुसरेंच पाखंड व कायदा बाहेर बोलतात असें ही किती येक अधीकाऱ्यांचे बोलण्या वरून समजतें याजवरून असे दीसते कीं त्यांस कायद्याची जितकी माहिती असावी तितकी नसेल म्हणूनच ते आपला भित्रपणा, व अधिकाऱ्यांची हाजी हाजी कोणिकडून तरी पैसा मिळवीण्या कडेस लक्ष देऊन अधीकारी बोलतील ते सहन करून घेतात. आमचे म्हणणे केवळ असेच नाहीं कीं सर्वच वकील केवळ कायदे शुन्य असतील व अधिकारी सर्वच चांगले असतील असें नाहीं कांहीं सेन्सचागुण व कांहीं सत्रागीवा परंतु जरी अधिकारी चांगलेस मजूतदार नसतील तरीं त्यांनीं आपले ज्ञानां जनाने व कायद्याचे आधाराने त्यांचे शांतवन करणे हेंच उचीत आहे, जर कोणी अधिकाऱ्याने दुराग्रहाने आपलाच हेका धरून नसले तथापी आपली वकीलीची सनद जाईल, या मुळें न बोलतां स्वस्थ त्यांचे रूकारांत रूकार देऊन खऱ्या न्याय मिळवीण्या विषयीं हयगय करणे हें अगदीं तुमचे नांवास तुमचे धंद्यास खरोखरीच काळीमा आणणारे आहे तर आमचे वऱ्हाड वासी प्रीय वकील हो असे करूनकां मुंबई कडील वकील लोकांकडे नदर फेका म्हणजे साहजीक तुम्हांस कोणत्या गोष्टीची अवश्यकता आहे ते ध्यानात येऊन त्या मार्गानें तुम्ही चालला म्हणजे उत्तरोत्तर तुमची वाहवा होऊन तुम्हांसच ते सुखावह होणार आहे. मुंबईत थोडे दिवसा पुर्वी एक फौजदारी खटला चालला होता त्यांत कैदी तर्फेचे बारीस्टर मे. आनेस्टी साहेब होते त्यांनीं आपल्या पक्षकारास वाचविण्या करितां, व खराबाणा बाळगण्या करितां कायद्याचे बाहेर न जातां, व नीर्भीड पणानें वागून आपले काम करून कसे घेतले हें खालीं लिहिल्यावरून समजेल यांजकडे सर्व वकील लोकानी ववाचकानी लक्ष द्यावें म्हणजे तिकडील वकील लोक कायद्याचे आधारानें खरा न्याय कसा बाहेर काढतात हें उघड दिसेल.

मुंबईचे म्युनसिपालकमिशनरचे हापिसांतील सबइन्सपेक्टर एकनाथ नामदेव यानें ९ रुपयें लांच घेतल्याबद्दल माजिस्त्रेटानें त्यांस सेशन कमीट केले, कैदी एकनाथ नामदेव यांजकडून मे. आनस्टीसाहेब प्रसिद्ध बालिस्टर हे होते हा खटला तारीख ११ एप्रील रोजीं ओनरबेल, सर च्यारलस सार्जंट याज पुढें चालूं झाला. खटल्याची हकिगत अशी आहे.कीं कैदीयानें एका व्यापाराचें घर पाडण्याविषयीं नोटिसलावली-व त्यास जाऊन सांगितलें कीं तुम्हीं जर दहा रुपये देत असाल तर ती नोटिस मी लागूं करीत नाहीं. याजवरून मालकानें त्यास १० रुपये देण्याचें कबूलकरून त्यानें एक रुपया अगाऊ मागितल्याप्रमाणें मालकानें त्यांस एक रुपया दिला व दुसरे नऊ रुपये उदईक देईन असें सांगितलें याजवरून कैदी हा आपलें घरीं गेला, हा गेल्यावर ही झालेली सर्व हकिगत मालकानें पोलिसास कळविली त्याजवरून दुसरें दिवशीं पोलिसानें ९ रुपयावर खूण करून मालकाकडून त्यास देवविले. फिर्यादी कडील वकील मे. मेलिससाहेब होते. यांनीं ही सर्वहकिगत सांगितली. पुढें आनेस्टी साहेबानी पुष्कळ तऱ्हेने कोर्टाचे कायद्या अन्वयें शांतवन करवून कैदी यांस मुक्त केलें परंतु मुख्य मुद्याची गोष्ट येवढीच कीं आनेस्टी साहब हे आपला पुरावा कोर्टापुढें देत असतां कोर्टानें तुमचा पुरावा बस झाला तुम्हीं बसावें. असें दोनदा तीनदा सांगितलें असतांही आनेस्टी साहेबांनीं तिकडे दुर लक्ष करून आपलेंच बोलणें चालविलें याजवरून कोर्टानें तुम्हीं जर न बसाल तर तुम्हीं कोर्टाची बेअदबी केली असें ठरवून तुमचेवर खटला चालविलाजाईल याजवर हुशार बारिस्टरानें कोर्टांस असें सांगितलें कीं माझे काम कसे करावे हे मला बरोबर माहित आहे त्याप्रमाणे मी वागतों तुम्हीं मात्र आपले काम बरोबर करावें याजप्रमाणे जबाब दिला. अशा या बोलण्याने कोर्टानें त्यास बेअदमी केली हा च्यार्ज ठेवून त्यांस साक्षिचे पिंजऱ्यात उभे करून कोर्टानें त्यांस असें सांगितलें कीं तुम्ही कोर्टांत फार शांततेने असावें येवढेंच सांगून तुम्हांस आतां फार वेळ खोळंबवीत नाहीं असे बोलून मुक्त केलें.

अतां हें आमच वाचणारास उघड समजेल कीं जो मनुष्य आपल्या कामांत वाकबगार चांगला आहे तो आपल्या पक्षकारास सोडविण्याकरितां कोणाचीही परवा न करितां व आपल्या मिळकतीकडे लक्ष नदेतां काम करावयाचे असें जे हुशार आहेत त्यानिच आपलें कर्तव्यकर्म केलें असें समजले पाहिजे. आता आम्हीं इतकीच इच्छा प्रदर्शीत करितों कीं इकडील वाकिलनीं आपलें ज्ञान व आपलें धैर्य याजकडून आपलें वर्चस्व बसवून आपलें कर्तव्याचा झेंडा उभारतील अशी अशा आहे.

---

### पुनर्विवाहाचे वादाचा परिणाम.

आम्हास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, ज्या वादाबद्दल इतके दिवस फार पंचाइती झाल्या, जो व्हावा अशी अनेक लोकांची इच्छा होती, जो घडवून आणण्याकरितां थोर थोर लोकांनीं इतकें श्रम केले, तो कसा तरी एकदां शेवटास जाऊन त्याचा निकाल झाला. आमच्या वाचणारांस माहींतच आहे कीं, दोनही पक्षाकडे पांच पांच पंच होतें. त्यामध्यें पुनर्विवाह पक्षाकडील पंचापैकीं वे० शा० व्यंकटशास्त्री माठे हे मात्र पुनर्विवाह अशास्त्र म्हणतात बाकीचे सशास्त्र म्हणतात. पुनर्विवाह विरुद्ध पक्षांतील सर्वच पंच त्यास अशास्त्र म्हणतात. एकंदरीत पाहाता एकीकडे सहामतें व एकीकडे चार मतें अशीं झालीं यामुळें सरपंचाच्या मताची गरज न पडतां वादाचा निकाल झाला आतां हें पंचाचे अभिप्राय कसे काय आहेत, त्यांत कोणाचा बहुत सयुक्तित दिसतो,' कोणाचा विशेष सयुक्तिक दिसतो. मानण्यास योग्य कोणता हें ते सर्व अभिप्राय लोकांपुढें असल्याखेरीज सांगवत नहीं म्हणून त्याविषयीं आज आम्हीं कांहींच लिहित नाहीं. प्रस्तुत इतकें सांगणें रास्त दिसतें कीं, ह्या वादाच्या कामांत पाहिल्यानें वे० शा० विष्णु शास्त्री पंडित ह्यांनीं व वे० शा० नारायणाचार्य गजेंद्रगडकर ह्यांनीं व दोहोंपक्षाचे पंचांनीं व तर पंचांनीं बहुत मेहेनत केली हे त्यांनीं लो

कावर उपकार केले ह्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों तसेंच आमच्या स्वामीमहाराजांनीं इतकी खटपट करून हा वाद वाढविला ह्याबद्दल त्यांचे ही आभार मानणें योग्य आहे, परंतु गुरु महाराजांची ह्यापेक्षां पुढें आमच्यानें स्तुति करवत नाहीं ही मात्र मोठी दुःखाची गोष्ट आहे. असें आम्ही समजतों. स्वामींची पक्षपाताची वर्तणुक नसती तर त्यांच्या गादीच्या थोरपणास विशेष भूषण झालें असतें. असो, ह्या वादाच्या परिणामावरून अज्ञजन जे आहेत, ज्यांस चावटपणा व टवाळकी ह्यांजपेक्षां दुसरें कांहीं समजत नाहीं, ते पुनर्विवाह पक्षाचा अपजय झाला म्हणून म्हणतील. विष्णुशास्त्री पंडित ह्यास हाच्या तितक्या ते कदाचित् शिव्या देतील. हें सर्व आम्ही समजतों, परंतु विष्णुशास्त्री व पुनर्विवाहाचे दुसरे अभिमानी ह्यांस आमचें सांगणें आहे कीं, असल्या अज्ञान, व अप्रयोजक लोकांच्या चावटपणाची त्यांनीं एक क्षणभरही पर्वा करूं नये. आजचे लोक कदाचित् त्यांस शिव्या देतील परंतु पुढील प्रजा त्यांस दुवा देतील ह्यांत संशय नाहीं; कारण वस्तुतः पाहिलें तर पुनर्विवाहपक्षाचा जरी सर्वांशीं जय झाला नाहीं तरी ह्या वादापासून त्यास पुष्कळ फायदा व भूषणही झालें व बराच नफही झाला हें उघड आहे. पहा कीं, ह्या पुनर्विवाहपक्षास किती अडचणी होत्या. एक सरपंच व त्यांचे पंच हे त्या पक्षांतील नव्हते. त्यास ह्या पक्षाचा बिलकुल अभिमान नव्हता. जें आपणास खरें दिसेल तें बोलावयाचें अशा त्यांनीं शपता घेतल्या होत्या. बरें इतकेंही असून जर कोणास असें वाटत असेल कीं, शपता घेतल्या म्हणजे लोक खरेंच बोलतात असें नाहीं, ज्या कोडतापुढें खोटी शपत वाहील तो केवळ बहिष्कारच भेऊन राहाणार असें नव्हे तर शृंखळा पडून बिन भाड्याचे घरांत जावें लागणार असें माहीत असतां थोर थोर कुळांतील लोकही खोट्या शपता वाहतात तर पंचापैकीं कोणीही खोटें म्हणजे आपल्या वास्तविक अभिप्रायाविरुद्ध मत दिलें असेल म्हणून कशावरून, अंदरकी रामजानें; अशी जर कोणाची शंका असेल तर ह्यावर इतकेंच उत्तर आहे कीं, एक तर ही गोष्ट अशा विद्वान लोकांविषयीं संभवत नाहीं व जरी कदाचित घटकाभर संभवते असें धरलें तरी आपल्या खऱ्या मता विरुद्ध बोलून पुनर्विवाह पक्षाचें खंडण कोणी करील हें तर मनातच आणणें नको; कारण असें करण्यांत फायदा नाहीं इतकेंच नव्हे तर उलटें नुकसान आहे. प्रस्तुतची स्थिती अशी आहे कीं, पुनर्विवाह अशास्त्र म्हणण्यांत लोकप्रिती वगैरे अनेक प्रकारचे फायदे आहेत, परंतु सशास्त्र म्हणण्यांत सर्व प्रकाचें नुकसान आहे; तेव्हां आपलें खरें मत पुनर्विवाह अशास्त्र आहे असें असतां तो सशास्त्र कोणी म्हणेल असा बिलकूल संभव नाहीं हें पुनर्विवाह पक्षाकडील पंचांविषयीं झालें. आतां विरुद्ध पक्षाकडील पंचांची स्थिति पाहिली तर सर्व सभेत उघड पणें त्यापैकीं एकजण वे० शा० दिनकर शास्त्री खांबेटे स्पष्टपणी अशा अर्थी बोलले कीं तत्वबोध कशाचा आणि काय कशाचा, आमचा वाद म्हणजे आपला जल्पच कसा तरी विष्णुपंडित ह्याचा पाडाव करावयाचा अशी आमची इच्छा आहे. हें बोलणें कदाचित वे० शा० नारायणाचार्य बोलते तर फारशी चिंता नव्हती कारण जसे पंडीत तसेच ते. दोघेही वादी. परंतु जे शपता घेऊन पंचांचें म्हणजे न्यायाधिशाचें काम करण्यास बसले होते त्यांनीं आपल्या मनाची अशी वृत्ती ठेवणें व त्याप्रमाणें बोलणें हे बोलणारांच्या अंगीं कपट नाहीं असें दाखविणारे होय खरें, परंतु अति लज्जास्पदही होय हें उघड आहे सारांश अशा प्रकारची अडचण पंचांच्या संबंधानें पुनर्विवाह पक्षास होती. तसेंच विरुद्ध पक्षाकडे अनेक शास्त्री पंडित होते. ते सर्व नारायणाचार्य ह्यांस मदत करित. इकडे विष्णुशास्त्री एकटे; ह्यांस शास्त्राची वगैरे मदत करणारा म्हणण्यासारखा एकही नव्हता निदान नारायणाचार्य ह्यांस विष्णु शास्त्र्यांपेक्षां बहुत लोक मदत करणारे होते. ह्या व अशाच दुसऱ्या ही कित्येक अडचणी पुनर्विवाह पक्षास होत्या असें असूनही जर वे० शा० कृष्णशास्त्री चिपळोणकरांसारखे विद्वान व स्वामी आज्ञा वगैरेही पक्षपाताची असली तरी तीस शिरसावंद्य मानणाऱ्या धार्मिक गृहस्थांस जर पुनर्विवाह सशास्त्र आहे असें ह्या वादापासून वाटूं लागलें तर ह्यांत पुनर्विवाह पक्षाचा बराच जय झाला म्हणण्यास हरकत नाहीं. आज पर्यंत पुनर्विवाह म्हणजे केवळ थोतांड आहे हें विष्णुशास्त्र्यानींच कांहीं खोटें बंड काढलें आहे, अशी जी साधारण लोकांची समजूत होती ती खोटी आहे असें अनेक कारणावरून आतां स्पष्ट दिसतें. एक तर जर हें सर्व पोकळ असतें तर जगद्गुरूस ठिकाठिकाणचे थोरथोर पंडित बोलावणें व स्वमार्थांत पंडित कमी आहेत म्हणून मध्यांस बोलावून आपली मानहानी करून घेणें व लढाईची कडेकोट तयारी करणें ह्या गोष्टींची काय गरज होती. तसेंच जर हें केवळ थोतांड असतें तर चार विद्वानांस तरी तें कां सशास्त्र वाटतें. सारांश ह्या वादापासून विष्णुशास्त्री ह्यांचें मत सर्वथैव थोतांड नव्हे तर कोणास तें शास्त्र संमत वाटतें, कोणास वाटत नाहीं इतक्या योग्यतेचें तें आहे असें स्पष्ट सिद्ध झालें. हा म्हणजे अल्प जय आहे असें कोणी समजूं नये. ह्याकरितां आमचें पुनर्विवाह पक्षास असें सांगणें आहे कीं, त्यांनीं आपला क्रम अगदीं न अडतां चालुं द्यावा. अल्प कालांतच ईश्वर त्यांच्या सत्पक्षास ह्याही पेक्षां विशेष मदत करिल ह्यांत संशय. नाहीं.

असो वर सांगितलेल्या गोष्टी हा वाद जसा व्हावा तसा झाला असतां तरीही खऱ्या अशा आहेत, परंतु वादच बरोबर झाला नाहीं असें आमचें मत आहे. एकंदरींत पाहतां हा वाद म्हणजे केवळ थट्टेचाच होता म्हणण्यास चिंता नाहीं. ह्या वादांत शास्त्री लोकांनीं कशी वर्तणूक केली व स्वामींनीं कशी केली व जे तिऱ्हाईत गृहस्थ पाहण्यास जात होते त्यांस किती कंटाळवाणा तो वाद झाला, व न्यायमिमांसेचा कसा वर्षाव चालला होता, व विधवाच्या "नष्टमृते" ह्या श्लोकाची कशी ओढाताण झाली वगैरे गोष्टी पुढील अंकांत लिहून प्रस्तुत थोडक्यांत इतके सांगणें अवश्य आहे कीं, पुण्याबाहेरील लोकांस केवढा वाद चालला आहे किती पुण्यांत पंडीत जमले आहेत. असा भपका मात्र दिसतो खरा, परंतु अडनाड्या पंडितांचा व विद्वज्जनाचा हा वाद होता व स्वामी समक्ष तो ऐकण्यास बसत होते हें सांगण्यास देखील आम्हास लाज वाटेत. जुन्या पंडितांचे वाद हमेषा असेच असले तर तें पुनः पहाण्याची आम्हीं इच्छा करणार नाहीं. असो पंचाचे अभिप्राय आमच्या हातीं आले म्हणजे ह्या वादाविषयीं जें लिहिणें आहे तें लिहूं. ज्ञा. प्र.

## STANDARD RALWAY TIME

A junction having been effected of the two trunk railways between Bombay and Calcutta, the Bombay Government have proposed that as Madras is the only Government Observatory in India, its time shall be adopted on these lines.

Jubbulpoor time is now in use on the system of the East Indian, Railway, as well as on railways connected with it. It is said to be 32 minutes later than Calcutta time, but is more correctly 34 minutes 6 seconds, Madras time is 32 minutes 49 seconds later than Calcutta. Practically, Madras and Jubbulpoor times are identical, and the proposed change if approved, would scarcely effect the railway system of Northern India.

The Telegraph Department uses Madras time, and should therefore be in a position to give the true Madras time at any station where there is a Government Telegraph Office. Its adoption would have the advantage of being fairly convenient to Calcutta, Bombay and Lahor, and therefore to the included area, whilst to Madras itself as one of the great cities of India it would necessarily be acceptable. It would futher be convenient when through railway communication is established between Madras and Bombay, which may be looked for in the cource of a few months.

The Governor General in Council is accordingly pleased to approve of the adoption of Madras time on the Great Indian Peninsula Railway, and to desire that the time in use on the East Indian Railway and on the railways connected with it may be modified at an early date to the same standard. For this purpose, Madras time may, as in the Telegraph Department, be considered 33 minutes later than Calcutta time, and the change will be only one minute on the railways of Northern India.

## DEATH OF THE TAKORE SAHIB OF BHOWNUGGUR.

We regret to learn that His Highness the Takore Sahib of Bhownuggur died at 2 P.M. on Monday last. He had been ill for about four months, and was prevented thereby from coming to Bombay at the time of the Duke of Edinburgh's visit. His munificent gift of a lakh of rupees for the purpose of raising public works in commemoration of the Prince's visit proved the interest he took in that event. We may add that it is desired, subject to approval, to expend Rs. 75,000 of that sum on special works in the State Itself, and Rs. 25,000 in any other parts of the Bombay Presidency. The departed Chief had ruled for a period of sixteen years. Of his personal character people speak favourably, and amongst the work he has done, mention is made of dispensaries established, English and vernacular schools founded, a jail built, courts of justice raised, and in connection with the last-named a written code of laws promulgated. He has left two sons, aged respectively thirteen and eight. His own age was 43. The Takore of Bhownuggur is a first-class chief of Kattywar, entitled to a salute of eleven guns. On an average the revenue of the State amounts to twenty lakhs, the population is estimated at bout 600,000, and that of the capital from 70,000 to 80,000. The capital is a seaport of considerable importance, and cotton is largely exported from it.

## PROTECTION FROM HEAT, OF PASSENGERS IN TRAINS DURING THE HOT SEASON.

RESOLUTION BY THE GOVT. OF INDIA, P. W. DEPT., DATED 5TH APRIL 1870.

The Governor General in Council desires that the attention of the officials of the several railway companies may be immediately invited to the urgent necessity for endeavouring by every measure in their power to render travelling during the hot season less trying and dangerous, especially to those who are not natives of India, including their own servants, the guards, drivers and firemen, who are necessarily exposed to the worst heat.

It is believed that on the East Indian Railway the addition of a double roof to the third class carriges has been found to reduce the temperature somewhat when the vehicles are not in motion, and that this improvement has either been, or is being, applied to the whole stock. The first and second class vehicles have all along had this advantage, and it is evident that some thing more is wanted to reduce the risks encountered by Eropeans in travelling even in those carriages. One obvious improvement would be the fitting of taties to the windows with applian ces for watering them, and the Governor General in Concil trusts that it is only necessary for him thus to draw attention to the matter to ensure immediate steps being taken to provide first and second class carriages with this means of keeping down the extreme temperature that must otherwise previl in railway carriages in most parts of India during the hot months. There is no time to lose if this advantage is to be secured during the season just commencing.

The Governor General in Concil has no reason to suppose that the companies would desire to make any extra charge for this convenience, and it does not appear that the supply of the tatties and the arrangements for keeping them moist need be productive of much expense. But His Excellency in Council considers that no objection should be made to the demand by the railway companies of reasonable extra payment from those who desire to avail themselves of the means of comfort thus placed within their power, rather than there should be any hesitation or daly on the part of the companies in acting in this suggestion.

But while His Excellency in Council thus advocates the interests of the public, he is not less mindful of the severe trail which the running and working of every train must prove to the working staff during the hot weather months, and especially to the drivers and firemen. How far the cabs of the locomotives may be improved toward off the effects of the sun from those who, in addition, have to bear the great heat inseparable from their position on the engine, without interfering with their efficiency, is deserving of the most carefull investigation of the departmental officials. The prudence of subjecting the drivers and firemen to the effect of a tatty may perhaps be questioned but it would seem desirable at least to try its effect ex erimentally, as well as to end eavour to devise some other means by which the temperature may be kept down. For the guards, a tatty fitted to the brake-vans would be a simple expedient.

SCHOOLS IN BERAR.

To,
The Editor of the "Berar samachar" AKOLA.
Sir

May I request the favour of your kindly inserting the following few lines in a corner of your widely circulated journal.

Education in no doubt a great source, which tends to produce happiness to the public at large. He who stors up in himself large amounts of wealth, precarious is not to be considered great except when he possesses in himself fruits of education and good training, whereby he benefits not only himself, but also those surrounding him.

In looking into the past history of this fruitful province we find that it was backward and by all means quite destitute in point of education. Their education then rested in reading and writing Modi only pretty well and no more. They were in fact so ignorant as many are now, that they never liked to try their fortunes in another profession than the one to which they belonged. The only happy people then were the Deshmooks and Naibs (creatures with shining wings feeding on rattennes). This class of people with the force of the power with which they were invested, used to make the worst possible use of it by torturing the poor subjects under their control and filling their own pokets, at the expense of the poor people not considering in the least the difficulties and miseries with which they [people] would pass the course of their life.

[to be continued.] S

## अकोला.

नबाब सर सालरजंग हे ता० ७ एप्रिल रोजीं हैदराबादेस जाऊन पोंचले.

मे० हाडर्न साहेब डेप्युटी कमिशनर हे नरनाळा मुकामी असतां दोन बडे जंगी वाघ मारले असें म्हणतात. साहेबांची स्वारी काल रोजी आपल्या कांसह येथें येऊन दाखल झाली.

म्युनसीपाल कमेटीस सुचना-आम्हांस चांगल्या आधारावरून कळतें कीं, कित्येक घर वाले लोक आपले येथील तारद खाने स्वछ ठेवीत नसल्याने आसपासचे रहाणारे लोकांस फराईना फार होते व त्या जपासून रोग वगैरे होण्याचा हीसंभव आहे तर म्युनसीपालकमेटीस याज्वस्तेकडे लक्ष देऊन सर्व लोकांस तारद खाने स्वछ ठेवण्या विषयीं ताकीद देतील अशी आशा आहे.

येथील लायब्ररी आलिकडे कांहीं क्षीण होऊं लागली आहे. प्रत्येक आदितवारी सभा भरत असते. परंतु ज्या प्रमाणें सार्वजनिक कार्यास लोकांनी झटावें त्याप्रमाणें इकडील लोक झटत नाहींत. ही मोठी दिलगीरीची व ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे तर सर्व लोकांनीं आपला उदार हस्त पुढें करून तीस सहाय करून तीचे बरेपणा विषयीं झटावें असें सर्व लोकांस सुचविणें आहे. व सर्व लायब्ररीचे मेंबर लोकांस असें सुचवीतों कीं, त्यांनी मागील रवीवारी ज्या प्रमाणें केले त्याप्रमाणें न करता लवकरच जमतील अशी आशा आहे.

आलीकडे येथे बानाजी तुळशी राम म्हणून एक गृहस्थ प्रख्यात कसरत करणार आले आहेत. हेंगाकामांत अप्रतीम हुशार आहेत असें कर्णोपकर्णीं ऐकत आहों. त्यांची कसरत कोयक बडे बडे लोक मिळून उदईक करणार आहेत त्याजबद्दलची ज्यास्त माहिती पुढील खेपेस देऊं.

## वर्तमानसार.

मुंबईचे कायदे कौन्सिल—माजिस्त्रेट लोकांस एकसारखे नवीन शिक्षे द्यावे म्हणून मसुदा झाला होता तो सीलेक्ट कमिटीनें मंजूर केला. थोडे दिवसांपूर्वी कापसाबद्दल जो आकट ह्या कौंसलांत पसार झाला तो जुलमी आहे म्हणून विलायतेंतील म्यांचेस्तर एथील लोक स्टेट सेक्रेटरीकडे अर्ज करणार आहेत.

जंजिरा—एथील हापशानें विलायतेस पार्लिमेन्टास असा अर्ज केला आहे कीं माझी बायको व कुटुंबाचीं माणसें मुंबई सरकारानें विनाकारण कैदेंत ठेविलीं आहेत तीं सोडावीं.

काबूल—मेगाना येथील अमिर शेरअली याचेवर रयतेनें बंड केलें आहे. कित्येक अमीर यांचे पक्षपाती होते त्यांस बंडवाल्यांनी ठार मारलें. आणि सामान मिळवण्यासाठीं, तटबंदी करण्यासाठीं, आणि हल्ला आला तर तो मागें हटवण्यासाठीं बंडवाल्यांकडून मोठी तयारी चालली आहे. पण अमिरांनीं तिकडे लक्ष पुरविलें तर बंडवाल्यांनें पारिपत्य करण्यास उशीर लागणार नाहीं. गेल्या महिन्याच्या ७ व्या तारखेस पेशावर येथील कमीशनरांकडून अमीरांस एक खलीता आलेला मिळाला, तो पाहून अमीर फार खूष झाले आणि इंग्लिश सरकारचे आभार मानले असें "टैम्स आफ इंडिया" वरून कळतें.

विधवांकडून बालहत्येचीं पातकें झाल्याबद्दल मागें हीं बरीच उदाहरणें आहेत. आणि आज एक आम्ही तसें लिहितों, खानदेशांत विंचुरास गडी नजीक एक उपजलेलें मूल मारून टाकलें आहे अशी खबर खानदेश पोलिसाचे इन्स्पेक्टर मि० शिवराम पडूरंग हे तेथें कांहीं कामासाठीं गेले होते त्यास समजली. लागलीच त्यांणीं चौकशी चालऊन मोठ्या शिताफीनें गुन्हा करणारीस शोधून काढली आणि डाकतरकडे रवाना केली केली. डाकतरानें तीच नूतन बाळंत झालेली आहे अशी खात्री केली व अन्य पुरावा ही तीच बाळंत झाल्या विषयीं झाला. ही विधवा चितपावन ज्ञातिची असून इचें नाव गंगा व मयत नवऱ्याचें नांव बाळा जोशी, पुनर्विवाहास आयणारास अशा गोष्टी घडाव्या आणि सरकार कचेरींत जाऊन फजीतीचे फजीतीचे पवाडे व्हावे यांत आनंद वाटतो?

स्तुत्यगोष्ट—आम्हास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, मेहेरवान धनजीभाई साहेब हुजूर डेपुटी कलेक्टर ह्यांनीं आपले माळशिरस तालुक्यांतील लोकांस विलायती तऱ्हेचे नांगर व पभरही यंत्रें चालू केल्यानें किती फायदा होतो याजविषयीं चांगल्या प्रकारचा उपदेश केल्या वरून भई साहेब यांणीं सदरहू यंत्रें आणविण्याविषयीं निकळ आणि कांहीं कंपनीस लिहून पाठविल्याचे कळतें ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. ह्याच प्रमाणें सर्व अधिकार लोक आपआपले तालुक्याची अशा प्रकारे सुधारणा करूं इच्छितील तर रयत इंग्रज सरकारास दुवा देऊन आपल्या आधकाऱ्याच्या इच्छे प्रमाणें ते आपले वर्तन ठेवण्यास मागें घेणार नाहींत. ग. पि.

## मागाहून आलेल्या जाहिराती.

नोटिस—रामराव पुरुषोत्तम देशपांडे मगणें अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे नांव अकोल्यांत खरीदागांत याचे नावावर तारीख १२ सन १८७० रोजीं लागलें म्हणून समजलें आहे परंतु असिस्टंट साहेब बहादूर यांजकडे अर्ज आम्ही केला आहे त्याजविशीं कांहीं निकाल झाला नाहीं हें तुम्हास माहित आहेच तर तुमचा आमचा आपसांत निकाल व्हावा हें नोट आहे.

कुळकर्णीपणा व पाटिलकी हे तुमची आमची सामिलात आहे याजवर तुम्ही गुमास्त नेमाल ते नेमूनये कारण कीं आम्ही स्वतः काम करणार आहों तर तुम्ही साल पाळिची वांटणीं करून गांवचे वहिवाटीस द्यावे हें लायख आहे खिसा वाढवूनये हें तुम्ही समजा.

सदर वतनावर जो तुम्ही कुलमुखत्यार नेमाल तो विचार पूर्वक नेमावा त्याजपासून वृत्तीसंबंधीं कांहीं नुकसान झाल्यास आम्ही सोडणार नाहीं व कुटुंबांतला नेमला पाहिजे म्हणून खुदावंत गवरनर जनराल साहेब बहादूर यांणीं ठराव नंबर २३९ तारीख २३ नवंबर सन १८६४ चा केला आहे त्यांतील कलम ३ याजवर लक्ष द्यावें. नेमला असतां आम्ही त्याचा खर्च म्हणजे हक्क देणार नाहीं.

सदरीं दोन कलमी मजकूर लिहिला आहे तो पाहून उचित आहे कीं आपसांत निकाल करून वतन संरक्षण करावें तर तुम्ही ही नोटिस पावल्या दिवसापासून ८ दिवसांत आमचा सदरीं दोन कलमाचा निकाल करावा व गांव वहिवटीकडे द्यावे तसें मुदतींत तुम्ही न केल्यास या नोटिशीचे खर्चासुद्धां वरिष्ठ कोडतांत दावा करून त्याविशींचा खर्च तुम्हास देणें पडेल तारीख १९ एप्रिल सन १८७०

(सही) खंडराव माधव देशपांडे दत्तक गोविंद माधव.

नोटिस—गुलाब दगडू मडद राहणार पिंपळगांव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही आम्हावर दोन हजार रुपयाचा अकडा तीन महिन्याच्या करारचा केला त्या अकडयाचा करार गुजरून गेला आम्ही रुपये मागत असतां देतो म्हणून सांगता, परंतु देतनाही तर आंनोटिशीचे तारख पासून आठ दिवसांचे आत निकाल करून रुपये आणून द्यावे व रुपये पावल्याबद्दल आम्ही पावती देण्यास कबूल आहो तुम्ही रुपये या मुदतीचे आंत न आणून द्याल तर शेकडा तीन रुपये प्रमाणें व्याज घेतलें जाईल कळावें तारीख १६ माहे एप्रिल सन १८७० ईसवी-

(सही) भाऊदाजी
मौजे पिंपळगाव तालुके जळगांव

नोटिस—बळिरामभट बिन नयरामभट वस्ती पिंजर व भगवान गायकी वस्ती मजकूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, प्रगणे पिंजर येथील जागा पूर्वेस घर भई विपंत राश्रिनेत भगवान गायकी दक्षिणेस आमचें राहतें घर उत्तरेस उजाड जागा व ह्या जागेत निरोप एक ही जागा वडिलोपार्जीत आमची असून नेहमी आमचे वहिवाटींत असता व आम्ही तेथें जागा बांधीत असतां तुम्ही हरकत केली होती त्याबद्दल मुलकीतही काम चालून शेवटीं दिवाणीत हक्क शाबिद करून घेण्याबद्दल दावा करावा म्हणून हुकूम झाला. यावरून तुम्हास नोटिस देण्यात येते कीं सदरहू जागा लांब हात २७ व रूंद हात १४ ही तुम्ही आज तारखेपासून १० दिवसांचे आंत हरकत न करिता आमची आम्हास दिल्यास उत्तम आहे नाहीं तर त्या जागेची किंमत कायद्या प्रमाणें आकारली जाऊन दिवाणीत फिर्याद करावी लागेल. तो दिवाणी कोडताचा सर्व खर्च व वकिलाचें इनाम वगैरे सर्व खर्च ह्या नोटिशीचे खर्चासुद्धां तुम्हास देणें पडेल व सदरहू जागा विषयीं दिवाणींतून निकाल होईपर्यंत तुम्ही कोणतेही प्रकारचा इमला वगैरे बांधून ये. जर ही नोटिस अमान्य करून तुम्ही इमला वगैरे बांधल्यास त्याचा खर्च तुम्हास आम्हाकडून न मिळता उलटा तो इमला आमचे सोईकरितां काढून टाकणें झाल्यास जो खर्च लागेल तो तुम्हास द्यावा लागेल तारीख १९ एप्रिल सन १८७०

(सही) हरभट बिन निळभट वस्ती पिंजर यांचे वती पांडुरंग गोविंद वकील.

नोटिस—रामदयाळ नथमल साहू वहिवाटदार कुंदनमल दुकान खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐसीजे तुमची नोटिस तारीख ९ एप्रिल सन १८७० ची वऱ्हाडसमाचार पत्रातील पावली. तिचें उत्तर देण्यात येतें तें असें कीं, तुमचा आमचा नगदीचा व्यापार कधींच चालिला नसून तुमचें आम्हास कोणतेही प्रकारें देणें नाहीं. तुम्ही सालमजकूरचे भाद्रपदमासी पौष शुद्ध १९ चे करारचीं ओझीं देऊं केलें होतीं, आणि त्या करारचे मितीस ओझयाचा भाव कमी झाला असूनही आम्ही ओझीं मागण्यास आलों असतां तुम्ही ओझीं दिलीं नाहींत ह्यामुळें आमचें व उलटें नुकसान झालें आहे व तें मिळण्याविषयीं आम्ही तुम्हावर दावा करणार, परंतु कांहीं कारणानें केला नाहीं. शिवाय आमचें घेणें तुम्हाकडे आल्याबद्दल आम्ही तुम्हावर अकोले येथें नंबर १६६ सन १८७० चा दावा केला आहे तुमचें आम्हास कोणतेही प्रकारानें देणें नाहीं असें असून तुम्ही नोटिस दिल्यानें आम्हास हा जबाब देणें भाग झालें सबब ह्या नोटिशीबाबद खर्चास तुम्ही जबाबदार आहांत करितां खर्चाचे रुपये पाठऊन द्यावेत न दिल्यास त्याबाबद ही दावा केला जाईल कळावें तारीख १६ एप्रिल सन १८७०

(सही) नानकराम संतुकलाल मारवाडी द० ख०

## जाहिराती.

नोटिस—गुण्याबल्द दानव्या धनगर रहाणार बेलूर प्रगणे आडगांव तालुके अकोट यांस खालीं सही करणार गमाई मर्द गुण्या धनगर रहाणार बेलुरे तालुके मजकूर इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुझी लग्नाची बायको असून आज लग्न झाल्यासही सुमारें १० वर्षे झालीं लग्न करते वेळेस माझे आईबापानीं तुजपाशीं असा ठराव केला होता कीं तूं आमचा घरजावई होशील तर आम्ही आपली पोरगी तुजला देऊं. त्याप्रमाणें तूं घरजावई होण्याचें कबूल केल्यावरून माझे आईबापानीं माझें लग्न तुजशीं लाविलें बरें, लग्नाचे वेळेस तर मी लहनच होतें परंतु मी आतां वयांत आल्यास चार वर्षे झालीं तेव्हांपासुन आज १० वर्षें पर्यंत तूं माझे आईबापाचे घरीं मजला वागविलें नाहीं. बरें माझे आईबापानीं तुजला त्यांनीं आपले घरा शेजारीं घर बांधून दिलें. तरीही तुजला वागवत नाहीं आतां मी वयांत आल्यास वर्षे चार झालीं आणि तुजला नीट रीतीनें वागवीत नाहींस येणेंकरून माझे तारुण्याचे दिवसही फुकट जाणार असें मजला वाटल्यावरून मी आपले आईबापास म्हटलें की माझा नवराही मजला वागवीत नाहीं तेव्हां माझें घरदार तरी कसें होणार यावरून माझे आईबापानीं त्याजला व मजला चौघा पंचांत नेऊन पंचाईत कारितांना तूं साफ म्हणालास कीं मजला बायकोची गरज नाहीं व तें खरें वाटण्याकरितां तूं स्टांप कागदावरही लिहून दिलें आहेस कीं तूं दुसरा नवरा करण्यास मुकत्यार आहेस मी अडथला करीन तर सरकारचा गुन्हेगार व जातीचा खोटा होईन असे आहे इतकेकरूनही मजला आणखी वाटलें कीं तुजला आणखी एकवार निक्षुण विचारावें यावरून तुजला आज मी लेखीं नोटिस दिली आहे तरी तुजला माझी गरजच असेल आणि वागवीत असशील तर लग्न झाल्या दिवसापासून माझे आईबापानें मजला खावयास घातलें व वस्त्रपात्र दिलें त्याचे खावटीचे रुपये दरमहा ५ प्रमाणें ६०० दहावर्षांचे व मजला चांगल्या रीतीनें वागवीण्याबद्दल भल्या मनुष्याची जामिनकी आजपासून ८ दिवसांत माझे आइपाशीं हजीर कर कारण कीं माझा बाप मरून आज सुमारें दिड किंवा दोन महिने झाले असतील याकरितां ह्या दोन्ही गोष्टी तूं जर न करशील तुझी अगदीं वाट न पहातां तुझे स्टांप कागदाचे लिहिलेप्रमाणें मी दुसरा नवरा करीन मग तुझा दस्तऐवज मजकडे कांहीं एक चालणार नाहीं हो नोटिस लिहून दिली सही तारीख ९ एप्रिल सन १८७० इ.

( सही ) गमाइ मर्द गुण्या धनगर इचे हातची बांगडी.

---

नोटिस—बाळाजी वलद भगवान दांडेकर वस्ती इसापुर पिंपळगांव तालुके बाळापूर यांस सोनाजी भवानी कुळकरणी मौजे खेडळ तालुके मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडे आमचे रुपये येणें असून त्या रुपयां ऐवजीं आम्हाशीं मौजे मजकुरची जमीन च्यार नंबर गहाण ठेविली होती त्याजपैकीं तिनशें सत्याणव रुपयांत तीन नंबर आमचे ताब्यांत निरंतर दिले व बाकी राहिलेली रकम येणें असून त्या ऐवजीं पडीत नंबर गहाण असून तुम्ही तो नंबर दुसरे लोकांस देऊं इच्छिता त्यास या नोटिशीनें तुम्हास कळविण्यांत येतें कीं आमची आदाई झाल्या खेरीज कोणास हीं शेतें गहाण किंवा बक्षिस किंवा खरेदी देऊंनये जर तुम्ही दिल्यास आमचा हक्क लेखाप्रमाणें त्या शेतावर बहाल आहे तारीख १४ एप्रिल सन १८७० इ.

( सही ) सोनाजी भवानी कुळकरणी मौजे खेडळें द. खु.

---

## विक्रीकरितां तयार आहे.

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं त्यायांचे व वकिल्याचें काम करणारांस व उमेदवारास मुदतीचे कायद्यासंबंधी कित्येक हाय कोर्टानें केलेले ठरावांची चांगली मदत मिळावी याहेतूनें हा ग्रंथ तयार केला आहे. या ग्रंथाची रचना अशी केली आहे कीं, सन १८२७ चा कायदा ५ व सन १८५९ चा आक्ट १४ याचीं कलमें त्याचें नंबराचें अनुक्रमानें छापली आहेत व त्यांतील मजकुरासंबंधी जाहालेले सर्व ठराव प्रत्येक कलमाचे खालीं लिहिलेले आहेत टरावाच्या नंतर तारीख व कोणत्या ठिकाणीं सापडेल अशा विषयीं पुष्कळ आधार लिहिले आहेत मुंबई मद्रास व कलकत्ता, यातिन्ही हायकोर्टाचे मुदतीसंबंधी ठराव त्याचे तारखेच्या अनुक्रमानें एक सकट नलिहिता प्रत्येक हाय कोर्टाचे ठराव तारखेस अनुक्रमानें जुळून प्रथक दर्शविले आहेत प्रथम कायद्याचा किंवा आक्टाचे कलम लिहून त्याखालीं प्रथम तारीखवार मुंबई हाय कोर्टाचे ठराव लिहिले आहेत नंतर मद्रास हाय कोर्टाचे ठराव व त्यापुढें कलकत्ता हायकोर्टाचे ठराव लिहिले आहेत.

दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयीं कायद्याचे अगर इतर कायद्याचे आक्टाचे कलमावर मुदती संबंधी जाहालेले ठरावांतील वीं तीं कलमें लिहून त्याखालीं वरील नियमाप्रमाणेंच ठराव नमुद केले आहेत.

ज्या ठरावांत कोणतेही कायद्यांचे कलम दर्शविलें नाहीं ते ठराव याग्रंथाचे शेवटीं किरकोळ बाबदींत प्रकर्ण वार नमूद केले आहेत शिवाय सन १८२७ चा कायदा ५ व सन १८५९ आक्ट १४ हे ग्रंथाच्या शेवटीं संबंध जोडले आहेत.

या ग्रथांत मुंबई हायकोर्टाची बाल्युमें ५ मद्रासची ३ व कलकत्याची ११ मिळून वाल्युमें १९ यांतील शिवाय वर्तमानपत्रां मिळोन एकंदर ठराव ७२० सुमार जाहाला आहेत.

याग्रंथाची किंमत रुपये ४ व टपाल हशील ०६ ठेविली आहे तरी हा ग्रंथ घेण्याची ज्याची इच्छा असेल त्याणीं हुंडी मनी आर्डर अथवा टिकोटें वरील दराप्रमाणें सोलापूर येथें आमचे कडे अगर कल्पतरु छापखान्यांत पाठविल्यास बुक रवाना करण्यांत येतील टिकोटें पाठविणें झाल्यास एक आण्याच्या आंत असून वर्तावळ्या सुद्धां पाठवावी.

ता० ५ मार्च सन १८७० } विश्वनाथ नारायण सहस्रबुधे वकील व डेप्युटी गव्हरमेंट प्रासिक्युटर अदालत सोलापूर.

---

## विश्वासराव.

सर्वत्रांस कळावें कीं, आम्हीं हल्लीं एक नवीन पुस्तक विश्वासराव नामें मराटी भाषेंत तयार करून "पुणें ज्ञानप्रकाश' छापखान्यांत देखाव्याचे सुंदर टाइपावर छापण्यास दिलें आहे. तें मे सन मजकूर महिन्यांत छापून तयार होईल.

यांत शृंगार, वीर, करुणा, शोक, विनोद, इत्यादि रस असोन दहा भाग आहेत. हेंपुस्तक (पूर्ण स्वत: कल्पेल मजुनो षा )पुस्तका येवढें होईल. यांत कित्येक ठिकाणीं अकस्मात घडून आलेलीं आश्चर्यकारक कृत्ये अंत:करणास रंजविणारीं आहेत; व सातवे भागांत कांहीं कविता बहुतेक सुरस वृत्तांची आहे.

हें घेण्याची ज्यांचीइच्छा असेल त्यांस अगाऊ किंमत मे महिन्याचे आंत प्रत्येक पुस्तकास १ रुपया शिवाय टपाल खर्च ०२ आणे पडेल. सदर्हू मुदतीच पुढें घेणारांस एक रुपया चार आणे पडून टपालखर्च वेगळा द्यावा लागेल.

याची कींमत पाठविणें झाल्यास खालीं लिहिलेले ठिकाणीं पाठवावी.

१. पुणे येथें ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर यांजकडे.

२. मुंबईंत—रा० रा० माधवराव चिमणाजी आपटे बी.ए. श्री० रा० रा० जगन्नाथ शंकरशेटजी यांचे इंग्लिश स्कूलचे हेडमास्तर यांजकडे.

३. खानदेशांत— रा० रा० कृष्णशास्त्री दातार सिटीस्कूल हेडमास्तर धुळें यांजकडे.

४. संगमनेर जि० अहमनगर येथें रा० रा० गोविंद शंकर पिंपळखरे वकील मुनसिफ कोर्ट यांजकडे.

५ अहमदगर —रा०रा० सदाशिव एशवंत गाडबोले डे० रजिष्टर.

याप्रमाणें जशी ज्यांचीं सवड सांपडेल त्या त्या ठिकाणीं रोख कींमत, अथवा वर्तावळयासुद्धां तिकिटा पाठविल्यास बिनहरकत पुस्तकें मिळतील.

या पुस्तकास उदार आश्रय पुणें व मुंबई येथील मोठ मोटाले सभ्य व कामदार यांजकडून मिळाला आहे. असाच परिश्रमाचे साफल्यतेस सर्वांकडून मिळेल अशी पूर्णआशाआहे.

मुक्काम पुणें, ता० १३ मार्च सन १८७०.

नारो सदाशिव रिसबूड हेडकारकून सोलापूर सब डि. पुना मि. प. ब.डी.

---

## जाहिरात.

सन १८६७।६८।६९ चे आक्ट.

सन १८६७ पैकीं कांहीं व सन १८६८।६९ पैकीं सर्व मराठी आक्ट आणि सरकारचे कांहीं ठराव मिळून एकंदर बुक बांधून तयार झालें आहे, ज्या कोणांस घेण्याची मर्जी असेल त्याणीं किंमत रुपये २।८ व टपाल खर्च ०८ एकूण तीन रुपये पाठविले असतां बुक रवाना करण्यांत येईल. व हें न्यायाश्रय आफिसांत विकत मिळेल, तिकीटा पाठविल्यास एक आणा दराच्या असून वर्तावळ्यासुद्धां असाव्या. ह्या संबंधी कोणी पत्रेंबेगर पाठविल्यास पत्रे पोस्टपेड असावी. नाटपेड घेतलें जाणार नाहीं.

ता० २७ मार्च सन १८७० } त्रिंबकराव नारायण राजमाचीकर न्यायाश्रय मुक्काम पुणें.

---

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगेंया सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.

---

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ५ |
| फुटकळ ... ... ... | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ६१ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

---

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०१

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसाचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं आजवरदलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA:—SATURDAY EVENING, APRIL 23 1870 NO. 17

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २३ माहे एप्रिल सन १८७० इ० अंक १७


## बाळपणीं लग्नें.

हा विषय आजपर्यंत बहुतवेळां बहुत वर्तमान पत्रकर्त्यांनीं व ग्रंथकारांनीं हातीं धरून याचें प्रतिपादन केलें आहे, तरी आतां आम्ही पुन: याविषयीं लिहित आहों म्हणून कदाचित वाचक लोकांस नवल वाटेल व पिष्टपेषण केल्याचा दोष ते आम्हांवर ठेवण्यास तयार होतील तरी आम्ही असें सांगतों कीं रोगाचा जोंपर्यंत जोर तोंपर्यंत त्याजवर औषधाचा अंमल जरी बसत नाहीं तरी वैद्यांनीं औषध देणें बंद करतां कामानये त्यांणीं आपला क्रम येकसारखा सुरूच ठेविला पाहिजे. म्हणजे असें केल्यानें रोगास अधिक बळ नयेतां असें त्याहून दिवसेंदिवस कमी होईल हें उघड आहे कीं नाहीं; आणि येक दोन वेळां प्रयत्न करून यश नआल्यामुळें उदास होऊन स्वस्थ बसलें तरी म्हणतें रोग कमी होतो असें तर नाहींच उलटें लोकांस दोष ठेवण्यास मात्र जागा होते. दुसरें माळी जसा आपले मळयांतील गवत, केर, काडीकचरा, वारंवार वेंचून काढून टाकीत असतो व ते पुन: पुन: फुटतच असतें तरी तो कंटाळून उदास नहोतां त्यांच्या मुळयापर्यंत खोधीत जाऊन उकरून काढून टाकितो त्यामुळें त्यांचा मळा चांगला निरमळ फलदायक आणि सुखकारक होतो त्याप्रमाणें आम्हांस अशा प्रकारचे विषया विषयींतरकाळ जरी गूण नआला तरी काळें करून येईलच अशी आशा बाळगून वेळोवेळ लिहित असलें पाहिजे. उदास होऊन स्वस्थ बसणें उपयोगाचें नाहीं.

बाळपणीं म्हणजे अज्ञानपणीं मुलांचीं लग्नें केल्यापासून बहुत तोटे आहेत. येकदा लग्न लागलें म्हणजे त्यांची जन्माची गांठ पडली जाते यास्तव पुढें त्या उभयतां परस्परांचा स्वभाव येकमेकांशीं जमला तर बरें नाहींपक्षां मग तीं दोघेंही आईबापाचे नांवें रडतात व त्यास दोष देतात. या आमच्या वऱ्हाडप्रांतात देखील आम्ही पहातों कीं कुळबी, माळी, तेली, वगैरे लोक सुद्धां तीन च्यार वर्षांचा मुलगा व मुलगी महाली नव्हाली तों त्यांचीं लग्नें करितात पांच वर्षांचे काय, तीन वर्षांचे आंत लग्नें झालेलीं पुष्कळ आमचे नजरेस पडलीं आहेत जितके लौकर लग्न जहालें तितका थोरपणा विशेष मानतात वास्तुत: पाहिलें असतां त्या वयांत त्यांची काय परिक्षा होत असेल बरें? कांहीं नाहीं केवळ आईबाप आपआपले नांव लौकिकावरती लग्नें करितात यावरून तीं लग्नें त्या मुलांची जाहाली असें म्हणण्यापेक्षां त्यांच्या आईबापांच्या नांव लौकिकांचीच लग्नें जहाली असें म्हटलें पाहिजे व ते बरें शोभेल. अशा प्रकारच्या लग्नाचे परिणाम पुढें काय होतात तें पहा. त्या जोडप्यामध्यें अंतर एक वर्षांचें अथवा त्याहूनही कमी कित्येक प्रसंगीं मुलांपेक्षां मुलगी ही नवऱ्यापेक्षां नवरी वर्ष सहा महिन्यांनीं मोठी असते. मग काय. बारां अथवा तेरा वर्षांत मुलगी आपले पणांत येते आणि मुलग्याचा पण म्हणजे ज्वानीं अथवा पुरुषत्व तेथून चार व पांच मजलेवर दूर असतें यामुळें लोकांस थट्टा करण्यास व हसण्यास मात्र सवड सांपडते. कित्येक लुच्चे गोचालीचे लोक तिचें मन बिघडवून तिला वाईट मार्गास लावितात आणि मग तिला येकदां बाहेरचा चवणा लागला म्हणजे सर्व लक्ष तिचें निरंतर बाहेर असतें घरांतील संवसाराचें काम तिचे हातून व्हावें तसें होतनाहीं. सासू सासऱ्याचा वगैरे सासुरवास भोगावा लागतो शिव्या खाव्या लागतात कित्येक प्रसंगी मार ही सोसावा लागतो अशा भांसात कोणी चांगलाच लफंग मिळाला तर तो तिला बाहेर काढून स्वातंत्र्याचें सुख भोगण्यास वेशगाही बनवितो सारांश नवऱ्याचें आणि नवरीचें तारुण्य एक काळीं येत नाहीं यामुळें असे अनर्थ होतात व स्त्रिया अशा अनीती मार्गास लागतात यास्तव लग्नाचा निश्चय करतसमयीं पुढें तरी त्या उभयतांचे तारुण्याचे दिवस एक समयावच्छेदेंकरून येतील या धोरणानें त्यांच्या वयांत अंतर असण्याविषयीं सावधगिरी ठेविली पाहिजे म्हणजे जसें ऐन क्षुधेच्या समयीं जवळ भक्ष कांहींच नसेल तर दुसऱ्याचे तोंडाकडे पहावें लागतें. विंचना करावी लागेत, तो जठराग्नी एकदां प्रदिप्त झाला असतां अशी कांहीं दशा करून सोडतो कीं, उष्टा, शिळा, बाळला कसाही कोणी कुटका दिला तरी तो अमृतासमान समजून खळी भरून शांती करावी लागते; त्यावचून रहावत नाहीं करितां लाजही सोडावी लागते. तसें करावें लागणार नाहीं तथापि याशिवाय दुसरी एक गोष्ट मोठी अगत्याची असून तिजकडे लक्ष पुरविलें पाहिजे तें न पुरवितां हयगय करितात, व भीड धरितात तेणेंकरून पुढें जो फजिता होतो तो सांगतां पुरवत नाहीं. स्त्रिया आपले उमेदींत आल्या म्हणजे त्यांस पुरुषाचें वैगुण्य म्हणा अथवा शून्य म्हणा दिसूं लागतें आणि मग त्यांच्या पुरुषत्वाच्या अस्तित्वाचा भ्रम फोडून नास्तित्वाचा डंका वाजवितात वर्तमानपत्रांत नोटिसा देतात, आणि जातींत गोतांत असल्यास दुसरीं लग्नें करितात नसल्यास शताआड चोरी आणि नव्याआड छिनाली या म्हणीस अनुसरतात. तात्पर्य एकंदरीनें पहाता स्त्री पुरुषाच व्यवहार संबंधांत कीं विघ्नें येतात त्यांत अज्ञानपणचीं लग्नें बहुतांशीं कारण आहेत यास्तव या चालीचा लोकांनीं चांगला विचार करावा केवळ प्रचारावर जाऊंनये. आतां हा विषय आज आम्हास कशावरून सुचला म्हणाल तर ऐका. थोडे दिवसां पूर्वीं मेहेकर तालुक्यांत पांढर खेडें म्हणून एक गांव आहे तेथें एका मुलीचें लग्न झालें त्या मुलीचें वय सगळं एक वर्ष वेरी नाहीं हे !!! पाऊणवर्षाचें म्हणजे नऊ महिन्याचें आहे ताही नवा महिना पुरा झाला नाहीं चालूत आहे आणि मुलाचें वय तीन वर्षांचें आहे. वाहावा, वाहवा, वाहवा काय सुंदर जोडा हा ! हा समारंभ बघून त्या उभयतां वधुवरास पुढें किती आठवेल बरें! लग्न सोहाळा सर्व त्या उभयतांचे आईबापांनीं मोठे हौसेनें मंगळ खरा परंतु पुढील परिणामचा कांहींच विचार त्यांणीं केला नाहीं. शिव शिव ! हें काय कौतुक व होळ झांकही धन्य ती मातापितरें कीं ज्यांच्या प्रमाण्यांत पूर्वीं असेच एक लग्न लहानपणी झालें असून हल्लीं तो मुलगा नपुंसक निपजल्यावरून तो [illegible] फिरत होऊन दुसरे लग्नाची परवानगी मागत आहेत. [illegible] होऊन राहिल्या आहेत. कसोटीवरून आची परीक्षा घेवून खास षंढ ठरविला आहे हे प्रत्यक्ष त्याच गांवात त्याच जातींत त्यांच्याच भाऊबंदात त्यांच्या डोळ्यासमोर प्रकरण चालू असतां अविचारानें एकवर्षांची पोर झाली न झाली तों तिचें तीन वर्षांचे पोराशीं लग्न करितात व आपणच सदरील षंढाचे पंक्तींतील नसून नाशिवास हात लाऊन रडतात यास म्हणावें तरी काय हरहर परमेश्वरा ! कधीं आमचे देशांतील लोकांचे नेत्रावरील अज्ञानरुपी भुरळ काढून यास जागे करिशील.

## पुनर्विवाहप्रकार.

आम्ही गेल्या खेपेस लिहिलेंच होतें कीं पुणें येथील वादाचा निकाल कसा व तो कोणत्या उपायांनीं झाला हें लोकांस कळलें म्हणजे निबंधपक्षाच्या आनंदांत खचित कमतर पडेल व वास्तविक रीत्या वे. शा. संपन्न विष्णुशास्त्री पंडित यांच्या विरुद्ध निकाल झाला नाहीं असें दिसून येईल. कोणत्या रीतीनें अधोगतीस नेणाऱ्या उपायांनीं, उत्तरपक्षानें नेमलेल्या पंचापैकीं एकजणास फोडून निबंधपक्षाकडील सहा मतें करण्यांत आलीं हें आम्हीं गेल्या खेपेस कोणाची भीति न धरितां प्रकट केलें. तें वाचून कित्येकांस असें वाटलें कीं, आतां इंदुप्रकाशकर्ते कायद्याच्या कचाटींत चांगले आले, कारण खरें असलें तरी त्यांस पुरावा करतां यणार नाहीं. आम्हीं लिहिलें तें पुरा आधार असल्यावाचून लिहिलें नाहीं न स्वामि महाराजांच न आमच्या कदाचित हायकोर्टांत सामना होईल हें लक्षांत ठेऊन तें खरें तें प्रगट केलें. परंतु हायकोर्टांत सामना होई तोंपर्यंत तरी ज्यांस खरें माहित झालें त्यांस धीर निघेना. धर्माच्या कामांत लबाडी झाली म्हणत कोणाचेंही चित्त खवळल्याशिवाय रहात नाहीं म्हणून हायकोर्टाची वाट न पहातां तारीख १४ वाच्या ज्ञानप्रकाशांत रा. रा. नारायण बापूजी गोरे यांनीं प्रत्यक्ष पुराव्यांत, स्वामीमहाराज असतां, तेथें आपल्या सहीनिशीं खरा मजकूर छापून प्रसिद्ध केला आहे हें बापूजी यांचें पत्र व दुसरीं दोन पत्रें त्याच ज्ञानप्रकाशाच्या अंकांत प्रसिद्ध झालीं आहेत तीं आम्ही खालीं उतरून घेतों. या पत्रांच्या आतां लोकांनीं विचार करावा व जय कोणाचा झाला व पुनर्विवाह मशाखटला किंवा नाहीं हें त्यांनीच सामावें. वादाचे सर्व कागदही इतक्यांत छापून प्रसिद्ध होत आहे. मात्र पंचाचीं मतें अजून विष्णुशास्त्री यांस मिळत नाहींत व तीं पुन: त्याजकडे फिरून लागलीं आहेत हे आश्चर्य. ज्या दहा पांच संभावित गृहस्थ सम[illegible] येशा संपन्न त्र्यंबकशास्त्री मठे गांवें पुस्तांतून आपण लिहिलेला मजकूर ऐकिला म्हणून रा० नारायण बापूजी लिहितात त्यांत मोठमोठे संभावित गृहस्थ आहेत असें आम्हांस पक्कें समजलें आहे.

सत्याचा अपलाप करण्याविषयीं जे प्रकार घडून आले त्याबद्दल आबालवृद्धांस वाईट वाटल्यावाचून रहणार नाहीं व आम्हांस स्वामीमहाराजविरुद्ध लिहिण्याचा प्रसंग आला या विषयीं! धर्माचे अधिपती चे तत्वापासून च्युत झाले म्हणजे त्यांचा मान रहातो कसा व शिष्यवर्गानें त्यांनीं केलेला ठराव मानावा कसा! "नानृतात् पातकं परम्" हा जो सर्वांत श्रेष्ठ नीतीचा व धर्माचा नियम तो मानवप्राण्यास जावत्काल लागू आहे तावत्कालपर्यंत स्वामींचा ठराव एकीकडे ठेविला पाहिजे. सांप्रतचा कालदेशवर्तमान स्वामींच्या मनांत वागत नाहीं ही मोठी दु:खाची गोष्ट आहे त्यांस अनुसरून आपल्या लोकांच्या सांप्रतच्या स्थितींत कांहीं फेरफार झाले पाहिजेत. त्या फेरफारांत स्वामी सत्याचा अपलाप करून जर आड येतील तर एकंदर सर्व धर्माचा घोटाळा करण्यास स्वामीच कारण होतील याचा त्यांनीं विचार करावा. ईश्वर करो आणि असें न होवो हीच स्वाजवाशीं आमची मन:पूर्वक प्रार्थना आहे.

**श्रीमत शंकराचार्य ह्यांचें धाडस व सत्याभिमान.**

**पुनर्विवाहाचा जय.**

ज्ञानप्रकाशकर्ते यांस.—

वि० वि० लिहिण्यास कारण कीं, थोडे दिवसांपूर्वीं श्रीमत शंकराचार्य यांच्या सभेंत प्रसिद्ध रीतीनें सांगितलें कीं, पुनर्विवाहाचा वाद झाला, सहा पंचांचीं मतें पुनर्विवाह अशास्त्र आहे, अशीं आहेत व चार पंचांचीं मतें तो सशास्त्र आहे, अशीं आहेत. ह्यावरून बहुमतानें पुनर्विवाह अशास्त्र होय असें सिद्ध झालें. असा वादाचा निर्णय स्वामींनीं आपल्या सभेंत सांगितला! परंतु खरी स्थिती पाहातां हा निर्णय खरा झाला असें नाहीं; कारण

पुनर्विवाहउत्तेजक पक्षाकडील पंचांपैकी एक पंच वे० शा. सं. वेंकटशास्त्री माठे यांस स्वामींनीं बुधवारीं बोलावून नेऊन त्यांस सांगितलें कीं पहा, तुम्हास ह्या जगांत राहणें आहे. अनादि चालत आलेल्या धर्माचें संरक्षण करणें तुमचें काम आहे. संभाळा संभाळा, संभाळा, तुम्ही म्हणाल खोटें कसें बोलावें तर अशा महत् प्रसंगीं खोटें बोलल्यें असतां कांहीं चिंता नाहीं. प्रत्यक्ष धर्मराजही खोटें बोलले अशा प्रकारची धमकावणी दाखविली व उपदेश केला. ही गोष्ट प्रत्यक्ष स्वामींनीं केली व ह्याशिवाय दुसऱ्याही कित्येक लोकांनीं स्पष्टपणीं त्या च विचाऱ्या शास्त्रीबावास अशीच स्वामींच्या प्रेरणेवरून आचरण करण्यास सांगितलें ह्यामुळें वे० शा० सं० वेंकटशास्त्री माठे ह्यांनीं आपल्या खऱ्या मताविरुद्ध आपण सुचविलेल्या कलियुगाच्या प्रमाणाचा विचार न करितां खोटें मत दिलें. ही गोष्ट केवळ गप्प म्हणून कोणीं समजूं नये, तर ही गोष्ट मी स्वत: शास्त्री मजकूर यांच्या मुखांतूनच दहा पांच संभावित गृहस्थांसमक्ष ऐकिली. कळावें ही विनंती.

ता० १४ माहे एप्रिल सन १८७०

सही नारायण बापूजी गोरे.

---

नि० वि० श्री जगतगुरूंकडून पंचांच्या नकला मिळण्याविषयीं दोन पत्रें पाठविलीं. तीं आपले पत्रीं प्रसिद्ध झालींच आहेत. तरी अद्यापी नकला हातीं येत नाहींत आणि देणार अगर नाहीं हेंही कांहीं कळत नाहीं. माझ्या विनंतीवरून माझे दोन मित्र रा० रा० काशिनाथ त्रिंबक खेर व विष्णु मोरेश्वर थत्ते हे कालरोजीं श्री स्वामींच्या येथें गेले होते. तेथें त्यांस शास्त्रीबावांनीं सांगितलें कीं, पंचांचे अभिप्राय पंचांच्या घरीं परत गेले आहेत ते आले म्हणजे आम्हांस नकला देण्याचा इरादा आहे.

एकवेळ सरपंचांच्या मार्फत आलेले व भर सभेंत वाचलेले अभिप्राय पंचांच्या घरीं परत कसे व कां गेले हे कांहीं कळत नाहीं. यानंतर श्रीस एक व श्रीच्या कारभाऱ्यास एक अशीं दोन पत्रें पाठविलीं त्याचा ही अद्यापी जबाब आला नाहीं अशी स्थिति आहे. कळावें हे विनंती. ता० १४ एप्रिल १८७०

विष्णु परशराम शास्त्री.

---

श्री.

श्रीपुनर्विवाहसंबंधी श्रीशंकराचार्यांच्या संनिध झालेल्या वादांत मुख्य मुद्दे चार निघाले ते येणेंप्रमाणें:—

१. "नष्टेमृते" या वचनाचा सरळ व स्वारासिक अर्थ विवाहितास्त्रीविवाहपर होतो अगर नाहीं?

२. पराशरस्मृति कलियुगाकरितांच असून तदनुसार शास्त्रार्थनिर्णय केले आहेत अगर नाहींत?

३. पुनर्विवाहनिषेधवचनांची शास्त्ररीतीप्रमाणें व्यवस्था होऊन त्यांस विषय मिळतो अगर नाहीं;

४. पुनर्भूवादि दोषांचा निरास शास्त्ररीतिप्रमाणें होतो अगर नाहीं;

१. विवाहितास्त्रीविषयीं अर्थास अनेक दोष येतात ह्मणून नष्टेमृते या वचनाचा अर्थ फिरवावा असें निषेधवादी स्पष्ट म्हणतात यावरूनच या वचनाचा सरळ व स्वारासिक अर्थ विवाहिताविवाहपरच होतो असें वादीच्याच तोंडानें सिद्ध होतें.

२. पराशर स्मृती कलियुगाकरितांच आहे असें त्या स्मृतीच्या उपोद्घातावरूनच सिद्ध होतें व अनेक निबंधकर्त्यांनीं तो सिद्धांत मानून कलौ पाराशरा: स्मृता: ह्या वचनाप्रमाणें शास्त्रार्थाचा निर्णय केला आहे असें आढळतें.

३. पुनर्विवाह निषेधक वचनांचे सामान्य विशेष भाविक ज्या सर्व शास्त्रसंमत रीती आहेत त्याप्रमाणें व्यवस्था होऊन त्यांस पंचात्स्वित्यादिकस्थळीं विषय मिळतो असें स्पष्ट सिद्ध होतें.

४. विधिवचनबळेंकरून पुनर्विवाहविधान करणाऱ्या अनेक ऋषींनीं जितक्या निमित्तांनीं पुनर्विवाहाची अनुज्ञा दिली आहे तितकीं निमित्तें पुनर्भूत्व येण्याविषयीं न धरितां कारण कमी धरलीं आहेत यावरून वेधविवाहानें विवाहित जी पुनर्विवाहित स्त्री तीस पुनर्भूत्व येत नाहीं.

याप्रमाणें चारी गोष्टी सिद्ध झाल्यावर पुनर्विवाह अशास्त्र आहे असें ठरत नाहीं. यास्तव श्री शंकराचार्यांच्या सभेंत पुनर्विवाहाच्या अशास्त्रतेबद्दल ज्या पंचांनीं मतें दिलीं आहेत त्यांनीं तीं दुरभिमानानें अगर लोकभीतीनें अथवा भिडेभाडेनें दिलीं आहेत असें खास वाटतें. हा वाद झाल्यानें ज्या देशकल्याणेच्छु सुज्ञ लोकांस पुनर्विवाह अशास्त्र असेल की काय अशी शंका होती ती त्यांची दूर होऊन तो सशास्त्र असल्याबद्दल खात्री होत चालली आहे हा या वादापासून एक मोठाच फायदा समजावयाचा आणि या सर्व वादाचे कागदपत्र हकीकतीसुद्धां छापून प्रसिद्ध झाले म्हणजे बाहेरील लोकांची ही अशीच खात्री होईल.

पुनर्विवाहपक्षांत नसलेल्या चार शास्त्री लोकांनीं आज पुनर्विवाहास शास्त्राधार आहे असें कबूल केल्यामुळें शास्त्रीमताच्या संबंधानें तरी निषेधपक्षाचा क्षय आणि विधिपक्षाची वृद्धि होण्यास आरंभ झाला. हा विधिपक्षाचाच जय होय. तर खालीं सह्या करणारे आम्ही लोक त्या पक्षाच्या पुढारी मंडळीस विनंती करतो कीं, त्यांनीं आपलें काम पहिल्यापेक्षां जास्त उमेदीनें चालवावें आणि निश्चयानें असें सांगतो कीं, पुनर्विवाहाच्या सशास्त्रते विषयीं आमचा पूर्ण निश्चय आहे.

तारीख ९ एप्रिल सन १८७० चैत्र शुद्ध ८ शक १७९२ प्रमोदनाम संवत्सरे.

या खालीं सत्तावन सह्या आहेत. इ० प्र

---

प्राप्तीवरालकर.

आम्ही व आमचे इतर बंधूंनीं पुष्कळ ओरड केली ती सर्व व्यर्थ जाऊन शेवटीं सरकारानें इन्कमटक्स वाढविण्याचा कायदा पास केला. व या नवीन कायद्या प्रमाणें कराची रक्कम ठरली आहे ती

ज्यांचें वार्षीक उत्पन्न ५०० हून जास्त व ७५० हून कमी असेल त्यास वर्षास १९॥८. ७५० हून कमी नसेल व १००० चे आंत असेल त्यास. २७

| | | |
|---|---|---|
| १००० | १५०० | ३९ |
| १५०० | २००० | ५४ |

दान हजाराहून जास्त उत्पन्न ज्यास असेल त्याणें आपलें वास्तविक उत्पन्न तक्त्यांत भरून द्यावें म्हणजे त्या रकमेस दर रुपयास ८८ प्रमाणें आकार बसविला जाईल. करचोरी करून ४ हजारांनीं द्यावी बाकी बहुतेक नियम मागील कायद्या प्रमाणेंच आहेत. हा आकार एक वर्ष पावेतों चालेल, असें अभिवचन सरकारानें दिलें आहे. सरकारच्या लोभी स्वभावामुळें व ते पद्धतीच्या भरवशामुळें रयतेचें ओरडणें त्यांस ऐकूं आलें नाहीं. तथापि आमच्या नेटिव कायदागारांनीं तरी लोकांवर आणखी जुलमाचें ओझें न्या दुजये असें आम्हीं इच्छितों. सरकारचा कायदा अमलांत आणूनच विना योग्य मनुष्यापासून कर घेऊं नये असें आमचें म्हणणें बिलकूल नाहीं. परंतु मागचा दाखला पाहूनच कर न बसवितां योग्य प्राप्ती वर बसवावा पूर्वी चार रुपये होते तेव्हां थोडक्यासाठीं कोणी तक्रार केली नाहीं; परंतु आतां १९॥८ रुपये आहेत यासाठीं विचार करून कर बसवावा हें चांगलें.

---

## कसरत.

ईश्वरानें प्राणीमात्रांस सर्व प्रकारचे गुण दिले आहेत. परंतु जो गुण मनुष्याचे अंगीं असतो तो पुरा असल्या म्हणजे त्याची वहावा होऊन जाते. "दुनिया झुकती है झुकनेवाला चाहिये" अलीकडे या गांवांत बाबाजी तुळशीराम म्हणून एक निराळे नरसिंगपूर यथील महाराज प्रसिद्ध आले आहेत यांचे अंगीं कसरत करण्याचा फारच चांगला गुण ईश्वरानें दिला आहे. यांचें वय सुमारें ५०, ६० वर्षांचें आहे यांचे या गुणावर यांनीं लाखों रुपये कमाविले आहेत व मोठमोठ्या लोकांचीं सरटिफीकिटेंही सुमारें २०० त्यांचे जवळ आहेत हे देखण्यांत मोठे भव्य व सदृढ असे दिसतात. यांच्या या गुणाचा खेळ मागील रविवारीं इंग्रजी व मराठी शाळे समोरचे कंपाऊंड मधें झाला. व काल शुक्रवारीं कमिशनर साहेब यांचे बंगल्या समोर झाला. शाळेच्या पटांगणांत सुमारें ३०० लोक जमले होते. यांनी जे गुण दाखविले यांचें विवेचन केल्याशिवाय आमचे प्रिय वाचकांत चटका लागूं नये म्हणून जें आम्ही पाहिलें व ऐकलें त्या जविषयीं लिहितों.

ह्यांनी बारा शेराची पहार लववीली, मोटचा दोरा येवढा मोठा दोर हातानें तोडला, हातावर कवडया घेऊन त्याचा चूर केला. भरल्या कवडया नखानें फोडून दोन निरनिराळे तुकडे केले, दुसऱ्याचे डोक्यावर नारळ ठेऊन सोटयानें डोक्यास न लागतां फोडला. सात आठ मणाचा दगड एका खुर्चीवर पाय व एका खुर्चीवर डोकें ठेऊन छातीवर ठेऊन दुसऱ्याकडून फोडविला. ख्यार पानचा विडा बोटानें कातरून वरचेवर उडविला दातांत पान व गळ्याचा पाण्यानें भरलेला हंडा दोन खांद्यावर दोन मनुष्य घेऊन सात आठ पावलें चालणें. दोन हातानें दोन तरुण मनुष्यांस उचलणें, उसाच्या कांड्याची मध्यातील गांठ हातानें तोडणें दुसऱ्याचे हातांत तलवार देऊन आपल्या हातांतील उसावर तरवारीनें ठोका मारून दोन तुकडे इतके उंच उडविणें व नळीमधें दोन मंडळी धरून वार करून दोन निशाणें साधणें अशा अनेक प्रकारच्या कसरती करून दाखविल्या. याशिवाय याचे अंगांत अनेक प्रकारची कसबें आहेत. यांचा हा खेळ पाहून कोणासही आनंद झाल्यावांचून राहाणार नाहीं. आतां येथून ते लवकरच उमरावतीस जाणार आहेत तर आमचे उमरावतीकर यांचा हा खेळ पहाण्याची संधी दवडणार नाहींत असें इच्छितों.

---

## अकोला.

मेहरबान गेंजीसाहेब बाहादुर उमरावती एथील स्वालकाज कोर्टाचे जज्ज हे तेथील डेपुटी कमिशनर साहेबांचा च्यार्ज घेणार असे आम्हांस घरगुती पत्रावरून कळतें.

तारीख २२ माहे एप्रिल रोजीं डेप्युटी कमिशनर मे० नेल साहेब हे रजेवर विलायतेस जाणार असें ऐकतों यांच्या जाण्यानें आमचे उमरावती कर लोकांस फारच वाईट वाटेल यांत संशय नाहीं.

उन्हाळ्यानें आपला अंमल पूर्ण बसविला दिवसा ९ वाजल्या पासून तो रात्री १० वाजे तोपर्यंत एकसारखा उकाडा होत असतो पुढें कांहींसा गारवारा सुटतो. गावांत रोगराई कांहीं म्हणण्या सारखी नाहीं.

आगीपासून उपद्रव मागील आठवड्यांत गावानजीक कडब्याचे गंजीस आग लागून सुमारें १००० रुपयांचा तोटा झाला तर आमचे मुनसीपाल कमेटीस असें सुचविणें आहे कीं तीनें नजीक नजीकचे गवती झोपडी आहेत तीं काढण्यांत हुकूम करावा व प्रत्येक घरवाल्यानें आपआपले घरा बाहेर एक एक पाण्यानें गडवी भरून ठेवण्यास कळवावें म्हणजे बरें होईल व सर्वांस प्रसंग वशात सुख ही होईल.

अपघात येथें मागिल रवीवारीं एक म्हाराची मुलगी वय सुमारें ६—७ वर्षांची ही काळ्या मारुतीचे विहिरींत पडून मरण पावली देह हा क्षणभंगूर आहे तथापी प्रयोगानें सर्व झालें म्हणजे ठीक होतें आम्ही आमच मुनसिपाल वाईज असें सुचवितो कीं तीनें या विहिरीच्या व्यवस्थे बद्दल लक्ष पुरवावें म्हणजे दर वर्षी कोणावर तरी येणारी जी धाड ती बंद होईल. कारण ती जागा मध्यावर असल्यानें तेथें लहान लहान बालके खेळण्यास जाऊन पाणि पिण्याकरिता ओस्यांत खालीं उतरतात व दर वर्षी हे त्या हातात त्या बंद होऊन सर्वांस सुख ही होईल.

वऱ्हाडांतील मास्तर लोकांस सूचना:— बाळापूर येथील तहशीलदारानीं आपल्या नात आनयास मास्तरानें लेसन तयार न केल्यामुळें मास्तराबद्दल मुलांस फिर्यादी करून नायब तहशीलदार यांचे पुढें खटला ता. २९ रोजीं चालेल म्हणून समजतें केवढी बहादुरी!!! केवढी तहशीलदार साहेबांनीं ही भूषणाची गोष्ट केली यांचें नांव काम आणि यालाच अधिकारी म्हणतात. तहशीलदार साहेब यानीं पेनशनाविषयीं अर्ज केल्याचें ऐकतो त्याचे कसें काय झालें कोणजाणें; यानीं आतां लवकर पेनशन घेऊन स्वस्थ घरीं बसावें असें आम्ही सुचवितों नाहीं तर म्हातारचळ लागून काय करतील कोणजाणें. जा मुलगा शाळेंत जाणार

असतो तो जरी किती मोठा असला तरी बऱ्याकरितां मास्तरानें मारणें हें अगदीं रास्त आहे. तहशिलदरांनीं आपल्यावरून च ओळखावें कीं लहानपणी जर अमळ घरच्यानी हयगय करून मास्तरांनी मारल्या बद्दल जर फिर्यादीची मोकळिक दिली असती तर येवढी पदवी प्राप्त होती काय असो! हा खटला आदावतीनें माहारांस धोक्यांत आणण्याकरितां केलेला आहे व जर त्यांचेच हाताखालिल मनुष्याचें पुढें न्याय होईल तर न्यायही घरचाच मनाप्रमाणें ठरवा याचा म्हणून मास्तर साहेबानीं इकडे येऊन तो खटला इकडे चालवावा म्हणून डेप्युटी कमिशनरकडे अर्ज केला त्याप्रमाणें तो सर्व खटला मे. निकेबयोलट साहेब अ. क. यांचे समोर चालत र खटल्याचा निकाल झाल्यावर सर्वांस कळवूं परंतु रा. रा. हणमंत खंडेराव यास असं सुचविणें आहे कीं त्यांनीं या हलक्या क्षुल्लक खटल्याची आत ले आत मिटवामिटव करावी यातच मजा आहे मास्तर हे! मुलांस मारल्या पासून असे अनर्थ होतात तर यावकडे लक्ष देऊन वागावें म्हणजे गंगेत घोडं न्हाले.

मे० श्रीराम भिकाजी जठार डे. ए. इं. अकोटाकडे शाळा पाहाण्यास गेले आहेत ता० २८ चे आंत इकडे परत येतील.

## वर्तमानसार.

युरोपियनाचा खेळ पण नेटिवाच्या प्राणाशीं गांठ— लाहोर येथें कनालच्या कांठावर पांच साहा लहान मुलें फुलें वेचून खेळत होतीं, त्या वाटेनें तेथें असलेल्या युरोपियन पलटणी पैकीं एक सोलजर आला. त्यांनें त्या मुलांपैकीं एका साहा वर्षाच्या मुलास उचलून कनालमध्यें फेकून दिला, तो वाहून जाऊं लागला तेव्हां त्या खिस्ती इंग्लिश सोलजरानें त्यांस बाहेर काढण्याचा तरी यत्न करावा, पण तें कांहींच न करितां उलटा पळूं लागला. तो गरीब मुलगा वाहून खोल पाण्यात गेला आणि बाहेर काढला तेव्हां त्याच्या वांचण्याची आशा अगदीं सोडली होती. सोलजरास पोलीसच्या लोकांनीं मोठ्या प्रयत्नानें पकडलागेला. पण या कृत्यांत किसेक पोलीसचे लोक सोलजराकडून जखमी झाले. "इन्डियन पब्लिक ओपीनीयन" कर्ते म्हणतात कीं, या सोलजराची पूर्व वर्तणूक बरी होती व त्याणें केलेलें कृत्य केवळ मस्करीचा परिणाम आहे. एकून प्राणनाई पर्यंत मस्करी "ओपीनियन" कर्ते यांस आवडते कायद्यांत तर साफ आहे कीं ज्या कृत्याने प्राण जाईल असें कृत्य करणारा गुन्हेगार होतो. वरील खटल्यांत कसा न्याय होतो ते पहावें. मि. द.

वकीलीच्या सनदा— मुंबईच्या हायकोर्ट जज्जांनीं पुढें लिहिल्या गृहस्थांस त्यांच्या नावीं शेवटी लिहिलेल्या जिल्ह्यांत काम चालविण्यास सनदा दिल्या:— मि. शंकरलाल कचहतलाल अहमदाबाद, व मेसर्स वासुदेव हरी निरंतर व काशिनाथ रामचंद्र लिमये, ठाणें.

सुचना.

आलीकडे आमचे बंधू सुर्योदय कर्ते यांनीं आपलें वर्तमानपत्र पाठविणें बंद केलें. असेच जर त्यांचे मनात आहे तर आम्हांस ही तसे करता येईल.

धुळ्याचे माजी प्रिन्सिपाल सदर अमिन रा० आबाजी नानाजी सातभाई यांस सरकारानें अहमदनगर जिल्ह्यात आनररी माजिस्ट्रेट नेमलें व त्यास सबार्डिनेट माजिस्ट्रेट वर्ग १ चा अधिकार दिला असें सरकारी ग्याजेट वरून कळतें.

कलकत्ता येथें एडिंबरोचे ड्युक यांच्या आदर सत्कार प्रीत्यर्थ जमविलेल्या पैशा पैकीं सात हजार रुपये शिल्लक राहिले होते. ते तेथील मंडळींनें जमून धर्मार्थ उपयोगाकरितां निमे युरोपियन लोकांकडे व निमे एतद्देशीय लोकांकडे दिले असें हिंदुपेट्रियट वरून कळतें.

उन्हाळ्यात आगगाडींतून प्रवास करतांनां फार उष्ण होतें यास्तव पहिल्या व दुसऱ्या प्रतींच्या गाड्यांस वाळ्याचे पडदे लावून ते नेहमी ओले राहावेत अशीतजवीज करावी असा हिंदुस्थान सरकारचा हुकूम झाला आहे. हा प्रकार विशेषेंकरून या देशांत राहाणारे नसतील त्या लोकांकरितां म्हणजे युरोपियन लोकांकरितां केला आहे. नेकनामदार गव्हर्नर जनरल साहेब यांनीं ही फार चांगली तजवीज केली आणि त्याकरितां युरोपियन लोक त्यांस दुवा देतील. तिसऱ्या प्रतीच्या गाड्यांस ही योजना असण्याचे कारणच नाहीं, कारण त्यांतून मनुष्यें प्रवास करीत नाहींत. काळीं मेंढरेंच त्यातून प्रवास करतात. इंग्रज लोक मनाचें फार गोरे व खरे दयाळू.

नवीन कोळशांची खाण— मदिनपूर येथील तुरुंगाकरितां विहिरीची खोदणी चालली असतां तींत कोळशाचा तीस फूट जाडीचा थर सांपडला. कोळशांचा मासला चांगल्यापैकीं ठरला आहे असें समजतें "बहुरत्ना वसुंधरा" हें शास्त्र मात्र एतद्देशीय लोकांस माहित होतें; परंतु या हिंदुस्थानास तो शास्त्रार्थ इंग्लिश लोक यथार्थ लागुं करीत आहेत असें म्हटलें पाहिजे. इंग्लिश लोकांचे क्रियावरून आमच्या ही लोकांचीं मनें नवीन शोधाचे कामांत लागत चालली आहेत हें खालीं लिहिलेले उदाहरणावरून समजेल.

टंकणखाराच्या खाणी— कोणएक उत्तर दिशेकडील पंडित असून सरोवरास आलीकडे गेला होता तेव्हां त्या प्रदेशांत टंकणखाराचीं मैदानें त्यांचे नजरेस आलीं. त्या शोधक गृहस्थानें त्या खाराचे मासले अन्यत्र पाठविले होते ते पसंत झाले आहेत असें कळतें. त्या प्रदेशांत तो खार इतका आहे कीं जर हल्लीं टसकनी देशांतून हा खार येत असतो तो बंद होईल तर सर्व जगतास हवा तेवढा फक्त खणण्यास जो काय खर्च तेवढ्याच खर्चानीं तो हिंदुस्थानांत मिळेल असें म्हणणें आहे. ने. ओ.

धर्म संबंधीं मतभेद— "न्याशनल पेपर" वरून कळतें कीं, प्रोफेसर मक्समुलर यांणीं धर्म शास्त्रावर हाल्लीं व्याख्यान दिलें त्यांत असें दाखविलें कीं, धर्मांच्या कामांत जे संप्रतचे मतभेद हे फक्त जुन्या भाषा चांगल्या अवगत नसल्या मुळें व पूर्वेकडील व पश्चिमेकडील लोकांच्या विचारांत फरक असल्यामुळें झालेले आहेत.

## जाहिराती.

नोटिस— अवूशंग यशवंतराव रजपूत रहाणार अकोट यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे रुइचे ओझ्यापैकीं व खाते बाकि बद्दल रुपये १३१३ येणें आहे ते आज तारखेपासून ८ दिवसांत आमचे दुकानीं आणून द्यावे जर तुम्हीं आमचें घर किंवा जिनगी हीं कोणास विकाल तर ते आमचे रुपये फिटेपर्यंत आम्ही कबूल करणार नाहीं तर ही नोटिस पावतांच रुपये आणून द्यावे नाहीं तर शिरस्तेप्रमाणें फिर्याद करून नोटिशीचे खर्च सुद्धां रुपये घेण्यांत येतील. कळावें तारीख २२ एप्रिल सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

(सही) वर्धमान पूनशी आणि कंपनी द. विरजीलहा.

नोटिस— यशवंत नपुतो कुळकर्णी मौजे शेळगांव तालुके मलकापूर यांजला या नोटिशीनें खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येत आहे कीं, तुम्ही ता० ९ एप्रिल सन १८७० चे वऱ्हाड समाचार पत्रांत गोपाळ बाळाजी पिंपळक यांस अशी नोटिस दिली कीं तुम्हीं आमच्या बंधू यांजला तुळसाबाई जवंत आनंदराव पंडे मौजे पिंपी इजकडून एक बक्षिसपत्र वतन वगैरे सुद्धां करून दिलें परंतु आम्ही तिचे वारीस आहों याजकरितां तुम्हाला तो माल व हक्क मिळणार नाहीं तरी मी तुम्हाला ह्या नोटिशीनें असें कळवीत आहे कीं मी त्या मुलास बक्षिसपत्र करून देतें असें नसून दत्तविधान करून पुत्रवत अधिकार देणार आहे व ती मिती चैत्र वद्य ५ ची आहे त्या गादी जरी मी बक्षिस केलें तरी त्या वतन वर तुमचा वारसा कोणतेही प्रकारें नाहीं कारण तुमचे आणि माझे सोयर सुतक नाहीं व सुमारे १०० वर्षेपासून तुम्हीं आमचे कोण आहां असेंही ठाऊक नाहीं माझा सासरा परण पावला त्या वेळेस देशपांडे सखाराम सुंदर यांणीं बेवारीस वतन म्हणून जप्ती केली त्या वेळेस तुम्ही अडथळा करणार असतां, परंतु तुमचा संबंध नसल्यामुळें तुम्ही दखल दिला नाहीं व मोन आपलेकडून गुमस्ता ठेऊन काम करीत आलें असतां तुम्ही आजी पुढाकारितां तिऱ्हाइत मनुष्यास नोटिशीनें कळविल्यापासून उपभोग घेत आहां परंतु तो उपभोग होणार नाहीं हें समजावें याकरितां तुम्हाला कळावें आहे या नोटिशी करितां खर्च करणें रुपये भाग पडले तरी हे रुपये एक महिन्यांत न पाठविल्यास यावद्दल तुम्हावर दावा होईल तारीख २२ एप्रिल १८७०

(सही) तुळसाबाई जवंत आनंदराव पांडे मौजे पिंपरी गोळी द. विठ्ठल नाईक भुसार.

नोटिस— गंगाधर जोगाराम साहू दुकान अकोलें यांस रघुनाथ दास लक्षुमणदास साहू दुकान खामगांव यांजकडून देण्यांत येतें कीं तुम्हांकडून आमचे रुइचें ओझी २४ व शिवाय व्याज असें येणें असून सदहूं वायदे दिवाणी कोर्टाचा हुकूमन माही झाला आहे पण तुम्हाकडून अद्याप रुइचें ओझें आलें नसून दरम्यान तुम्ही सदहूं ओझें घेणेंविषयीं वर्तमानपत्रांतून नोटिस दिलीत सबब त्या नोटिशीप्रमाणें ओझें घेण्यास ठीं आम्ही आपला गुमास्ता हुकूमनाम्याचे ठरावप्रमाणें मुंबईस पाठविला असून व तो तेथें ८ दिवस राहिला असून तुम्हाकडून कोणी ओझें देण्यास आलें नाहीं सबब गुमास्ता परत आला आणि ह्या तुमचे नोटिशीप्रमाणें जाण्या येण्याचा आम्हांस खर्च मात्र विनाकारण झाला सबब तुम्हांस ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं हुकूमनाम्यांतील ठरावाप्रमाणें ओझें व व्याजाचे रुपये व आमचा गुमास्ता मुंबईस गेला आला त्याचे खर्चाचे रुपये १५ असे आजपासून २ दिवसांत द्यावे न दिल्यास हुकूमनाम्याची अमलबजावणी करण्याची तजवीज केली जाईल कळावें तारीख २२ एप्रिल सन १८७० इसवी मुक्काम अकोलें

(सही) रघुनाथदास लक्षुमणदास साहु दुकान खामगांव.

नोटिस— हिंमत हिंगणे वल्लद भवानजी जानले रहाणार मौजे बेलगांव परगणे घाटबोरी तालुके मेहेकर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडे आमचे मुद्दल रुपये ९५ पंच्याणव सुर्ती व यांशिवाय ४ च्यार वर्षांचे व्याज येणें आहे तर ही नोटिस देण्यांत येते कीं नोटिस पोंचल्यापासून १५ दिवसांचे आंत आमचे सर्व रुपयाचा उलगडा करावा नाहीं तर दिवाणींत फिर्यादी करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये घेऊं कळावें तारीख २२ एप्रील सन १८७० इसवी.

(सही) भगवानकृष्ण कुळकर्णी मौजे बेलगांव प्रगणें घाटबोरी दस्तूर खुद.

नोटिस— आसाजी वल्लद महिपतराव इंगळे रहाणार मौजे डोनगांव परगणे मेहेकर जिल्हा बुलढाणे यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडून आमचे मुद्दल रुपये सुर्ती ३० तीस शिवाय दोहोत्रय प्रमाणें २ दोन वर्षांचें व्याज येणें आहे तर नोटिस पोंचल्यापासून १५ दिवसांचे आंत आमचे सर्व रुपयांचा उलगडा करावा नाहीं तर तुमचेवर दिवाणींत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेऊं कळावें तारीख २२ एप्रील सन १८७० इसवी.

(सही) भगवानकृष्ण कुळकर्णी मौजे बेळगांव परगणे घाटबोरी दस्तूर खुद

नोटिस— हरी वल्लद खानाजी बाघ रहाणार ताजनापेठ यांस खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं तूं मलपटाची खोटी करून सुमारें १०.१२ वर्षे झालीं त्या दिवसापासून भरल्यानें स्त्रीस वागविण्याचे जे परियाय आहेत त्यापैकीं कोणतेच परियाय यावत तुझे कडून घडले नाहीं यास्तव मला माझे मनाप्रमाणें वागणें भाग झालें. यावद्दल आजवर काहींच विचार केला नसल्यानें मजवर किंवा माझे संततीवर तुझा बिलकूल हक्क राहिला नाहीं असें माहित असतां माझी मुलगी व मुलगा यास मी पश्चात गावांत खेळत असतां चोरून घेऊन गेलात ही कृत्यें अपराधास कारण झाली करितां नोटिस पावल्यापासून दोन दिवसांत माझी मुलगी व मुलगा आणून द्यावा आणून न दिल्यास यांजला कांहीं अपाय झाल्यास त्याची जबाबदारी देणें लागेल सदरील मुदती प्रमाणें तजवीज न झाल्यास फौजदारींत फिर्याद केली जाईल कळावें तारीख २३ माहे एप्रील सन १८७० इसवी. मुक्काम अकोलें.

(सही) शिप्री वल्लद धर्माजी मुक्काम अकोलें नि. खु. हातची

नोटिस भगवान बल्लद विठोजी वन. खेड राहणार मौजे कुकस प्रगणे शिरपूर तालुके वाशिम यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडून आमचे मुद्दल रुपये २५ सूर्ती पंचवीस याशीं व्याज ४ चारवर्षांचें व्याज दोहोत्रप्रमाणे येणें आहे तर नोटिस पोंचल्या पासून १५ दिवसांत आमचे सर्व रुपयांचा उलगडा करावा नाहीं तर तुम चेवर दिवाणींत फिर्याद करून नोटिसीचे खर्चासुध्धां भरून घेऊं कळवें तारिख २२ माहे एप्रिल सन १८७० इसवी.

( सही ) भगवान कृष्ण कुळकर्णी मौजे कुकस प्रगणे शिरपुर दस्तुर खुद.

नोटिस खंडू आप्पा सुनार मौजे चौर तालुके वाशिम यांस हीराजी सोळंकी बजाज याजकडून देण्यात येते की तुम्ही १०० रुपये कर्जाऊ घेऊन गेला त्याची मुदत दोन हात्याची असतांना तुमचे कडून रुपये आले नाहींत तर, हो नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आत रुपये भरणा करावे न केल्यास यानोटिशीचे खर्चा सुध्धा सरकार मार्फत फिर्याद करून रुपये सुध्धा भरून घेण्यात येइल कळावें तारिख २२ माहे एप्रील सन १८७० इसवी.

( सही ) हिराजी सोळंकी दस्तुर खुद.

नोटिस बाळाजी वल्लद रावजी वानखेडे रहाणार मौजे बेलगांव प्रगणे घाटबोरी तालुके मेहकर यास खाली सही करणार याकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेकडून आमचे मुद्दल रुपये १०० शंभर ग णों याचें दोहोत्राप्रमाणें दान वर्षांचे व्याज याशिवाय उसने रुपये ७ सात येणेंप्रमाणें सुर्ती रुपये येणे आहे तर नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांत आमचे सर्व रुपयाचा उलगडा करून द्यावा नहीतर शिरस्त्याप्रमाणे नोटीशीचे खर्चासुध्धां दिवाणींत फिर्याद होऊन घेऊं कळावें तारीख २२ माहे एप्रील सन १८७० इसवी.

( सही ) भगवान कृष्ण कुळकर्णी मौजे मजकुर दस्तुर खुद.

नोटिस—रामचंद्र वल्लद गुंडोजी तावडे राहणार तरोडी प्रगणे शिरपूर तालुके वाशीम यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडून आमचे मुद्दल रुपये २५ पंचवीस याशी व्याज दोहोत्रा प्रमाणे तीन ३ वर्षाचे व्याज येणे आहे तर नोटिस देण्यात येते कीं नोटीस पोचल्यापासून १५ दिवसांत आमचे सर्व रुपयांचा उलगडा करावा नाहीं तर दिवाणींत फिर्याद करून नोटिशीचेखर्चासुध्धां भरून घेऊ कळावें तारिख २२ माहे एप्रील सन १८७० इसवी.

( सही ) भगवान कृष्ण कुळकर्णी मौजे बेलगांव प्रगणे घाटबोरी दस्तुर खु.

नोटिस—रा० मानकराम संतूलाल साहू दुकान खामगांव यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे व आमचे खात्याचा हिशोब माघशुद्ध १ शके १७९१ पावेतों झल्यात आम्हाकडे रुपये १३१ व्याजासुद्धां तुमचें देणें निघालें ते रुपये आम्हीं महादू वल्लद लक्षुमण पाटील गोंधनापूरकर व कडतोबा वल्लद शिवराम देशमूख शिरसगांवकर यां उभयतांचे मार्फत तुम्हांस देण्याकारितां पाठविलें असून तम्ही ते रुपये पावती नदेतां घेतल नाहींत हा मजकूर आम्हांस समजल्यावरून आम्हीं समक्ष ते रुपये तुम्हीं घेऊन पावती द्यावी असे कळविलें असून हे तुम्हीं रुपये घेतनाहीं. आतां ह्या नोटिशीनें तुम्हांस कळविण्यांत येतें कीं, मशारनिल्हे पाटील यानपाशीं सदरहु रक्कम नर लिहिले मितीपासून अमानत ठेविली आहे तरी तुम्ही त्याजपासून रक्कम घेऊन आमचें नांवचे खात्याबद्दल निकाल झाल्याची पावती हो नोटिस पाहोंचल्यापासून च्यार दिवसांत द्यावी जर याप्रमाणें तुम्ही न केले तर तुम्हास माघशुध्द १ शके १७९१ पासून व्याज मिळावयाचें नाहीं. हें समजावें कदाचित तुम्ही फिर्याद हि केली तरी त्या फिर्यादीचा खर्च आम्ही तुम्हांस न देतां तुम्हास सोसावा लागेल हे समजावें. कळावें तारील २२ एप्रीलसन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

[ सही ] गोविंद व्यंकटेश कुळकर्णी मौजे मांडक तालुके मलकापुर द. खु.

नोटिस—विठोबा वल्लद प्रतापजी सूर्य राहणार मौजे गोंधर तालुके मेहकर यांस बाळाराम जैसिंग मारवाडी दुकान देऊळगांव साकरशा तालुके मेहकर. याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हाकडे गेले वसंतपंचमीचें करारांचें रुईचें ओझें एक यावयाचें ते करारास आलें नाहीं व आजपर्यंत ही आलें नाहीं तरी सध्यांतील ठरावाप्रमाणें वसंतपंचमीचे रोजीं भाव रुपये ९० नगदचा होता यास्तव हें नगद रुपये व वसंतपंचमी पासून दरमहा दारूपयांस अर्धा आणा प्रमाणें व्याज असें तुम्हाकडे यावयाचे आहे सबब या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नोटिस पोंचल्यापासून ५ पांच दिवसांचे आंत व्याजासुद्धा सर्व रुपयांचा उलगडा करावा नाहींपेक्षां दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करून घेण्यांत येईल कळावें मिति चैत्रशुद्ध ४ मंगळवार तारीख ५ एप्रील सन १८७०

(सही) बळाराम जयासींग दस्तूर खुद

नोटिस—रामनाक वल्लद लक्षुमण महार राहणार मौजे देऊळगांव साकरशा तालुके मेहेकर यांसी बाळाराम जैशिंग मारवाडी दुकान मौजे मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजकडे गेले हंगामाचे करारांचा ०।।। साडेसाहामण कापूस येणे तो करारप्रमाणें वसूल आला नाहीं सबब ठरावाप्रमाणें चलू भावानें आकार रुपये १९।। साडेएकूणिस होतात तरी हे रुपये व्याज सुद्धा नोटिस पोंचल्यापासून पांच दिवसांचे आंत वसूल द्यावे नाहींपेक्षां दिवाणी कोर्टा मार्फत वसूल करून घेण्यांत येतील कळावें मिति चैत्र शुद्ध ४ मंगळवार शके १७९२ तारीख ५ सन १८७०

(सही) बाळाराम जयाशींगदास दस्तूर खुद.

नोटिशीचा जाब दाजी लक्षुमण भंगी रहाणार पिंपळगांव याजला खाली सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तुम्ही आम्हावर नोटिस दिली त्याप्रमाणें तुमचें कांहीं आम्हास देणें नाहीं. व आज पावेतों तुम्ही आम्ही एक जागेत असून आलिकडे तुम्हीं आम्हावर फिर्याद केल्यापासून आम्ही आपले घरी येत नाहीं फिर्याद झाली त्याचे पूर्वी आपण एक जागेत असतसमयीं तुमची सुन ही ओटभरणास आपले बहिणीचे घरी जात होती. तेवेळेस तिणें आम्हाशीं बहाणा केला कीं माझा दागिनें तुझे येथे नाहींत आईचे घरीं आहेत सध्या तुमचे बायकोचे आगांवरील दागिनें तुमचे आहेत ते मजला घालण्याकारितां द्यावे त्याजवरून आम्ही तिजला दागिनें दिले व ते घेऊन गेली, येणें प्रमाणें पाठल्या सोन्याच्या वजन तोळे आठ व सरी सोन्याची वजन तोळे बारा व तोडयांचा जोड रुप्याचा वजन तोळे ११० व ठुशी सोन्याची वजन तोळे ६ येणेंप्रमाणें जिनसा ती आमचे जवळून तुमची सून आहे त्या ही घेऊन गेली. ते परत अद्याप आणून दिले नाहींत तिजला मागत असता देतो म्हणून सांगते तुम्ही हल्लीं उलटें आपले दागिन्याची नोटिस आम्हावर देतां हें मोठें आश्चर्य आहे सदरील आमचे दागिनें आज तारखेपासून ८ दिवसांत आणून द्यावे न आणून दिल्यास शिरस्तेप्रमाणें तुमचेवर फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेण्यांत येईल. तारिख २२ एप्रिल सन १८७०

( सही ) भाऊदाजी पिंपळगाव प्रगणें जळगांव द. खु.

नोटिशीचा जबाब—दाजी लक्षुमण भंगी मौजे पिंपळगांव याजला खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, आम्हीं पंचावर राजी नाहीं हें तुम्ही कशावरून म्हणता? राजी असल्या खेरीज स्टांप कागदावर उभयतांचा लेख कसा झाला? हें समजत नाहीं. पंचांचे हातानी विभाग होऊन त्यावर आपण उभयता राजी झालों. त्याप्रमाणें आपआपले तक्षिमेचे विभाग होऊन आपल्या एकमेकांच्या सहीच्या पावत्या सध्ये कागदावर होऊन तुमचे सहीची पावती आमचेजवळ आहे व आमचे सहीची पावती तुमचेजवळ आहे. त्याप्रमाणें एकमेकांस निकाल देणें योग्य आहे त्या पावतीप्रमाणें तुम्हास आपला विभाग पोंचला गला आहे, जर त्याप्रमाणें कांहीं विभाग होणें राहिला असल्यास ती पावती पंचांजवळ आणावी म्हणजे ते तुम्हास व आम्हास सांगतील. पावती शिवाय तुम्ही कांहीं रकमा लिहिल्या आहेत हें कशावरून लिहिल्या हें समजून येत नाहीं तुम्ही स्पष्ट पावतीत लिहून दिलें आहे कीं, या शिवाय तुमचा आमचा किस्सा राहिला नाहीं.

आपले तक्षिमेने दुकानवरून देवकरण मुलतानचंद मारवाडी याचीं ओझीं १० नगादीचीं खरेदीत घेतली गेली त्याचा जमखर्च तक्षिमेचे बाहेर झाला आहे आपले तक्षिमेचे विभाग झल्यावर दाहा ओझ्यापैकीं निमें पांच ओझीं आमचे हिश्शावर आलीं तीं आम्ही मारवाडी मजकुरापासून घेतो तुम्ही पंचासमोर यादीत उतरून दिलें त्याप्रमाणें मारवाडी मजकूर याजला ओझीं मागितलीं असतां देत नाहीं म्हणून सांगतो आणि असें म्हणतो कीं, माझे दुकानावर दाजीनी आपले नावावर जमखर्च करून दिला आहे यावरून मी तुम्हास असें विचारतो कीं जमा आपले तक्षिमचे बद्दांवर तक्षिमप्रमाणें जमाखर्च झाला त्याप्रमाणें मारवाडी मजकूर याचे बद्दावर जमाखर्च तुम्ही करून देण्याचा होता तसें नकरितां तुम्ही आपले एकट्याचे नावचा जमाखर्च दहा ओझ्यांचा काय सबब करून दिला हें कळवावें वाजिबास जमाखर्चांत तुम्ही दगलबाजी केली आहे असें दिसते या दगलबाजीबदल तुम्हांवर फिर्याद करणें प्राप्त झालें आहे.

तुम्ही नोटिशींत कळविता कीं, आम्ही जी नोटिस दिली याचा निकाल झाल्याखेरीज तुपचीं कापसाचीं ओझीं देणार नाहीं त्यास हीं सदरील ५ ओझीं आमचें खाजगी दुकानावर घेतलीं गेलीं असून त्याचे रुपये तुम्हास पोंचले आहेत हीं ओझीं तक्षिमेचे रोजगाराचे प्रकरणांत तुम्हास अटकविण्यास कांहीं कारण नाहीं ओझीं आम्ही तुम्हास मागितलीं असतां देतो म्हणून सांगता व नोटिशींत असा मजकूर लिहिता ही आश्चर्याची गोष्ट आहे तुम्हापासून एकंदर १० रुपयांचा उलगडा करून घेणें आहे त्यांत आमचीं खासगी दुकानावरील ओझीं ५ व तक्षिमेचे दुकानावरील ओझीं ५ याप्रमाणें तुम्हाकडून उलगडा करून घेणें आहे ५ ओझीं घेणें आहेत म्हणून कळवितां ५ ओझीं तक्षिमप्रमाणें आहेत त्याबद्दल कांहीं कळवित नाहीं त्यास एक तर ५ ओझीं मारवाडी मजकूर याजकडून देवावी किंवा तुम्ही खुद्द जातीनें द्यावीं.

मक्त्याचे बाबतींत नफा भरून द्यावा म्हणून तुम्ही नोटिशींत कळविता त्यांत सदरील मक्त्यांत आपण भागीदार आहों परंतु वनचराइचे मक्त्यांत तुमचा कांहीं विभाग नाहीं बाकी मक्त्यांत आपण उभयतां निमनिमचे उभयतां विभागीत आपली उभयतांवर जो नफा नुकसान येईल तें आपण उभयतां मामल्याचे बाबतींत वाटून घेऊं व त्याचप्रमाणें आणखी जे तक्षिमदार या मक्त्यांत आहे त्याचा नरी आपले प्रमाणें निकाल होणें आहे आणि उभयतां मामल्यांत हिस्सेदार आहों असें नाहीं रामचंद्र वगैरे इसम आणिकही आहेत सर्वांचा निकाल होईल ते वेळेस आपला उभयतांचा निकाल अर्थातच होणें आहे.

दुकानदारींतील तक्षिमेतील अफूभापी उभयतांची तक्षिमेची बद्दाचे खात्यांत शिल्लक जी नियत आहे ती खातेप्रमाणें पाहून उभयतांत निमनिम वाटून घेण्याचा हक्क आहे शिल्लकेंतली अफू तुमचे ताब्यांत आहे त्याचा निकाल अद्याप केला नाहीं तो निकाल करावा व अफूचे नफ्याचा निकाल जर होईल त्याप्रमाणें झाल्याखेरीज अफूचे नफ्याबदल निकाल आमचे कडून होत नाहीं सदर्हू याप्रमाणें निकाल होऊन पंच मार्फत व्हावा सदर्हू गोष्टीचा निकाल आज तारखे पासून ८ दिवसांचे आंत निकाल करावा तुमचेकडून निकाल न झाल्यास शिरस्ते प्रमाणें नोटिशीचा खर्च समेत भरून घेतला जाईल तुम्ही विनाकारण आम्हावर नोटिस देऊन त्रास दिला हें बरोबर नाहीं. कळावें तारिख २२ माहे एप्रिल सन १८७० इ.

( सही ) नारायण एकोबा शेठ मांतकर दुकानपिंपळगाव द. खु.

हे पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. के.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA :—SATURDAY EVENING, APRIL 30 1870 NO. 18

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ३० माहे एप्रिल सन १८७० इ० अंक १८


## पुनर्विवाहसंबंधी वादाचे निर्णयाची प्रसिद्ध सभा.

ता० १७ माहे एप्रिल रोज रविवार या दिवशीं तिसरे प्रहरीं पुण्यास शंकराचार्य स्वामी यांचे एथें सभा भरून पुनर्विवाहाचे वादाचा निर्णय सांगितला लोक सुमारें २०००जमले होते, मध्य स्थानीं स्वामी बसले होते, व रा. गणेश शास्त्री बाबा मालवणकर यांनीं समोर एका मोठ्या टेबलावर उभे राहून निर्णयपत्र वाचिलें व स्वताचे व्याख्यान दिलें. हें निर्णयपत्र शंकराचार्यांच्या कोर्टांतील एक हुकुमनाम्याादाखल होतें. त्याच्या आरंभीं मुंबईंतील हिंदुधर्म व्यवस्थापक सभेचा प्रस्ताव होता. व त्या सभेकडून वे. शा. विष्णु शास्त्री पंडित वगैरे मंडळीस पुनर्विवाह सशास्त्र असल्याचें प्रतिपादन करून देऊन नंतर पुनर्विवाह करावा असें कळविलें असतां त्यांनीं ऐकिलें नाहीं व पु. वि. केला त्यामुळें त्या मंडळीस सभेनें बहिष्कृत केलें व ती गोष्ट स्वामींनीं मान्य केली. व देशोदेशीं आणि क्षत्रोक्षत्रीं सर्व ब्रम्हवृंदांस मानवली नंतर वर्तमान पत्रांतून पुनर्विवाह संबंधीं मोठा बखेडा माजला हें पाहून बहुत मोठा शास्त्री समाज व संस्थानिक आणि इतर थोर लोक बरोबर घेऊन शंकराचार्यांची स्वारी पुण्यास आली व विष्णु शास्त्री यांस त्यांनीं वादास आमंत्रण केलें पंत प्रतिनिधी, पंत सचिव, व गोपाळ रावजी देशमुख यांच्या मध्यस्थीनें वादाचे नियम ठरले व दोन्ही बाजूचे वादी प्रतिवादी, व पंच आणि सर पंच ठरून वाद सुरू झाला व तो नऊ दिवस चालला पुनर्विवाह अशास्त्र म्हणणारांकडील वाद करणारे सातारेंचे वे. शा. नारायणाचार्य गजेंद्रगडकर हे होते, व पुनर्विवाहाचे सशास्त्र वादी वे. शा. विष्णु शास्त्री पंडित हे होते. नऊ दिवस वाद झाल्यानंतर दोन्ही कडील पंचांकडे ते कागदपत्र देऊन अभिप्राया करितां तीन दिवसांची मुदत दिली. नंतर त्यांनीं अभिप्राय दिले. नारायणाचार्यांकडील पांचही पंचांनीं सांगितलें कीं पुनर्विवाह सर्वथा अशास्त्र आहे; व विष्णु शास्त्री यांजकडील एक पंच वे० शा० व्यंकट शास्त्री माटे यांनीं पुनर्विवाह अशास्त्र आहे म्हणून सांगितलें, व दुसरे तीन पंचांनींही तो करण्याविषयीं प्रशस्त लोकलौकिक नाहीं म्हणून सांगितलें मिळून दहा पंचांपैकीं नऊ पंचांचीं मतें पुनर्विवाहास अनुकूल नाहींत याजवरून व देशोदेशीचे जमलेले सर्व शास्त्री, पंडित व गृहस्थ यांचे संमतावरून पुनर्विवाह सर्वथा अशास्त्र असें स्वामींनीं ठरविलें आहे. पहिला पुनर्विवाह करणारे रा० नाना भिडे, व दुसरा पु० वि० करणारे पांडोबा करमरकर व त्यांची पुनर्विवाहित स्त्री वेणूबाई या त्रिवर्गांस व यांचे संततीस यावज्जीव शुद्धी नाहीं. व यांचे संसर्गी विष्णु शास्त्री पंडित विष्णु परशराम रानडे, गोपाळराव हरि देशमुख, विष्णु मोरेश्वर भिडे, श्रीकृष्ण शास्त्री तळेकर, वामन आबाजी मोडक, वामन प्रभाकर परांजपे, व नारायण प्रभाकर परांजपे हे बहिष्कृत आहेत यांस प्रायश्चित्तावाचून शुद्धी नाहीं. इत्यादि मजकूर निर्णयपत्रावरून गणेश शास्त्री यांनीं सर्वांस वाचून दाखविला.

नंतर १४ वे तारखेच्या ज्ञानप्रकाशांत रा० नारायण बापुजी गोरे नावाच्या गृहस्थांनीं आपले खुद्द सहिनिशीं छापविलेलें एक पत्र होतें तें गणेश शास्त्री यांनीं वाचिलें त्यांतील आशय असा होता कीं पुनर्विवाह सशास्त्र पक्षाचे पंच व्यंकट शास्त्री माटे यांनीं गोरे यांजजवळ दुसरे कित्ते एक लोकांचे समक्ष असें बोलून दाखविलें कीं माझा अभिप्राय पुनर्विवाहास विरुद्ध नव्हता परंतु स्वामींनीं मला आग्रह पुरःसर खोटा अभिप्राय देण्याविषयीं फार भेड घातल्यावरून मी पुनर्विवाह अशास्त्र आहे असा अभिप्राय दिला:—या मजकूराचें पत्र प्रसिद्ध झाल्यापुढें व्यंकट शास्त्री माटे याच्या सहीची एक जाहिरात छपून प्रसिद्ध झाली व जमलेल्या सभेंत वाटिली. तींतील मजकूर ही गणेश शास्त्रीयांनीं सर्वांस वाचून दाखविला त्यांतील तात्पर्य असें कीं आमची व नारायण बापुजी यांची मुळींच ओळख नाहीं, त्यापाशीं किंवा दुसऱ्या कोणापाशीं अशा अर्थाचें आम्हीं कांहीं बोललों नाहीं. स्वामींनीं उलट अभिप्राय देण्यास आम्हांस मुळींच सांगितलें नाहीं, शास्त्र पाहून व सत्य स्मरून आम्हांस जें वाटलें तें आम्हीं लिहून दिलें आहे.

याप्रमाणें वाचन झाल्यावर गणेश शास्त्री यांनीं व्याख्यान सुरू केलें; ते म्हणाले कीं, पुनर्विवाह पक्षाचे लोकांनीं आजपर्यंत ज्या ज्या विलक्षण लटपटी केल्या खोटसाळपणा केला, व निंद्याचरण केलें तें फार अद्भुत होय. पुनर्विवाह विषयक पक्षाकडील पंचांनीं फितुर होऊन सशास्त्र असा अभिप्राय द्यावा याकरितां त्यांकडे २५००० पावेतों रुपये नेले होते व ते घेऊन त्यांनीं पुनर्विवाहास अनुकूल अभिप्राय द्यावा म्हणून फार खटपट झाली. सरपंच वे० शा० गोपाळाचार्य कऱ्हाडकर यांजपुढें ५००० रुपयांचे तोडे नेऊन त्यांचें मत फिरविण्याविषयीं मोह घालीत होते याच प्रमाणें भिकूशास्त्री याविषयींही खटपट झाली यावरून विधवाविवाह वाद्यांचा कसा कुटिलपणा आहे तो पहावा!

आतां इतक्यांत जें वर्तमान पत्र हातांत घेऊन मी वाचिलें तें ज्ञानप्रकाश होय. असलें पत्र हातांत घेण्यापुर्वीं त्याचे कर्त्यास प्रायश्चित्त देऊन शुद्ध केलें पाहिजे. या वर्तमानपत्रांत अलिकडे धर्मनिंदा, जगद्गुरूची निंदा व ब्राम्हणांची निंदा असते. माझी सर्वांस अशी विनंती आहे कीं हिंदु आई बापांच्या पोटीं जन्म घेणाऱ्या लोकांनीं असलीं पत्रें विकत घेऊं नयेत एवढेंच नव्हे पण तीं पाहू सुद्धां नयेत. इंदुप्रकाश पत्र याच तोडीचें आहे त्यांत धर्माच्या व जगद्गुरूच्या संबंधानें अनंत खोटसाळ मजकूर हमेशा येत असतात म्हणून हीं दोन्हीं हलकट व अप्रयोजक पत्रें हिंदू म्हणविणारांनीं घेऊं नयेत व बाहेर देशच्या आपल्या आप्तवर्गांस व इष्टमित्रांसही तीं न घेण्या विषयीं लिहावें पवित्र, अग्निहोत्री, व साठ वर्षांचे वयाचा वृद्ध ब्राम्हण वे० शा० व्यंकट शास्त्री माटे यांवर काय किटाळ आणिलें होतें तें सर्वांनीं ऐकिलें आहे. नारायण बापुजी गोरे यांस मी ओळखतों यांचें आडनाव गोरे आहे पण यांच्या कृतीवरून यांस गोरे म्हणण्यापेक्षां काळे म्हणावें हें बरें.

वे. शा. विष्णु शास्त्री पंडित हुशार व मोठे खटपटी आहेत यांनीं पुनर्विवाहाचे कामीं आजपर्यंत जे प्रयत्न केले ते लाख रुपये दरमहा घेऊनही दुसऱ्या कोणी केले नसते याबद्दल मी त्यांची स्तुति करितों पण लागलीच माझे मनांत येतें कीं, काय हे निष्फळ व दुष्ट प्रयत्न! त्यांचे सर्व मार्ग अधर्म प्रवृत्तीचे आहेत. ते बहुत खोट्या गोष्टी सांगून लोकांस फसवीत आले आहेत विष्णु शास्त्री यांस व्याकरण, न्याय, मीमांसा यांचा [illegible] गंध नाहीं व असे ते स्वमुखानें भर सभेंत बोललेही आहेत. बरं पहा कीं, धर्मशास्त्राचा व यांचा तिहींचा अति निकट संबंध असून नुसते धर्म शास्त्राची बिल्कूल मातबरी नसतां व बाकीच्या शास्त्रांवाचून ते धर्मशास्त्र लंगडें असें असतां विष्णुशास्त्री तेवढ्या एकाचाच (व तेंही धर्मशास्त्र हो सगळें नव्हे, पुनर्विवाह प्रकरण किंवा नष्टमृत प्रकरण एवढ्याचाच ) पीढी गिरवितात तो काय कामाची? व ते एक देशीय व अपुरें ज्ञान लोकांनीं संपादून भ्रमांत कां पडावें? ज्या मनुष्यापासून आजवर कोणीं हजामत कधीं करविली नाहीं त्याचे तोंडून पुनर्विवाहासारखे बिकट शास्त्रार्थ लोकांनीं ऐकून त्याप्रमाणें वागणें हें परम कठिण व निंद्य आहे.

विष्णु शास्त्री यांनीं नियमांनीं आपणास बांधून धरून लेखीं वाद करविला त्यांत त्यांचे कृत्य अशास्त्र ठरलें हें त्यांचें त्यांनींच पुनर्विवाह अशास्त्र असें कबूल केल्यासारखें झालें व यावरून म्हटलें असतां त्यांनीं दुराग्रह सोडावा पण मरेपर्यंत ते तसें करणार नाहींत. खोटे शास्त्रार्थ, खोटी धर्मप्रवृत्ति, गुरुनिंदा, ब्रम्हद्रोह यांचेच निरंतर घोषण करितील. परंतु सर्वांस सांगणें म्हणून हेंच आहे कीं तें कोणी खरें मानूं नये.

विष्णुशास्त्री यांची सर्व बडबड बंगालच्या विद्यासागराच्या बुकावर आहे पण आमचे एथील वे. शा. भावाचार्य यांचे बंधू वे. शा. काशिनाथ शास्त्री काशीस आहेत त्यांनीं सभा करून विद्यासागरास जेरीस आणिलें व त्यांच्याच तोंडून पुनर्विवाह अशास्त्र असें ठरविलें याप्रमाणें दोन क्षत्रीं बोध पुनर्विवाह वाद्यांचा मोड होऊन सद्धर्माचा जय झाला ही मोठी आनंदाची गोष्ट समजली पाहिजे.

शेवटीं आमचे गणेश बाबा म्हणाले कीं पुनर्विवाहाच्या विधिपक्षीं जसें विष्णु शास्त्री झटले तसें तो सर्वथा अशास्त्र आहे व त्याची प्रवृत्ति पडूं नये म्हणून फार दिवसांपासून आजवर आम्हीं झटत आलों, बहुत मेहनत केली व अनंत दुःखें आणि छळ सोशिले. परंतु हें सर्व आम्हीं कशाकरितां केलें म्हणाल तर फक्त यज्ञोपवीताच्या अभिमानाकरितां व स्वधर्म संरक्षणाकरितां केलें व शेवटीं जगद्गुरूसंनिध आज आम्हांस यश येऊन आमच्या सर्व श्रमाचें सार्थक झालें. या धर्मवादासंबंधीं या पुण्यास हें आमचें भाषण आज शेवटचें आहे व मुंबईस गेल्यावर तेथील धर्म सभेंत आणखी एकवार आम्हांस बोलण्याचा प्रसंग येईल म्हणजे झालें. मग आम्हीं कधींही याबद्दल एक अक्षर बोलणार नाहीं. विधि व निषेध पक्षांकडील ज्या ज्या लोकांस आम्हांकडून वाईट वाटण्याजोगें कांहीं झालें असेल अगर त्रास झाला असेल त्यांनीं क्षमा करावी. व आतां आमचा या कामांतील अवतार संपला असें जाणावें.

हा सर्व इतिहास पाहून आम्हांस कांहीं विचार सुचतात ते आम्ही आपले वाचकांस कळवितों.

ही सभा प्रथम तुळशी बागेंत प्रसिद्धरितीनें होणार म्हणून आठ दिवस थाटाघाट चालली होती व त्याप्रमाणें आमंत्रण पत्रें छापून प्रसिद्ध झालीं तुळशी बागेंत बैठका घातल्या, लोक जमले, असें असतां आयते वेळेस तो सर्व थाट बदलून स्वामीचा बिऱ्हाडीं घरांत सभा भरविली तेव्हां यांत कांहीं न्युन दिसतें. विष्णु शास्त्री पंडित, विष्णु परशराम रानडे प्रभृती पुनर्विवाहोत्तेजक मंडळी पुण्यास हजर होती व ती तुळशी बागेंतील निर्णय ऐकण्यास जाणार होती त्यामुळें गणेश शास्त्री यांनीं भिऊन प्रसिद्ध सभेचा थाट मोडिला असावा व असें केल्यामुळेंच निर्विघ्नपणें त्यांस "मुक मस्तीति वक्तव्यं" याप्रमाणें स्वैर बोलता आलें, नाहीं पेक्षां त्यांस दुसरे कोणाचे भाषणानें अडथळा आला असता.

निर्णयपत्र जें वाचलें गेलें तें समाधान कारक नाहीं. मुळीं निर्णयच बरोबर झाला नाहीं. दोहो बाजुंनी पांच पांच पंचांपैकीं पुनर्विवाह पक्षाकडील एक पंच माटे हा स्वामींनीं फितविला त्यामुळें साहा मतें प्रतिपक्षास व च्यार मतें पुनर्विवाह पक्षास झालीं तर आम्हांस वाटतें कीं निर्णय बरोबर झाला नाहीं याजकरितां वाद पुन्हा व्हावा नाहीं पेक्षां माटे यांचें येक मत व त्याबद्दल दुसऱ्या बाजुचें एक मत कमि करावें म्हणजे दोहो बाजुस च्यार च्यार मतें राहतील.

व त्यावरून विचार केला असतां दोन्ही पक्ष समतमान असा निर्णय होईल. व त्यावरून ज्यास जें उत्तर वाटेल तें तो खुशाल करील मग कोणासच बहिष्कृत नाहीं व कांहीं तंटा नाहीं. असा निर्णय सद्भावनेनें होत असतां त्यास कायद्यानें अडथळा आणिला हें बरोबर नाहीं.

नारायण बापूजी गोरे यांजवळ व्यंकट शास्त्री माटे जी गोष्ट बोलले तीच पुन्हा बोलले नाहीं म्हणून त्यांनीं छापून प्रसिद्ध केलें व त्यावर गणेश शास्त्री मालवणकर यांनीं टीका करून त्यांची अब्रू घेतली म्हणून त्या दोघांवरही गोरे यांनीं फौजदारी कोर्टांत फिर्याद केली आहे. व २९ वे तारखेस तिचा फैसल होणार आहे. शंकराचार्यस्वामीसही त्या खटल्यांत समन्स आहे. कायदी स्वामींची योग्यता. स्वामींनीं तरफदारी केली नसती तर त्यांस कोर्टाचें दार पाहावें लागलें नसतें.

ज्ञानप्रकाश व इंदुप्रकाश, आणि विष्णु शास्त्री यांची निंदा व्याख्यानामध्यें गणेश शास्त्री यांनीं केली आहे ती त्यांच्याच स्वभावास शोभो जाणें. असे हलकट शब्द उच्चारणें हें भल्यामनुष्याचें शील नव्हे. व ते शब्द घरांत चुलीं पुढें नव्हे तर २००० लोकां समक्ष उच्चारिले आहेत तेव्हां त्याविषयीं या पत्रकर्त्यांनीं व विष्णु शास्त्री यांनीं त्यांस जबाब विचारावा हें आम्हांस योग्य वाटतें.

अधर्म प्रवृत्ती व फसवणूक जी कांहीं झाली आहे व होत आहे ती या वर्तमानपत्रांपासून नव्हे पण अर्थडाकस (धर्म भोळे) लोकांनीं जें आलिकडे बंड माजविलें आहे व त्याला गणेश शास्त्र्यासारखे सूत्रधार मिळाले आहेत त्यांचाच हा प्रसाद आहे व हा नवीन तरुण लोकांस बराच भोंवला पण शेवटीं पुनर्विवाहाचा जयच झाला ही धर्म प्रवृत्ती सामान्य नव्हे.

विद्यासागर पंडित यांचा काशिनाथ शास्त्री यांनीं पराजय केला व पुनर्विवाह अशास्त्र म्हणून विद्यासागरांनीं कबूल केलें असें जें मालवणकरांनीं आपले व्याख्यानांत सांगितलें तें सर्वथैव खोटें आहे. व या विषयीं सवडीनुसार आम्हीं पुढें लिहूं आतां आम्हांस इतकेंच वाटतें कीं अशा खोटसाळ गोष्टी सांगणारे व सुधारणेच्या कामांत ढवळाढवळ करणारे गृहस्थ आपला अवतार संपला म्हणतात हे त्यांचे शब्द दयाळू ईश्वरानें लवकर खरे करावेत व त्यांचे अवतार संपतानितच म्हणजे बरें. मागें तरी रावण, कुंभकर्ण, दुर्योधन, कंस प्रमुख दुर्त्रास प्राण्यांचें निर्दाळण झाल्याखेरीज धर्म प्रवृत्ती झाली नाहींच. असो आतां आम्ही हा लांबलेला विषय पुरा करितों.

---

"एक वाटेचा फिरस्ता" मुक्काम बाळापुर तुमचें पत्र पोंचलें. पत्रांतील मजकूर छापण्यासारखा नाहीं. व सहीचीं अक्षरेंही बरोबर स्पष्ट रितीनें ओळखता येत नाहींत इतकी गिचमिड आहेत.

---

"धारकर" तुमचें पत्र फार उशिरानें पोंचलें पुढील खेपेस विचार होईल.

**अब्रूची फिर्याद.**

आम्हीं आपल्या मागील अंकांत रा० नारायण बापूजी गोरे यांच्या ज्ञानप्रकाशांत छापलेल्या पत्राचा उतारा घेतला होता त्या पत्रा विरुद्ध वे० शा० व्यंकट शास्त्री माटे यांच्या सहीचें एक पत्र रा० नारायण बापूजी यांचे लिहिणें खोटें आहे वगैरे अशा अर्थाचें प्रसिद्ध झालें आहे.

यावरून गोरे यांस बराच राग आला आणि त्यांणीं रेलवे माजिस्ट्रेट डा० फ्रेजर. यांजकडे माटे शास्त्री यांजवर व रा० गणेश बापूजी यांजवर भर सभेंत निंदा केल्याची फिर्याद केली आहे. कालरोजीं तिची चवकशी होणार होती. निकाला अंतीं सर्व मजकूर लिहूं. ह्या धर्म वादाच्या खुळाचा काय परिणाम होईल कोण जाणें.

## वऱ्हाड.

मेहेरबान बेल साहेब डेपुटी कमिशनर हे रजेवर ता. २१ रोजीं गेले तीन महिन्यांनीं परत येतील.

मेहेरबान मेंजी साहेब स्मालकाज कोर्टाचे जज्ज हे तूर्त डेपोटी कमिशनरचें काम पाहूं लागले आहेत.

रा. त्रिंबकराव नाइक तहशीलदार तालुके मेहेकर यांची बदली मेहेकराहून चिखलीस झाली व त्यांचे जागीं मेहेकरास मलकापुरचे रा. मल्हारराव आबासाहेब यांची नेमणूक झाल्याप्रमाणें ते येऊन मेहेकरास आपले कामावर रुजू झाले. यांणीं चाकरीचा राजिनामा दिला अशी बातमी आहे कारण समजत नाहीं. आतां त्रिंबकराव हे तुर्त मे. वाहिमनजी साहेबांचे रजेमुळें जी वर्गावर्गी झाली त्यामुळें मलकापुरचेंच काम पाहणार नंतर [illegible] तील.

---

अकोला

---

इमाम जयंतीच [illegible] शी टाकळी ता० अकोलें येथें मुसलमान लोकांमध्यें मोठी मारामार झाली. या बाबदींत १२ असामी कैदी केले आहेत. हा खटला मे. सालकेड साहेब यांचे कोर्टांत चालू आहे.

मौजे पिंजर तालुके अकोलें येथें आग लागून सुमारें दोनशें घरांची आहुती झाली व तसेंच कालरोजीं येथे ताजना पेठेंत आग लागून तीन चार घरांचा फडशा झाला. शहरांतील आगीच्या बंदोबस्ताचे कामीं आमची मुनसिपाल कमेटी आपलें लक्ष पुरविणार काय?

मे. कमिशनर साहेब व डे. कमिशनर साहेब यांच्या स्वाऱ्या येथेंच आहेत.

मे. श्रीकृष्ण नरहर अ. क. हे जळगांवाकडे फिरावयास गेले आहेत.

बाळापुरचे मास्तर मि. दामोदर बावजी यांजवर तेथील तहशीलदार यांच्या नातजांवयास मारल्याबद्दल मे. नेकोलेट साहेब यांच्याकडे फिर्याद झाल्याबद्दल आम्हीं पूर्वीं लिहिलेंच होतें. तो खटला फिर्यादीची चालविण्याची खुशी नसल्याकारणानें काढून टाकिला. आम्हास वाटतें कीं हें झालें हें फार चांगलें झालें. आम्हांस याविषयीं कांहीं लिहावयाचें आहे तें पुढें सवडीनुसार लिहूं.

मे. ए. सी. लायल साहेब क. प. व. यांनीं एक बूक ज्याला वऱ्हाड म्यान्युअल म्हणतात तें केलें आहे. यांत वऱ्हाडास लागू असणारे कायद्यांचा संक्षेप व वऱ्हाडांतील सरकुलरें वगैरे ह्यांचा संग्रह आहे हें बूक कायद्याची माहिती करून घेणारांस फार उपयोगी आहे.

उद्यांपासून सर्व दिवाणी कोर्टांस उन्हाळ्याबद्दल सालाबादप्रमाणें एक महिन्याची रजा मिळणार आहे.

हवा—उन्हाळ्यानें आपला अंमल गाजविण्यास प्रारंभ केला आहे. दोन दिवसांपासून आकाशामध्यें अभ्रें येतात तेणेंकरून तर जास्तच गर्मी होत आहे. नदीस पाणी मुळीं नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

## वर्तमानसार.

**आगगाडीच्या वेळांत फेरफार.**—पोंगवाटाघाट चालल्याप्रमाणें सर्व रेलवेवर मद्रासचा वेळ तारीख १ मे पासून ठरणार. त्यामध्यें व मुंबईच्या वेळे मध्यें २७ मिनिटांची तफावत आहे म्हणजे मद्रासचा वेळ २७ मिनिटांनीं अगोदर आहे. आतां गाडींत बसण्यास जाणारांस सुमारें अर्धा तासपूर्वीं गेलें पाहिजे. याचप्रमाणें आगगाडी निघण्या मध्यें ही कांहीं फेरफार झाला आहे. मुंबईहून जी गाडी दिवसा ८॥ वाजतां नागपुरास जाण्यास निघत होती ती आतां नऊ वाजतां निघून दुसरे दिवशीं ४॥। वाजतां नागपुरांस पोंचेल. व तशीच नागपुराहून जी गाडी ८। वाजतां निघत होती ती आतां ७॥। निघेल व दुसरे दिवशीं ३ वाजतां मुंबईस जाईल.

**बडोद्याची दिवाणगिरी.**—गुजराथेंतील एका वर्तमानपत्रावरून असें कळतें कीं बडोद्याच्या मुख्य दिवाणगिरीची जागा मे० नाना मोरोजी मुंबईचे पोलिस माजिस्त्रेट यांस देणार. जर आमचा मित्र लिहितो याप्रमाणें झालें तर बडोद्याचे राज्याचा उर्जित काळ आला असें समजलें पाहिजे. कारण हे गृहस्थ काम करण्यांत हुशार असून निस्पृही आहेत मागें अशीच रा० ब० गोपाळराव हरि देशमुख यांस ती जागा मिळणार म्हणून वंदता होती ती जशी धुव्वावर गेली तसें न होवो म्हणजे झालें.

हवा—ऋतु मानाप्रमाणें हवा उत्तम आहे रोगराई विशेष नसून सर्व लोक वसंताचा आनंदानें उपभोग घेत आहेत.

ज्ञा० म०

पुणें—आजरोजीं दोन प्रहरीं हवामापक यंत्रांत. पारा ९१ अंशावर होता रोगराईचा उपद्रव विशेष लिहिण्यासारखा नाहीं. बाजार भाव गेल्या आठवड्याप्रमाणें माफक आहे.

श्रीमंत धुंडीराज चिंतामण ऊर्फ तात्या साहेब सांगली कर यांची स्वारी उदईक नहरास जाणार आहे त्यावरून त्यांचा हेतुप्रमाणें दाद गवरनर साहेबांकडे अद्यापि लागली नाहीं असें वाटतें. ज्ञा० च०

कपुर थळ्याचे राज पुत्रांनीं आपले वडीलांस सद्गती प्राप्त व्हावी म्हणून मे० ओव्हन साहेब नासिकचे कलेक्टर यांस लोकोपयोगी कामा करितां ३५००० रुपये दिले.

तारीख २२ एप्रिल रोजीं ढाका येथें मोठा धरणी कंपाचा धक्का बसला.

गेल्या महिन्यांत मुंबई बंदरामधून ५२,२३,७१७ इतक्या खंडी कापूस १,५९,८२,६५४ रुपये किमतीचा बाहेर देशीं गेला.

ता० १७ एप्रिल रोजीं जो पंधरवडा संपला त्यांत वऱ्हाडांतून व मध्य प्रांतांतून १६८४७ फुलप्रेस, ५४४२ हाफ प्रेस व १५६८ डोके इतका कापूस मुंबईकडे गेला.

कलकत्ता येथें रेट पेयर्स असोशिएशन म्हणून एक नवीन मंडळी तेथील नेटिव गृहस्थानीं स्थापन केली. मध्यम व कनिष्ट प्रतीच्या लोकांचीं दुःखें व इच्छा सरकारास कळविण्याचा या मंडळीचा उद्देश आहे. ब्रिटिश इंडियन असोशिएशन सभेतील सभासद श्रीमान् जमीदार असल्या मुळें ते मध्यम व कनिष्ट प्रतीच्या लोकांची फारशी परवा करीत नाहींत म्हणून ही नवीन मंडळी स्थापन झाली आहे असें इं. डे. न्यूज वरून कळतें.

**बंगाली बाबूंचें आगमन**—गेल्या बुधवारीं कलकत्याहून ब्राह्मधर्मानुयायी तिघे बाबू येथें मंगलोरास जाण्या करितां आले. त्यांजपैकीं बाबू प्रताप चंद्र मजूमदार यांनीं फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूट मध्यें सुधारणुकचा काळ या विषयावर इंग्रजींत फार सुंदर भाषण केलें मंडळी ही फार जमली होती. काल रोजीं प्रार्थना समाजमध्यें त्यांनीं उपदेश केला. आज सहा वाजतां. आणखी एक त्यांचें भाषण फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटमध्यें व्हावयाचें होतें उदईक ते मंगलोरास जाणार आहेत. इं० प्र

**पंजाबांतील पिकें**—तिकडील सरकारी रिपोर्टावरून असें समजतें कीं ज्या पिकाची कादणी झाली तीं पिकें सरासरी बरीं आहेत जीं पिकें शेतांतून उभीं आहेत तीं चांगलीं होतील असा अनमास आहे. टोळांचा आतां अगदीं उपद्रव नाहीं. परंतु त्यांचा ऐवजी दुसरे सूंदी जातीचे किडे झाले आहेत त्या योगें हरभऱ्याच्या पिकास बराच उपद्रव झाला.

पायोनियर वरून असें समजतें कीं वायव्य प्रांतांत हलक्या प्रतीच्या लोकांत असा ग्रह होत चालला आहे कीं प्राप्ती वरील कर जास्त वाढला याचें कारण राजपुत्र हिंदुस्थानांत आला व त्या संबंधानें जो खर्च झाला तो फेडण्या करितां होय.

विलायतेस धोलेरा कपासाचा भाव ९ $\frac{3}{2}$ पेनींचा आहे.

मद्रास टाईम्स वरून असें समजतें कीं वालजरप येथें ४९ वी पलटण आहे तिच्यातील एका उल्कीनसन नांवाच्या सोल्जराचा व एका पोलीस सिपायाचा तंटा झाला. त्या वेळेस त्या युरोपियनाच्या हातांत एक चाकू होता तो त्यानें त्या नेटिवास मारला त्या योगें जराशी त्याचे हातास व तोंडास दुखापत झाली. ही दुखापत झाल्यावर तो पोलिस सिपाई जमिनीवर उगाच पडला. त्या सोल्जरानें त्यास उठविण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले परंतु ते सर्व व्यर्थ झाले कारण तो पोलीस सिपाई जमिनीवर मेला. कां जिता असा पडला; या योगें सोल्जरास असें वाटलें कीं हा मनुष्य मेला असावा. मग त्याचे हातांत जो चाकू होता तोच त्यानें आपले पोटांत भोकसून घेतला तेणेंकरून त्याचे पोटांतून रक्त वाहूं लागलें हें पाहून पोलिस सिपाई जो हा वेळ पर्यंत मेल्याचें सोंग घेऊन पडला होता तो उठून पळून गेला. नंतर त्या सोल्जराचे मित्रांनीं त्यास इसपितळांत नेलें.

कलकत्ता येथील ब्रिटिश इंडियन असोशिएशन या मंडळीची अठरावी वार्षिक सभा तारीख ३१ मार्च रोजीं त्यांच्या दिवाणखान्यांत भरली होती वार्षिक रिपोर्ट वाचून मान्य झाल्यावर नवीन वर्षा करितां कामगारांच्या नेमणुका होऊन सभा विसर्जन झाले असें हिंदु पेट्रियट वरून कळतें.

शृंगिरीचे शंकराचार्य पुण्यास लवकर जाणार आहेत असें समजतें.

मुंबईतील हाय कोर्टांत अटर्नींचीं कामें करण्याकरितां खालीं लिहिलेल्या गृहस्थांच्या परिक्षा उतरल्या. मेसर्स चांदीभाई जाहगीर, धोंडू शामराव, आणि शापुरजी हरमसजी पाटक.

जेजुरीच्या जत्रेंत जरी तीन हजारावर लोक जमले होते तरी आनंदाची गोष्ट ही कीं त्यांत महामारीचा अगदीं उपद्रव झाला नाहीं.

असें समजतें कीं ग्रे० ई० पे० रेलवेचे ट्राफिक म्यानेजर ई० इ० रेलवेच्या दरा बरोबर इकडील दर करण्याच्या विचारांत आहेत.

फ्रेंड आफ् इन्डिया वरून असें कळतें कीं, मंगलोर येथें ब्रह्मसमाजाची स्थापना करण्यासाठीं त्या समाजाचे तीन मिशनरी तिकडे जाण्यास निघाले आहेत.

याच पत्रावरून असें कळतें कीं, तांजोर प्रांतांत पुरुष व मुली धरून नेण्याचा धंदा करणारे कित्येक लोक पकडले आहेत.

कलकत्त्याकडील वर्तमान पत्रावरून कळतें कीं, लखनौ येथील कायस्थांनीं लग्नांत पुष्कळ खर्च होतो तो न होण्याच्या बंदोबस्तासाठीं आपल्या लोकांची सभा जमविली होती. आणि खर्च जितका होईल तितका कमी करण्याचा ठराव अमलांत आणण्यासाठीं फार खटपट चालली आहे.

मि० दं.

रेलवे अपघात:—बडोदा रेलवेवर तारीख १८ एप्रिल रोजीं स्पेशियल ट्रेन दुसऱ्या ट्रेनवर आपटून अपघात झाला या अपघातामुळें दोन मनुष्यें मरण पावलीं व पुष्कळ दुखावलीं.

अपघात— गेल्या शनवारीं सायंकाळीं सुमारें तीस युरोपियन मंडळी मडमा व साहेब लोक मिळून वांद्र्यास वन भोजनाकरितां गेले होते तेथें दोन तीन तास राहून परत येते वेळीं एकवा आमानिबस गाडीचे घोडे बुजले त्याजमुळें ती गाडी एकवा भिंतीवर आपटून उलथली. तेथेंच एक विहीर जवळ होती तींत दोन मडमा व एक साहेब असे तिघे पडले. त्यांपैकीं साहेब निघाले; परंतु त्या मडमा निघावयास उशीर झाल्यामुळें मरण पावल्या आनदा करितां ही मंडळी गेली होती त्याचा हा असा अत्यंत दुःखकर परिणाम झाला. दुसऱ्या कांहीं लोकांस इजा झाली आहे.

बांबे ग्याझेट वरून असें कळतें कीं, रशिया देशांत परदेशचीं ६८४६ वर्तमान पत्रें सन १८६८ सालीं खपत होतीं. यांत जर्मन ३४७३, फ्रेंच २२४३ व इंग्लिश ९८२ होतीं असें समजतें.

सरकारी रेलवे बांधण्याकरितां ज्या रकमा पसार झाल्या त्या पुढें लिहिल्या प्रमाणें वाटयास आल्या आहेत असें कळते:— मुंबई, दीडलक्ष; बंगाल, दोनलक्ष; वायव्य प्रांत नऊ लक्ष; आणि पंजाब, ८८½ लक्ष.

इंदूर व खंडवा यांजमध्यें जो सरकारी आगगाडीचा रस्ता व्हावयाचा त्याच्या पहाणीचें काम यंदाचा पर्जन्य काळ संपल्यावर सुरू होईल. या कामाकरितां लेफ्टनेंट नटाल व मेसर्स कांवेल व डायल या तीन एंजिनियरांची योजना झाली आहे असें टैम्स आफ इंडियावरून कळतें.

नागपूर प्रांताचे हल्लींच चीफ कमिशनर मि. मारिस यांनीं ता. १९ मे पासून विलायतची दोन वर्षांची रजा मागितली आहे. तेव्हां ते गेल्यावर त्यांच्या जागेवर पंजाब हायकोर्टाचे जज्ज मि. जान स्कार्लेट कांपबेल हे चीफ कमिशनर होतील असें नागपूरच्या पत्रावरून समजतें. इं. प्र.

## पत्रव्यवहार.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

वि. वि. महाराज ह्या खालील चार ओळींस आपल्या पत्रीं जागा देण्याची मेहेरबानगी होईल अशी आशा धरून आपणाकडे पाठविल्या आहेत.

ह्या वऱ्हाड प्रांतांत उन्हाळा सुरू झाला कीं पुरें. जिकडे तिकडे आगीविषयीं बातम्या येतात. आज काय हें गांव जळून खाक झालें काल काय त्या गांवांतील घरें जळून मोठा नाश झाला. अशी बातमी आल्यावांचून एक आठवडा नव्हे पण मला वाटतें कीं एक दिवस सुद्धां सुना जाणें कठिण. ह्या आगीविषयीं आपण बहुत वेळ लिहिलें आहे, पण आमच्या वऱ्हाडांतील लोकांस किती ज्ञान आहे हें आपणास माहित आहेच तिकडे लक्ष देतो कोण.

एकादें खेडें गांवांतील लहान झोंपडी जळाली तर ती लागलीच दुसरे दिवशीं चार एरंडाचे वांसे व दोन गवताचे भारे आणून तयार करितात. पण एकाद्या शहरांत मोठाल्या वाड्यास आग लागली म्हणजे फारच नुकसान होतें. म्हण आहे कीं "गरिबाची मरूं नये बायको आणि श्रीमंताचें जळूं नये घर"

आपल्या वऱ्हाडांत बहुतकरून मोठमोठाल्या शहरीं मुनसिपाल कमेट्या झाल्या आहेत पण मला असें वाटतें कीं, त्या बाल्यावस्थेंत आहेत म्हणा किंवा त्यांचीं कामें त्यांस बजाविण्याची चांगली शक्ति अजून आली नाहीं असें म्हणा पण त्यापासून लोकांचा व्हावा तसा चांगला फायदा अजून होऊं लागला नाहीं हें अगदीं खरें आहे.

वास्तवीक पाहिलें असतां आगीचा वगैरे बंदोबस्त करणें हीं कमेटीच्या कामापैकीं मुख्य कामें आहेत हें कोणीही कबूल करील.

गेलेसालीं एथें घरें जळून बरेंच नुकसान झालें हें सर्वांस आठवत असेलच यंदाही नुकतेंच उन्हाळ्यानें तोंड बाहेर काढिलें नाहीं तों मागील व त्यामागील आठवड्यांत कांहीं गवताच्या गंजी व घरें जळालीं आणि बरेंच नुकसान झालें.

पत्रकर्ते महाराज माझी कमेटीस इतकीच आग्रहाची सूचना आहे कीं तिनें छापरी घरें काढून टाकण्याचा हुकूम पुनः जारी करावा. दहा वीस घरां आड जरी एकादें तनाचें घर असलें आणि त्यास आग लागली तर तें त्या सर्व घरांस घेऊन बसतें. दुसरे आग विझविण्याचा एक बंब आणवावा म्हणजे बहुतकरून आगीचा बंदोबस्त होईल. जर कदाचित् कमेटीला पैशाची उणीव असेल तर मला वाटतें कीं तिनें लोकांवर पट्टी बसवावी असल्या कामास लोक खुशीनें पैसा देतील यांत संशय नाहीं.

पत्र विस्तार फार झाला सबब, माझ्या सुचनांची कमिटी विचार करील अशी आशा धरून, आतां पुरें करितों कळावें तारीख २८ माहे एप्रिल सन १८७० इसवी. मुक्काम आकोलें.

आपला मित्र

क्ष.

---

रा० रा० "वऱ्हाड समाचार" कर्ते यांस

वि० वि० तारीख १४ माहे मजकूर रोजीं सरकारांतून आलेलीं बुकें येथील इं० म० स्कुलांतील मुलांस बक्षीसें वांटण्याचा समारंभ मोठ्या थाटानें झाला. आदले दिवशीं गांवांतील गृहस्थांस हेडमास्तर यांजकडून निमंत्रण पत्रिका गेल्या होत्या प्रमाणें बहुतेक लोक आले होते. शिष्टांपैकीं दोघ तिघे मात्र आले नव्हते. त्यांस आपण श्रेष्ठ असून कनिष्टांत जाणें इष्ट नव्हे, त्यास शिष्ट भाषणांनीं संतुष्ट करण्याची शैली आपले अंगीं अति उत्कृष्ट आहे असें जमजून ते आले नसतील असें अनुमान सहज होतें. अस्तु. सर्व निमंत्रित मंडळी जमल्य, नंतर पहिल वर्गांतील दोन मुलांनीं "विद्यापासून लाभ" याविषयावर निबंध सुरस रचिले होते ते वाचले. नंतर मुलांच्या हुशारीप्रमाणें प्रत्येक वर्गांत चार याप्रमाणें बक्षिसें वांटून जमलेल्या मंडळीस पान सुपारी देऊन मोठ्या आनंदानें सभा विसर्जन झाली. कळावें

धार ता० १८ माहे ऐप्रिल.

सभा पहाणार.

## जाहिराती.

नोटिस—गोविंदराव व्यंकटेश कुळकरणी मौजे माडकें तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐशीजे तुम्ही तारीख २३ एप्रिल सन १८७० चे वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली त तिचें उत्तर देण्यांत येतें कीं तुमचे लिहिल्याप्रमाणें देत असलेले रुपये १३१ घेऊन पावती देण्यास आम्ही नाहीं म्हटलें नाहीं. आलेले इसम व खुद्द तुम्हीही खात्याबाबद घेणें राहिलें नाहीं अशी पावती मागूं लागला सबब आम्हीं दिली नाहीं कारण तुम्हाकडे खात्यावरून येणें रुपये १३१ नसून जाजती आहेत तेव्हां तशी पावती कशी दिली जाईल? आतांही तुम्हास कळविण्यांत येतें कीं, मर्जी असल्यास १३१ रुपये पाठवून द्यावे व तेवढे रुपये पावल्याची पावती घ्यावी. तुम्हाकडेस ह्या १३१ रुपयांशिवाय आणखी खाते बाकीही घेणें असून रोखयाबाबदही रक्कम घेणें आहे व जोरीही घेणें असून जामिनकी बाबदही घेणें आहे त्याचाही उलगडा करावा न केल्यास ८ दिवसांनंतर दिवाणींत फिर्याद केली जाईल व ८ दिवसांनंतर तुम्हाकडेस घेणें असलेले रकमेचें व्याज दरमहा दर शेकडा रुपये २ प्रमाणें घेण्यांत येईल व तुम्हास द्यावें लागेल कळावें तारीख २८ एप्रिल सन १८७० इसवी.

(सही) नानकराम संतुकलाल मारवाडी द. खु.

---

नोटिस—रामदयाळ नथमल साहू दुकान खामगांव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुम्हास तारीख ९ एप्रिल सन १८७० चे वऱ्हाड समाचार पत्रांतून दिलेले नोटिशींत पौष शुद्ध १९ चे कराराचा सवदा म्हणून लिहिलें आहे ती चूक झाली आहे त्या जागीं कार्तिक शुद्ध १५ पाहिजे आहे सबब तुम्हांस ह्या नोटिशीनें कळविलें जातें कीं पौष १९ चे ठिकाणीं कार्तिक शुद्ध १९ समजावी. कळावें तारीख २८ एप्रिल सन १८७० इसवी.

(सही) नानकराम संतुकलाल वाहिवटदार केसोराम संतुकलाल द. खु.

---

नोटिस— रघुनाथदास लक्ष्मणदास साहू दुकान खमगांव यांस नोटिशीचा जबाब खालीं लिहिलेले सही करणार याजकडून देण्यांत येतो ऐसाजे आम्ही ओझें घेऊन जाणें विषयीं पूर्वी आपणास नोटिस दिली असून अद्यापि ओझें नेत नाहीं व हल्लींचे नोटिशींत तुम्ही असें म्हणता कीं, आमचा गुमास्ता मुंबईस जाऊन परत आला त्यास हें लिहिणें तुमचे बरावर नाहीं. आमचा गुमास्ता निरंतर मुंबईत हजर आहे व ज्यासमयीं आपलेकडून कोणीही जाईल तेव्हां आमचें पत्र गुमास्त्यानें घेऊन जाऊन तेथील खर्च गुमास्त्यास आदाकरून रुईचें ओझें २१ आपण आपले अंगीं लावून घ्यावें आपले नोटिशीचा खर्च आमचेकडून मिळण्याचा नाहीं केवळ तुम्ही मागाल तरी आम्ही देऊं असें होणें मुशकील आहे व असें मागणें चांगलें नाहीं पण आमचा मात्र दोन नोटिशीचा खर्च ओझें नेतेसमयीं द्यावा लागेल हें समजावें.

ह्या नोटिशीचे तारखेपासून १९ दिवसांचे आंत आपण आपलें ओझें मुंबईहून उचलून न्यावें न नेल्यास आम्हीं नेकी बंदीचे जबाबदार नाहीं. व आम्हीं आपले मुंबईचे मुनिमास सदहू ओझें देण्याविषयीं कळविलें आहे आतां आमचेकडून कांहीं हरकत नाहीं.

तुमची मर्जी अकोल्यास ओझें द्यावें अशी असल्यास रेलवेचा खर्च कबूल कराल तर तसा जबाब आल्या अन्वयें रुपये मिळण्या झालेची तजवीज करूं तारीख २९ माहे एप्रिल सन १८७० इ.

(सही) गंगाधर जोरावमल.

---

नोटिस—हरिराम मुन्नारका साहू दुकान कामठी यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं पुर्वी बरहुकूम रुपये दोनशें तुम्ही आम्हापासून मुंबई मुक्कामीं घेतले त्याजला सुमारें पावणे तीन वर्षे झालीं अद्याप रुपये पाठविले नाहीं. हल्लीं या नोटिशीचे तारखेपासून ८ दिवसांचे आंत व्याजासहीत रुपये खामगांव येथें आमचे दुकानीं पाठवून द्यावे अगर मुदतीचे आंत रुपये न पाठविल्यास तुम्हावर शिरस्तेप्रमाणें फिर्याद होऊन खर्चसुद्धा रुपये द्यावे लागतील. तुम्हास कळावें तारीख २९ एप्रिल सन १८७०

(सही) मुकुंदव केनडीवाल मारवाडी.

नोटिस—शिवलाल मातीलाल सुरत. राम मुनिम दुकान उमरावती यास तुम्ही सत्यप्रकाश पत्रांत तारिख १७ माहे एप्रिल सन १८७० इसवी रोजीं आम्हांस नोटिस दिली तिचा जबाब येणेंप्रमाणें.

तुम्ही आमचे दुकानची तीन किस्त रुपये २६०० कोणाजवळुन खरीदी केल्या आणि ज्या मनुष्या जवळून खरेदी केल्या त्याची सहाजोगी पाहून बेचनाचे सर्व लिहून घेतलेच असतील तो मानुष्य तुमचा देवाल कायद्या प्रमाणें कदाचीत होईल.

आम्हा जवळ तुमचा गुमास्त वगैरे आला नाहीं व घेण्याचा संबंध नाहीं तुमची मर्जी असल्यास आपण आपला इलाज चालु शकतां.

विनाकारण आम्हास नोटीस दिली सबब खर्चा बद्दल रुपये ५ आपण पाठवून द्यावे. नाहीं पेक्षा दिवाणी मार्गाने मागावे लागेल. कळावे तारिख २८ माहे एप्रील सन १८७० इसवी.

( सही गंगाधर जोरावरमल.

---

नोटिस—ताराचंद मुंदडा यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं येथें फौज येणार होती त्याकरितां तहसीलदार साहेब तालूके बाळापुर यांनीं तुम्हांस चणे खंडी ५ बोलाविण्याविषयीं सांगितलें होतें व पंचायतीचे रुपयातून रुपये २६० आमचे पासून तहशीलदारांनीं देवविले सबब जानराव देशमुख हस्तें तुम्हांस रुपये आम्ही दिले त्याचे चणे तुम्ही बोलाविले किंवा नाहीं हें कांहीं समजलें नाहीं आणि सर्व पंचांनीं आमचे मागें ताकीद लाविली आहे कीं आमचे रुपये तुमचे हस्तें बाकी राहिले आहेत त्यांचा नटवाडा करून द्यावा सबब एक महिना झाला तुम्हांस चण्याचे हिशेब समजून देण्याविषयीं सांगितलें परंतु तुम्ही कांहींच जबाब दिला नाहीं त्यास आतां नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सदरहू रुपये २६० आम्ही तुम्हांस ज्या मितीस दिले त्या मितीपासून व्याजासुद्धां आठ दिवसांचे आंत आमचे पाशीं आणून द्यावे न दिल्यास दिवाणी कोडतांत या नोटिसीचे खर्चासुद्धां रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें तारिख २४ माहे एप्रिल सन १८७० इसवी.

सही ) केशव रामजी रामजस दस्तुरद इच्छाराम गुमास्त कुलमुखत्यार.

---

स—पिराजी मर्द पांडोबा सुतार मौजे अंजनी खुर्द परगणे मेहेकर ... खालीं सही करणार याजकडून ...ण्यांत येते कीं तुजला मजबरोबर नांदणूक करणें असल्यास याद्या गांवीं यावें अगर येणें नसल्यास अन्नवस्त्राबद्दल वगैरे जो खर्च लागेल तो मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाहीं. म्हणून तारिख २३ नवंबर सन १८७० इसवी रोजीं नोटिस देण्यांत आली परंतु त्या नोटिसीप्रमाणें उत्तर दिलें नाहीं. व व्यवस्था कांहीं केली नाहीं. याजकरितां दुसरी नोटिस देतों कीं मजला तुझे बरोबर गंधर्व लावण्यास सुमारें १०० रुपये खर्च लागला ते रुपये व्याजासुद्धां या नोटिसीचे तारखे पासून १५ दिवसांचे आंत आम्हास द्यावे अगर वर लिहिलेले मुदतींत न दिल्यास गंधर्व लावण्यास २०० रुपये खर्च लागला ते रुपये व्याजासुद्धां नोटिसीचे खर्चा सह तुझे पासून भरून घेण्याविषयीं दिवाणींत फिर्याद करीन

तुजला या नोटिसीवरून असें कळविण्यांत येतें कीं तूं नोटिसीप्रमाणें वर्तली नाहींस यामुळें मजला दुसरें गंधर्व करण्याचें आहे त्याबद्दल रुपये ३०० खर्च लागला आहे. तोही खर्च तुझे पासून या नोटिसीवरून घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. तो खर्च जावावर नोटिस देण्यांत येईल कळावें ता. २ एप्रील सन १८७० इसवी.

( सही ) पांडोबा वल्लद संभाजी सुतार मौजे माहागांव परगणे नि०

---

नोटिस—रघु वल्लद कृष्णाजी जाधव माळी राहती तऱ्हाळें तालुके अकोलें यास गंगी मर्द रघु वस्ती मौजे मलकापुर नजीक अकोलें हल्लीं वस्ती जळगांव तालुके बाळापुर इजकडून देण्यांत येतें कीं, मी तुझी लग्नाची बायको असून आज तीन वर्षें झालीं मजला तूं बिलकूल नांदवीत नाहींस व माझे लग्न झाल्यास आज तेरा वर्षें झालीं त्यानंतर पुष्कळ दिवस नांदविली मग ऋतु प्राप्त झाल्यावर एक वर्षपर्यंत मी तुझे जवळ होते नंतर माझे बापानें मला दिवाळीकरितां आणिलें, त्यानंतर तुमचे घरीं दोन तीन वेळ पोंचविण्यास माझा बाप घेऊन आला परंतु मी इजला साफ नांदवीत नाहीं असें सांगितलें व मजला तुम्ही दोन तीन वेळ गाडींतून खालीं उतरून दिलें, मग मी आपले बापाचे घरीं आज ३ वर्षें काळ काढिला माझे बापास माझेबद्दल ३ वर्षांत खावटीबद्दल २२५ सव्वादोनशें रुपये खर्च लागला सबब तुम्हास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ह्या नोटिशीचे तारखेपासून ८ दिवसांचे आंत माझे बापास खर्च लागला तो देऊन मजला आपले घरीं नेऊन नांदवावें जर तुम्ही मजला न नांदवाल तर जन शिरस्ते प्रमाणें मी पाटाचा नवरा करीन मग तुमचा लग्न संबंधीं माझेवर हक्क राहणार नाहीं हें खचीत समजावें ह्या नोटिशीचे तारखे पासून सदरीं लिहिले दिवसांत मजला आपले घरीं नेण्याची तजवीज करावी अगर मी तुजला नेत नाहीं व नांदवीत नाहीं याजबद्दल जबाब द्यावा ही नोटिस लिहून दिली सही तारीख२३ एप्रिल सन१८७०

( सही ) गंगी मर्द रघू.

---

नोटिस—हरी वल्लद मंहमाजी कुठे वस्ती मौजे पोट परगणे चांदुर ता० मलकापुर यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुम्ही आमची मुलगी आमचे मुलास देण्याकरितां आम्हास गांवाहून दोन चार वेळां बोलाविलें. त्यावरून सगाई करण्याकरितां आम्ही गाड्या वगैरे सरंजाम सुद्धां आलों असतां तुम्ही परत केले पुन: तुम्ही बोलाविलें कीं आतां खास यावें म्हणून सांगितलें त्यावरून पुर्वीप्रमाणें सर्व सरंजाम सुद्धां गेलों फाल्गुन महिन्याचे सुमारास आम्ही येऊन सर्व खर्च वगैरे केला याही वेळेस पुर्वीं प्रमाणें कांहीं कारण नसतां तुम्ही सोयरीक न करितां परत केलें सबब या नोटिसीनें कळवितों कीं दुसऱ्या बहून सोयरीका टाकून तुमची गोष्ट मान्य केली व खर्चही केला आणि तुम्ही विनाकारण सोयरीक न करितां आम्हांस खराब केलेंत या करितां ही नोटिस पावल्याचे तारिखे पासून पंधरा १५ दिवसांचे आंत मौजे पोट येथील पंचांकडून पक्केपणानें आम्हांस बोलावून सगाई करावी. अगर कोणते कारणानें तुम्ही नाकारीलें तो खरें सबब असल्यास उघड पणें दाखवावी असें न कराल तर तुम्ही खोटे ठरून शिवाय आम्ही आमचे नुकसानीबद्दल तुमचेवर दावा करून पैसा भरून घेऊं कळावें तारीख १९ एप्रील सन १८७० इसवी.

( सही ) उकर्डा वल्लद सैगालजी पारे मौजे आवार ता० बाळापूर नि० खु०

---

नोटिस मसा बापु देशपांडे रहणार पातुलडें तालुके जळगांव यांस हिराजी सोळकी बजाज याजकडून देण्यांत येते कीं तुम्ही गणोबा राघोबा याचे दुकानांतून कापड घेतलें त्याचे हवाल्याबदल तुमचे कडे बाकी राहिले रुपये २५० दोनशें पन्नासची मागणी केली असून तुमचेकडून रुपये आले नाहींत तर ही नोटिस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत रुपयांचा उलगडा करावा नाहीं तर तुमचेवर फिर्याद करून या नोटिशीच खर्चासुद्धां भरून घेण्यांत येतील कळावें तारीख २२ एप्रिल सन १८७० इ०

( सही ) हिराजी सोळकी द. खु.

---

नोटिस—कुकाजी वल्लद बापुजी सेलके वस्ती सावरगाव तालुके जळगाव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास आज पावेतों १२ वर्षें झालीं आणि पुढें तुजला रक्तपितीची दर्द जाली त्याची बरें होण्याची वाट आज पावेतों ८ वर्षें पाहिली पण ती दर्द बरी न होतां दिवसें दिवस जास्ती होऊन हल्लीं तूं अगदींच निरोपयोगी झाला आहेस मला वयांत येऊन सहा वर्षें झालीं आणि आज साहा वर्षें पावेतों तुझी बरें होण्याची वाट पाहिली पण आतां तुझी बरें होण्याची निराशा झाली आणि तुझे असे स्थितीमुळें माझा संसार व्यर्थ जात आहे सबब तुजला ह्या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुजपासून माझा संसार होण्याची आशा नाहीं सबब तूं मजला ही नोटिस पावल्या पासून ८ दिवसांत फारकती द्यावीस ह्या मुदतींत तूं फारकती न दिलीस तर पुढें तुझा लग्नाचा हक्क मजवर न रहातां तूं संसारास निरउपयोगी झाल्यामुळें माझे संसाराची मला सोय पाहणें अवश्य असल्यामुळें मी दुसरा नवरा करण्याची तजवीज करीन कळावें तारीख २५ एप्रेल सन १८७० इसवी मुक्काम अकोला.

( सही ) निशाणी भागी मर्द कुकाजी हीच हातची बांगडी.

---

नोटिस—हिरालाल शिवलदास साहू दुकान खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुम्हांपाशीं नोकरीस पांच वर्षें असून तुम्हीं मजला तनखाबद्दल देण्याचे ते दिले नाहींत माझे नोकरीचे रुपये सुमार१२० होत असून त्याबद्दल तुम्हांस मागणी केली असून देत नाहीं व तुझें कांहीं लागत नाहीं म्हणून सांगता त्यास हें बरोबर नाहीं याकरून तुम्हांस असें कळवितो कीं आज पासून आठ रोजांत माझे रकमेचा निकाल करावा नाहीं तर अलाहिदा दावा करणें पडेल.

) ( सही ) सोनाजी वल्लद उकरडा माहाली.

---

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०३ आणे.

---

| क्रिमतीचे ठराव. | रु. | आ. |
| --- | --- | --- |
| वर्षाची आगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ५ |
| फुटकळ … … … | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

---

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापण्यास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बाळबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हि ला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आकटोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.